संस्थापक :
साने गुरुजी

# साधना

शनिवार
२३ जानेवारी २०१०
मूल्य रु. १०/-

## कृषिविज्ञान : काल, आज आणि ...





अशोक पवार

आस-पास

# आता कोणी कोणाची जय म्हणायाची, ते तुम्हीच सांगा राव...?

**मी निघालो. मनात विचाराचं चक्र सुरू होतं... आमचा भारत देश स्वतंत्र. ह्या स्वतंत्र भारतात हाडामासाचे माणसं, एक उजेडात आन् दुसरा अंधारात राहतो. ह्या एकाच देशात दोन देश कसे नांदतात. एक इंडिया आन दुसरा भारत... आता कोणी कोणाची जय म्हणायाची ते तुम्हीच सांगा राव...?**

गावाच्या बाहेर पटांगण रान. त्या रानात भटक्यांची पाच-सात पालं उतरलेली. दिवसाचे चारएक वाजले असतील. दोन-तीन घंटे रिकामा वेळ आहे आपल्याला, तसं आता काही काम नाही. चला पालावर जावावं, बघावं आपल्या लोकाईची परिस्थिती. दहा ते बारा वर्षं झाले, आपन पाल सोडला. या काळात जगात अनेक उलथापालथी झाल्या. भारतातही अनेक बदल घडले, त्याचा परिणाम आपल्या लोकाईच्या पालावर झाला असेल.

मी रोड सोडून पालाकडे निघालो. मला बघताच गडी माणसं इकडे तिकडे पळू लागले. तरण्या तरण्या बायका पालात घुसल्या. मथारे कोतारे तेवढेच बाहेर राहिले.

मी पालावर आलो, मह्याशी कोणीच बोलना. माह्याकडे बघंना. आता काय करावं. मीच बोलायला सुरुवात केली, नेहमीप्रमाणे आपला परिचय दिला. त्याईच्यात एक जाडा बुढा बसलेला होता. तो खाऊन पेऊन टनाटन वाटत होता. मी त्याला बोलायलो, तो काही बोलेचना. मी पाच मिनिट उभा राहिलो, तवा तो बुढा एकाएकी मह्या पायात पडला. ''मालक आम्ही चोर न्हाय, आम्ही भीक मागून जगतु. आम्ही पारधी हाव. आमचे बापजादे शिकार करून जगत होते. मायबाप सरकारानं शिकारीवर बंदी आनली. आम्हाला लोक काम देत नाही. आम्ही पोटं भरण्यासाठी भीक मागतो. मालक आम्ही चोरी करीत नाही.''

''आरे, मी तुमचाच आहे. पोलीस नाही.''

''मागे असाच एक पोलीस आला. तुमचाच हाव म्हणला. वळख पाळख झाली. आपला माणूस होता म्हणून त्याला चित्तर बाटरं फुकटात देत होतो. त्याचं ऊठसूट नेहमीचंच सुरू झालं. मग आम्ही त्याला देनं बंद केलं. त्याला एक-दोन डाव वापस पाठवीलं. तो चिडला. आम्हाला धमकी देऊन गेला. आम्हाला वाटलं आपलाच माणूस आहे, कशाला तसं काही करेल. बेट्यानं शेन खाल्लंच. पोलीस घेऊन आला, आम्हाला चोरीच्या गुन्ह्यात आडकवीलं.''

''मी तसा नाही. तुमचं जगनं चांगलं होवावं म्हणून सरकारी दरबारी झटतो.''

''तोही असंच काहीबाही बोलत होता.''

''आता तुम्हाला विश्वास वाटत नसंल तर मी जातो. मला तसे चित्तर बाटरही नको. मी सहजच आलो.''

मी निघतो. जाता जाता अडचण पडली तर मला भेटा असं पारधी भाषेतून सांगतो. मी पारधी भाषेतून बोलल्याबरोबर ते भानावर आले. लगेच त्यांनी हात धरून मला थांबवलं. ''काय मालक आधीच का नाही सांगितलं. आमची समदी गडी माणसं पोलीस साध्या कापडात आला म्हणून पळून गेली. जाऊद्या, बरं झालं, नसता पोलीस असते तर बेकार झालं असतं. फुकटच टल्ले खायाला ठाण्यात घेऊन गेले असते.''

मग मी त्याच्या शेजारी गोधड्यावर बसलो. एका बुढ्यानं तोंडात बोट टाकून जोरात शिट्टी वाजवीली. तसं बायका हळूहळू पालातून बाहेर येऊ लागल्या. गडी माणसं एक एकानं येऊ लागले.

आमची बोलायला सुरुवात झाली. त्या बुढ्याचं नाव विठ्ठल पवार. तो सांगू लागला, ''मालक, इंदरा गांधीच्या काळात एकर दोन एकर जमीन मिळाली. जमीन धोपटाळ्याला आहे. किती भी राबून काय पिकते जमिनीत. जेवढे उत्पन्न होते त्याच्या दीडपट पैसेच खर्च होतात. त्यापेक्षा भीक मागून जगलेलं बरं. मी आन मही बायको मस्त भीक मागून जगतो. म्या काही साधा नाही. राजुरा, कलकत्ता, बंबई मेन गावात भीक मागून फुकट फिरता येते. कोणी तिकीट विचारत नाही. आन महत्त्वाचं म्हणजे भीक भी जास्त मिळते. लोक भी तरास देत नाही. पोलीस भी खेदाडत नाही...

''आता कोठं चोऱ्या करत्यात आपले लोक, आपल्या लोकाच्या चोऱ्या सुटल्या आन दुसरेच लोक करायला लागले. पण पोलीस आपल्याच लोकाईला पकडून नेतात. ढोरासारखं मारतात राव. आपल्या बापजाद्यापासून आपली गत वाईट हाय. जाऊदे. आम्ही भीक मागून आनंदात जगतो. आता पयल्यावानी राहिलं नाही. पोरच बापाईपेक्षा जास्त दारू पेयाला लागले. महे पोरंबाळं भी खूप दारू पेतात. लहान पोरगा आन सून मह्यापासी राहत्यात. त्याची बायको खुशाल भीक मागायला जाते, आन् हा दारू पेतो. दाखवला असता तुला, पण तुलाच भेऊन पळून गेला. पडला असंन कोठं खदाडीत. तू गेल्यावर मग त्याले अनावं लागंल.

(पृष्ठ ३० वर

# व्यर्थ न हो बलिदान!

अन्याय आणि भ्रष्टाचार यांच्या विरोधात लढणाऱ्यांना वलय असते. मात्र त्याबरोबरच येणारी दाहकता तळेगाव-दाभाडे येथील सतीश शेट्टी या लढवय्या कार्यकर्त्याच्या हत्येने स्पष्ट झाली आहे. भ्रष्टाचाराच्या विरोधात लढणे म्हणजे घरादारावर तुळशीपत्र ठेवून लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याचेच काम असते. शेट्टी यांना याची जाण होती, पण तरीही 'पदोपदी पसरून निखारे आपुल्याच हाती, होवुनिया बेभान धावलो ध्येयपथावरती' अशी त्यांची निर्धारी वाटचाल सुरू होती.

काही वर्षांपूर्वी माहितीच्या अधिकाराचा कायदा हाती आला. त्याचा सर्वप्रथम आणि प्रभावीपणे उपयोग करणाऱ्यांच्यापैकी सतीश शेट्टी होते. तळेगाव आणि लोणावळा या भागातील जमीन माफियांची कृष्णकृत्ये त्यांनी एक एक करत उघड करावयास सुरुवात केली. शेट्टी जन्मापासून त्याच भागातील होते. आपल्या भागाचे बदलते चित्र ते पहात होते. मुळशी-मावळचा हा निसर्गसंपन्न भाग. त्या धरणामुळे पाण्याची मुबलकता आणि मुंबई-पुण्याशी असलेली भौगोलिक जवळीक यामुळे या भागातील जमिनीला सोन्याचे मोल आले आहे. आपल्याकडील 'काळ्या सोन्या'चे पांढऱ्या पैशात रूपांतर करून घेण्याची शेतकऱ्यांना झालेली घाई आणि जमीन माफियांकडून त्यांची होणारी अडवणूक, फसवणूक व लूट शेट्टींना अस्वस्थ करत होती. 'लवासा'सारखे पूर्णत: स्वावलंबी पर्यटन शहरच या भागात उभे राहिल्याने राजकीय नेते, धनदांडगे, जमीन माफिया, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांची एक अभद्र युती या भागात उभी राहिली आहे. अभिमन्यूच्या निर्धाराने या चक्रव्यूहाचा भेद करण्याच्या इच्छेने सतीश शेट्टी त्यात शिरले होते. या धाडसाचे अनेकांना कौतुक होते. मात्र त्यांचा कायमचा काटा काढून चक्रव्यूह भेदले जाण्याची शक्यताच नष्ट करू इच्छिणाऱ्यांची संख्या कमी नव्हती. आज तरी त्यांची तात्पुरती सरशी झाली आहे.

सतीश शेट्टी यांच्याकडे आपण गेलो की आपले काम निश्चित होणार, ही खात्री सामान्य माणसाला येत चालली होती. तळेगावचे ते मंजुनाथ षण्मुगम किंवा सत्येंद्रनाथ दुबे होते. कुणी सरकारी जमिनी गिळंकृत केल्या, बेकायदा बांधकाम केले, अन्याय केला की हा एकांडा शिलेदार पडेल ती किंमत देऊन त्याविरुद्ध लढायला तयार व्हायचा. या कामात असंख्य खटल्यांना सामोरे जावे लागल्यानंतरही ते कधी डगमगले नाहीत. भल्याभल्यांशी टक्कर देताना ताठ कणा आणि उन्नत मान कधी झुकली नाही. अत्यंत सचोटीने लढावे, फसवणूक झालेल्यांना न्याय मिळवून द्यावा हाच त्यांचा आनंद होता आणि तीच जीवनाची सार्थकता होती. हातात एक साधी कापडी पिशवी आणि त्यामध्ये माहितीच्या अधिकारात मिळवलेल्या कागदपत्रांची अमोघ शस्त्रे एवढीच त्यांची मालमत्ता होती. आय.आर.बी. कंपनीचा १८०० एकर जमिनीचा गैरव्यवहार, तळेगाव नगरपरिषदेतील भ्रष्टाचार त्यांनी उघड केला. एका नगराध्यक्षाने केलेले स्वत:च्या बंगल्याचे बेकायदा बांधकाम उघडकीस आणले. त्यांचे नगरसेवकपद रद्द झाले आणि मग आपोआपच नगराध्यक्षपदही गेलेच. बेकायदा बांधलेला हा बंगलाही पाडण्यात आला हे विशेष! खोटी जन्मतारीख दाखवून शासकीय फायदे लाटणाऱ्या

**स्थापण्या**
**समता शांती**
**ठेवुनी शुद्ध**
**साधनां ।**
**करिती साधना**
**त्यांना ठेवो**
**उत्स्फूर्त**
**साधना**


**२३ जानेवारी २०१०**
वर्ष ६२ / अंक २४

- संपादक : **नरेंद्र दाभोलकर**
- कार्यकारी संपादक : **विनोद शिरसाट**

- हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी **ब्ल्यू बर्ड (इंडिया) लिमिटेड**, पुणे ४ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ९२६ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**, येथे प्रकाशित केले.
- दूरध्वनी : **वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी, [०२०] २४४५१७२४.** संपादक : टेलिफॅक्स – २४४३२४०२.
  E-mail : weeklysadhana@gmail.com • Website : www.weeklysadhana.com
- वार्षिक वर्गणी : व्यक्तिगत रु. ४००/-, संस्थांसाठी रु. ५००/- साधना मीडिया सेंटर – २४४५९६३५.
- [अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.]
- मुखपृष्ठ : **गिरीश सहस्रबुद्धे** Mob. 9850150488
- सहयोगी संपादक मंडळ : **अभय टिळक** (अर्थकारण), **राजा शिरगुप्पे** (सामाजिक), **अवधूत परळकर** (सांस्कृतिक), **संजय भास्कर जोशी** (साहित्य)

अधिकाऱ्याला निलंबित करायला त्यांनी प्रशासनाला भाग पाडले. रेशनिंग रॉकेलचा काळाबाजार उघड केला. हे सर्व करताना हॉटेलातला साधा चहादेखील ते कधी दुसऱ्याच्या पैशाने प्याले नाहीत.

एक व्रत म्हणून सतीश शेट्टी आपले काम करत होते. हा माणूस आपल्याला भारी ठरतो याची जाणीव झालेल्यांनी त्याला आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न केला. साम, दाम, दंड, भेद हे सारे उपाय वापरून झाले. हत्या होण्याच्या आधी काही दिवस त्यांच्या अंगावर मोटार सायकल घालून त्यांची हत्या करण्याचाही प्रयत्न झाला. मात्र या साऱ्या प्रकाराने जराही विचलित न होता त्यांनी आपली जनसेवा चालूच ठेवली. मात्र हे सारे आपल्या जिवावर बेतू शकते याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच पोलिसांना माहिती देऊन त्यांनी संरक्षणाची मागणी केली होती. ते संरक्षण द्यावयाचे की नाही याचा खल करण्यात पोलिसांनी दोन दिवस घालवले. तोवर मारेकऱ्यांनी आपले काम साधून घेतले.

मंजुनाथ षण्मुगम किंवा सत्येंद्रनाथ दुबे ही नावे मोठी. त्यांनी उघडकीस आणलेला भ्रष्टाचार हाही मोठ्या पातळीवरचा. माणसाच्या दैनंदिन वापरात असणाऱ्या रॉकेलमध्ये भेसळ करून स्वत:ची तुंबडी भरणाऱ्या अधिकाऱ्यांना षण्मुगम यांनी २००६ साली जाब विचारला होता. त्याच वर्षी दुबे यांनी महामार्ग बनवणारे ठेकेदार आणि तो विषय ज्यांच्या अखत्यारित येतो ती सरकारी कार्यालये यांच्यातील लागेबांधे स्पष्ट केले होते. त्या दोघांचाही खून झाला. केंद्रीय गुप्तचर खात्याकडे दुबे यांचे प्रकरण सोपविण्यात आले. केंद्रीय गुप्तचर खात्याने दुबे यांच्या खुनाशी कंत्राटदार कंपन्या व त्यांचे प्रतिनिधी यांचा संबंध नाही असे सर्वोच्च न्यायालयाला सांगितले. देशभर गाजलेल्या सर्वांत मोठ्या भ्रष्टाचाराला वेशीवर टांगणाऱ्या खुनाची वासलात अशी लागली. गैरकृत्ये व भ्रष्टाचार यांना चटावलेल्या व निर्धास्त बनलेल्या शक्तींनी सतीश शेट्टींचा खून करून एक उद्दाम इशारा दिला आहे. आमच्या विरोधात जीवाचे मोल देऊनच उभे रहावे लागेल, अशी ही गर्भित धमकी आहे. याचा प्रतिवाद आपण कसा करणार आहोत?

शासकीय पातळीवरील चौकशी आणि न्यायालये यांच्याकडून सतीश शेट्टी यांना न्याय मिळेल अशी आशा करूया. ते तर घडायला हवेच. अशा खूनखराबीला भीक न घालता माहितीच्या अधिकाराचे शस्त्र वापरणाऱ्या सर्व संघटनांनी मावळ-मुळशी भागातील जमीन माफियांच्या काळ्या कारवाया प्रकाशात आणण्यासाठी मोहीम उभारावी आणि त्यांच्या विरोधात दंड थोपटून उभे राहावे. शेट्टी यांच्या हत्येने माहितीच्या अधिकाराची मशाल विझवण्याचा प्रयत्न आहे. ती 'केला जरी पोत बळेच खाली, ज्वाला तरी ते वरती उफाळी' या न्यायाने धगधगती ठेवावयास हवी. हेही घडेल असे मानूया. पण अव्वल दर्जाचा प्रश्न पुढचा आहे. सतीश शेट्टीवर हल्ला होत असताना ते मदतीसाठी आक्रंदत होते. वास्तव असे सांगते की, त्यांच्या मदतीला कोणीही धावून गेले नाही. घटनेला साक्षी असणाऱ्या सर्वांचे हातपाय जणू लुळेपांगळे झाले होते. असंवेदनशीलता, मोह आणि भीती या त्रिदोषाने समाजाला घेरून टाकले आहे. त्याच्या भीषण वास्तवाची ही भयसूचक घंटा आहे; तिचा आवाज काळजात न पोचण्याइतकी बधीरता समाजाला प्राप्त झाली आहे. प्रत्येक प्रश्नाकडे 'मला काय त्याचे, असे घडतच असते' या मख्खपणे बघण्याची संवेदनहीनता बहुसंख्य समाजाने आणि विशेषत: मध्यमवर्गाने अंगी निर्माण केली आहे. संवेदनशीलता जागृत झालीच तर क्षणाक्षणाला खुणावणारे चंगळवादाचे अफाट विश्व त्या संवेदनेला डोके वर काढू देत नाही. त्यातूनही त्या वेदनेने उसळी मारलीच तर भीतीची भावना खडा पहारा देत उभी असते. परिणाम एकच होतो, मनातल्या मनात हळहळ आणि प्रत्यक्षात मौन. ती हळहळही हळूहळू कमी होत जाते. या दोषासह कुठल्याही समाजातील लोकशाही उभी राहू शकत नाही, मग ताठ मानेने स्वत:चे स्वत्व सांभाळणे तर दूरच राहिले.

लष्कराचे जवान, पोलिसदलातले अधिकारी यांचे हौतात्म्य धीरोदात्त असतेच, पण त्यांनी स्वीकारलेल्या पेशाचा तो एक अपरिहार्य भाग असतो. 'की घेतले न व्रत हे आम्ही अंधतेने' असे म्हणणारे सतीश शेट्टी ज्यावेळी अंगीकृत वसा पार पाडण्यासाठी हौतात्म्य स्वीकारतात, त्यावेळी त्याची दाहकता अधिक होते. मरगळलेल्या सामाजिक मनाला त्याने चेतना मिळाली तरच हे हौतात्म्य कृतार्थ होईल.

■

---

हा अंक छापायला पाठवण्याची तयारी झाली असताना ज्योती बसू यांचे निधन झाल्याची बातमी आली. ज्योती बसू यांच्यावरील लेख पुढील अंकात प्रसिद्ध होईल.

**– संपादक**



विशेष लेख

**रमेश पाध्ये**

# कृषिविज्ञान : काल, आज आणि...

**'इंटरनॅशनल क्रॉप रिसर्च इन्स्टिटट्यूट फॉर सेमी-एरिड ट्रॉपिक्स' या हैद्राबादमधील संशोधन संस्थेने काही महिन्यांपूर्वी ज्वारी या वनस्पतीचा डी.एन.ए. कोड पूर्णार्थाने उलगडण्यात यश मिळविले आहे. यामुळे भविष्यात अत्यंत कमी पाण्यावर भरघोस उत्पादन देणारे ज्वारीचे बियाणे विकसित करण्यात आमच्या शास्त्रज्ञांना यश मिळू शकेल. हैद्राबादच्या याच संशोधन करणाऱ्या संस्थेने सहा महिन्यांपूर्वी तुरीचे अधिक उत्पादक संकरित वाण बाजारात आणले आहे. ते कसाला उतरले तर देशातील कडधान्यांची टंचाई कमी होण्यास हातभार लागणार आहे. तशाच प्रकारे जेनेटिक मॉडिफिकेशन तंत्रज्ञानाचा अवलंब करून कोण्या एका भारतीय वैज्ञानिकाने राईचे संकरित वाण निर्माण केले आहे. हे सर्व प्रयोग यशस्वी ठरले तर कमी पर्जन्यमान असणाऱ्या प्रदेशात हरितक्रांती साकार होऊ शकेल.**

शेती आणि विज्ञान यांचा संबंध शेती करण्याला सुरुवात झाल्यापासून निर्माण झाल्याचे दाखविता येणे शक्य व्हावे. कारण निसर्गामध्ये उपलब्ध असणाऱ्या लाखो वनस्पतींमधून आपल्या आहारासाठी सुयोग्य ठरणाऱ्या आणि ज्यांच्यापासून अधिक उत्पादन मिळू शकेल अशा धान्यांची बियाणी निवडण्याचे काम आदिमानवाने सुरू केले. तसेच, अशा शोधलेल्या बियाण्यामधील अधिक उत्पादन व दर्जेदार प्रजातींची बियाणी पुढील हंगामात पेरा करण्यासाठी राखून ठेवण्यासही त्याने सुरुवात केली. म्हणजे आज आधुनिक काळात कृषिशास्त्रज्ञ लाखो रोपांमधून निवड पद्धतीने, आपल्याला ज्या गुणधर्माची रोपे हवी आहेत त्यांची निवड करण्याचे काम जेवढ्या तन्मयतेने करतात, तशाच प्रकारे निवड पद्धतीने धान्याची बियाणी निश्चित करण्याचे काम मानवाकडून गेली हजारो वर्षे सुरू राहिल्याचे आपल्या निदर्शनास येते. वनस्पतीमध्ये बदल होण्याची प्रक्रिया निसर्गात अखंडित पद्धतीने सुरू आहे. अशा रीतीने होणाऱ्या बदलांचे निरीक्षण करून अधिक चांगल्या दर्जाची वाणे निवडून त्यांचे जतन करणे आणि त्यांचा प्रसार करणे, हा आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग बनला आहे. आज आपण ऐहिक जीवनाच्या संदर्भात विकासाच्या ज्या टप्प्यावर आहोत, त्या टप्प्यावर आपल्याला पोहोचविण्याच्या कामाला, इतिहासक्रमात लाखो लोकांच्या सूक्ष्माचा वेध घेणाऱ्या निरीक्षण शक्तीने हातभार लावला आहे. ही गोष्ट लक्षात घेऊनच आधुनिक काळातील कृषि विज्ञानाचा उदय आणि विकास यांचा मागोवा घेणे उचित ठरावे.

जगामध्ये शेतीचा शोध लागून माणसाने शेती करायला सुमारे १२००० वर्षांपूर्वी सुरुवात केली असावी, असा त्या विषयातील तज्ज्ञांचा कयास आहे. जंगलात पायपीट करून उपजीविकेसाठी खाद्यान्न मिळविण्यापेक्षा जंगलात नैसर्गिकरित्या उपलब्ध असणाऱ्या बियाण्यांचा पेरा करून त्यापासून आपले अन्न उपलब्ध करून घेण्यास आदिमानवाने सुरुवात केली. अशी शेती करण्यास सुरुवात केल्यामुळे उपजीविकेसाठी कराव्या लागणाऱ्या श्रमांत लक्षणीय कपात घडून आली. यामुळे नागरी संस्कृती निर्माण होऊन तिच्या विकासाला चालना मिळाली. सुरुवातीला नदीकाठच्या गाळाच्या व नैसर्गिकरित्या सुपीक आणि आर्द्रता असणाऱ्या जमिनीवर प्रामुख्याने गहू, भात, जवस, मका इत्यादी तृणधान्यांची लागवड करून, आपल्याला आणि आपल्या टोळीला वर्षभर पुरेल एवढ्या धान्याचे उत्पादन घेण्यास सुरुवात झाली. यामुळे वर्षभरासाठी पिकविलेले धान्य साठवून ठेवण्यासाठी धान्याची कोठारे तयार करण्याची गरज निर्माण झाली. तसेच शेतात पिकविलेले धान्य धान्याच्या कोठारापर्यंत कमीत कमी मानवी श्रमात वाहून नेण्यासाठी पाळीव प्राण्यांचा वापर सुरू झाला. अशा रीतीने आपल्या टोळीच्या निर्वाहासाठी साठविलेले धान्य दुसऱ्या टोळीने लुटून फस्त करू नये म्हणून कोठारांचे रक्षण करण्यासाठी व्यावसायिक सैन्यदल उभे करण्यास सुरुवात झाली. थोडक्यात औद्योगिक क्रांतीला सुरुवात होण्यापूर्वी हजारो वर्षे आधी, काही प्रमाणात श्रम विभागणीची प्रक्रिया सुरू झाल्याचे आपल्या निदर्शनास येते.

शेती व्यवसायाला सुरुवात झाल्यामुळे निर्वाहासाठी कराव्या लागणाऱ्या श्रमामध्ये लक्षणीय प्रमाणात कपात झाल्यामुळे नव्या कृषिप्रधान समाजात मानवी संस्कृतीच्या विकासाला चालना देणारे अनेक बदल घडू लागले. त्यातील सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे, निसर्गचक्राचे अवलोकन करून त्याच्याआधारे शेती करण्याचा व्यवहार अधिक शास्त्रीय पायावर उभा करण्याच्या प्रक्रियेला चालना मिळाली, हा होय. तसेच शेतीसाठी शक्य असेल तेथे शाश्वत पाणीपुरवठा व्हावा यासाठी सिंचनाची सोय करण्यास जगामध्ये सुरुवात झाली. त्याचप्रमाणे शेतजमिनीची मशागत करण्यासाठी जगातील विविध संस्कृतींमध्ये शेतीअवजारे विकसित होऊ लागली. याच प्रक्रियेमध्ये पाळीव प्राण्यांची शक्ती वापरून जमिनीची नांगरट करण्यास सुरुवात झाली. ब्राँझ या धातूचा माणसाला शोध लागल्यावर शेतीची अवजारे धातूची बनू लागली. यामुळे पूर्वी ज्या जमिनीची नांगरट अशक्य ठरत होती, अशा जमिनी

कसल्या जाऊ लागल्या. अशा रीतीने एका बाजूला कृषिविस्ताराला चालना देणारे बदल सुरू असतानाच, दुसऱ्या बाजूला निसर्गात उपलब्ध असणारी नवनवीन अधिक उत्पादक बियाणी निवडून त्या माध्यमाद्वारे शेती अधिक उत्पादक करण्याचे प्रयत्न जगभर अव्याहत सुरू राहिलेले दिसून येतात. या प्रक्रियेला एक प्रकारे निसर्गानेही हातभार लावलेला आढळतो. उदाहरणार्थ, निसर्गक्रमात वनस्पतींमध्ये सूक्ष्म बदल घडून येतात. ते योग्य प्रकारे हेरून, केवळ पोषण मूल्यापुरता विचार न करता, स्वाद आणि चव या बाबतीत पसंतीला उतरणाऱ्या बियाण्यांची निवड करून, माणसाने आपले जीवन संपन्न बविण्यास सुरुवात केली. जगभरच्या विविध भौगोलिक प्रदेशांमध्ये कृषि उत्क्रांतीची ही प्रक्रिया अव्याहतपणे सुरू राहिलेली आढळते.

जगभरातील विविध संस्कृतीमध्ये कृषी उत्क्रांतीची प्रक्रिया सातत्याने सुरू राहिलेली पहावयास मिळते. या संदर्भात भारतातील स्थिती कशा प्रकारची होती याचा आढावा घेण्याचा आपण प्रयत्न करू या. पुरातन वस्तुशास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनानुसार फार प्राचीन काळापासून मध्ययुगापर्यंत भारताने कृषी उत्पादनाच्या संदर्भात फार मोठी आघाडी प्रस्थापित केली होती असे सूचित करणारे काही दस्तावेज आज उपलब्ध आहेत. साधारणपणे इसवीसन पूर्व ६००० वर्षांपूर्वी गंगा नदीच्या खोऱ्यामध्ये भाताची लागवड केली जात असे. नंतरच्या काळात इतर भागामध्येही ते पीक घेण्यास सुरुवात झाली. तसेच हिवाळ्यामध्ये गहू, बार्ली, ओट अशा तृणधान्यांसोबत मसूर, छोटा वाटाणा या कडधान्यांची लागवडही फार पुरातन काळापासून रूढ झालेली होती. तसेच पुढील ३००० वर्षांत त्यात अनेक पिकांची भर घालून भारतीय लोकांनी आपले जीवन संपन्न करण्याचे प्रयत्न सुरू ठेवलेले दिसतात. उदाहरणार्थ, या तीन हजार वर्षांच्या कालखंडात भारतामध्ये मूग, उडीद, चणा, तूर अशी कडधान्ये, तीळ, करडई, राई, एरंड आणि जवस अशा तेलबिया, कपास यांसारखे तंतुमय पीक आणि बोर, द्राक्षे, खजूर, आंबा, फणस, तुती, आलुबुखार इत्यादी फळझाडांची लागवड करून कृषी उत्पादनात मोलाची भर घालण्याचा प्रयत्न यशस्वीपणे पार पाडलेला दिसतो. याचबरोबर या काळात भारतीयांनी गाई, शेळ्या, मेंढ्या, गाढवे, घोडे, कुत्रे या प्राण्यांचे संगोपन करण्यास सुरुवात केलेली पहावयास मिळते.

जेथे वर्षातून केवळ शंभर दिवस पाऊस पडतो, अशा भारतासारख्या भूप्रदेशामध्ये यशस्वी शेती करायची तर या पावसाचे भाकीत करण्याची गरज अधोरेखित होते. या दृष्टीने निसर्गचक्र जाणून घेण्याचे काम इसवीसन पूर्व ४०० वर्षांपूर्वी सुरू झाल्याचे 'कृषी-पराशर' या ग्रंथाद्वारे सूचित होते. आणि पुढे इसवीसन ५८७ मध्ये ते पूर्णत्वाला पोहोचल्याचे बृहतसंहिता या ग्रंथाने निर्देशित केले आहे. साधारणपणे या कालखंडात पावसाचे भाकीत करण्याचा एक कित्ता विकसित करण्यात आला. यामध्ये सूर्य आणि चंद्र यांच्या वर्षभरातील बदलणाऱ्या स्थानांचा विचार करून पावसाळा हा ऋतू कधी सुरू होईल, कधी संपेल व पावसाचे मान कसे राहील हे वर्तविण्याची एक पद्धत भारतातील त्यावेळच्या खगोल शास्त्रज्ञांनी विकसित केली. आजही बऱ्याच मोठ्या प्रमाणात भारतातील शेतकरी आपली शेतीची कामे, हे पंचांग पाहून करतात.

'कृषी-पराशर' या ग्रंथामध्ये भरघोस कृषी उत्पादनासाठी सेंद्रीय खतांचे महात्म्य वर्णन केलेले आहे. तसेच गाईच्या शेणापासून चांगले सेंद्रीय खत कसे करावे हेदेखील नमूद केलेले आहे. पुढे कौटिल्याने शेण, गुरांची हाडे, मत्स्यांचे अवशेष आणि दूध यांच्या मिश्रणांचा खत म्हणून वापर करावा असा सल्ला दिला आहे. याच्याही पुढे जाऊन ख्रिस्तोत्तर पहिल्या शतकामध्ये 'कुराल' या ग्रंथामध्ये जमिनीची नांगरट करण्यापेक्षाही सेंद्रीय खतांचा वापर अधिक महत्त्वाचा असल्याचे नमूद केलेले आहे. त्यानंतरच्या हजार वर्षांमध्ये हिरवळीचा वापर सेंद्रीय खत म्हणून कसा करावा याविषयीचे लिखाण आज उपलब्ध आहे. तसेच शेतकऱ्यांनी आपल्या फळबागांच्या निगराणीसाठी जनावरांचे शेण, मूत, पशूंच्या हाडातील मगज, मेलेले मासे, तिळाची पेंड, मध, भिजवलेले उडीद, तूप यांचा वापर करून द्रवरूप खताची निर्मिती कशी करावी याचे वर्णन कुराल या ग्रंथात केलेले आहे.

पुरातन वस्तुशास्त्राच्या संशोधनानुसार इसवीसन पूर्व १३०० वर्षे आधी, इनामगाव या महाराष्ट्रातील गावामध्ये दगड आणि चिखल यांच्या साहाय्याने घोड नदीला बंधारा घालून पुराचे पाणी कालव्यामध्ये वळविण्याची सोय केलेली दिसून येते. अगदी ऋग्वेदामध्येही सिंचनासाठी नदीचे पाणी कालव्यांच्या माध्यमातून शेतात वळविण्याचे वा विहिरींच्या पाण्याचा अशा सिंचनासाठी वापर करण्याचे उल्लेख आहेत. इसवीसन पूर्व ५०० ते ३०० या बुद्ध धर्मांचा प्रभाव असणाऱ्या काळातील वाङ्मयात, सिंचनासाठी तलावांच्या पाण्याचा वापर कसा नियमित करावा, यासंबंधीचे विवेचन केलेले पहावयास मिळते. तशाच प्रकारे कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्येही याच प्रश्नाच्या संदर्भात विस्तृत विवेचन केलेले आहे. दक्षिण भारतामध्ये तलावात साठविलेल्या पाण्याचा वापर करून मोठ्या प्रमाणावर शेती केली जायची. अशा सिंचनासाठी निर्माण केलेल्या तलावांची डागडुजी करणे, त्यात साठलेला गाळ उपसणे ही कामे त्या समाजात बिनधोक सुरू रहावीत यासाठी अशा पाणीपुरवठ्याच्या व्यवस्थेवर देखरेख करण्यासाठी ग्रामीण पातळीवर ग्रामस्थांचे एक मंडळ नियुक्त करण्याची पद्धत रूढ होती. संपूर्ण भारताचा विचार करायचा तर शेतीला हमखास पाणीपुरवठा करण्यासाठी विहिरीचे पाणी मोटेने उपसून ते पाटाने शेतीला पुरविण्याची पद्धत फार प्राचीन काळापासून भारतात रूढ होती.

आपण पेरलेल्या बियाण्यांपासून भरघोस उत्पादन मिळण्यासाठी पेरा केलेले बियाणे दर्जेदार असले पाहिजे, याचे ज्ञान सुमारे २५०० वर्षांपूर्वीच्या शेतकऱ्यांना होते. यामुळे अशा बियाण्यांची प्रत चांगली रहावी यासाठी काय काळजी घ्यावी, या संदर्भात कृषी-पराशर या ग्रंथात विस्तृत निवेदन केलेले पहावयास मिळते. पेरा करण्यासाठी राखून ठेवलेली बियाणी खडखडीत सुकवावीत, त्यातील तणांचे बी वेचून नष्ट करावे, बियाण्यांचे धान्य समान आकारमानाचे असावे, बियाणे मजबूत पिशव्यांमध्ये साठवावे, ते साठविण्याची जागा वाळवी व दमटपणा यापासून मुक्त असावी, इत्यादी सूचना या ग्रंथामध्ये शब्दबद्ध केलेल्या आहेत.

तसेच हवामानाचा अंदाज घेऊन शेतकऱ्याने कोणत्या धान्याचा पेरा आधी करावा व नंतर कोणते धान्य पेरावे या संदर्भातील विवेचन कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये केलेले आपल्याला दिसून येते. वाईट बियाणी विकणाऱ्या व्यापाऱ्यांना जबरदस्त शिक्षा करण्यात यावी, असे इसवीसन पूर्व ४०० वर्षे आधी मनूने सांगून ठेवले होते.

शेती व्यवसायाशी निगडित असणारा पशुपालन व्यवसाय नेटकेपणाने कसा करावा, यासंबंधीचे विवेचन ऋग्वेद, कृषी-पराशर, अर्थशास्त्र या ग्रंथांमध्ये करण्यात आलेले आहे. तसेच पशुधनाचे नीट संगोपन व्हावे यासाठी, प्रत्येक गावाच्या हद्दीत चराऊ कुरणे कशी राखावीत याचे विवेचन करण्यात आलेले आहे. बैल, गाई, म्हशी यांना साधारणपणे किती खाद्य लागते व ते त्यांना मिळावे यासाठी ग्राम समाजामध्ये कशा पद्धतीची व्यवस्था केली पाहिजे, हे सदर ग्रंथांमध्ये सांगितलेले आहेत. थोडक्यात शेती आणि त्या व्यवसायाशी निगडित असणारा पशुपालन व्यवसाय यांचा उत्कर्ष होण्यासाठी समाजाने काय करावे, याचे मापदंड ठरविण्याचे काम भारतात पुरातन काळापासून सुरू होते. पण पिकांवर पडणारे रोग, पिकांवर होणारा कीटकांचा हल्ला यांचा बंदोबस्त करण्यासाठी काही ठोस उपाय सुचविण्यात आपले पूर्वज यशस्वी ठरले नाहीत. तसेच पशुधनाला वेळप्रसंगी भेडसावणाऱ्या व्याधींवर काय उपाय योजावेत, यासंबंधी मार्गदर्शन करण्यात त्यांना यश आले नाही. पाळीव प्राण्यांना रोग होऊ नयेत म्हणून त्यांचे गोठे स्वच्छ ठेवावेत, एवढा एकच महत्त्वाचा सल्ला त्यांनी शेतकऱ्यांना दिल्याचे आपल्या निदर्शनास येते.

या मध्ययुगीन भारतातील कृषी-संस्कृती खूपच पुढारलेली होती. भारत हा खंडप्राय देश. तसेच येथील हवामान कृषी उत्पादनाला सुयोग्य. यामुळे भारताने कृषी उत्पादनात आघाडी घेतली होती. या विकासक्रमाला जसा निसर्गाचा वरदहस्त लाभला होता, तसाच यामध्ये येथील माणसांच्या उद्यमशीलतेचाही त्यात मोठा हिस्सा होता. निसर्गात निर्माण झालेल्या वनस्पतींचे गुणधर्म ओळखून, त्यांची लागवड करून, त्यापासून आपल्या चवी तृप्त करण्यामध्ये भारतीय कृषी-तज्ज्ञांनी तत्परता दाखविलेली दिसून येते. या संदर्भात सर्वांत महत्त्वाचे उदाहरण म्हणजे भारतामध्ये फार प्राचीन काळापासून उसाची लागवड करण्यात येत होती. तसेच अशा उसाचा रस काढून त्यापासून गूळ बनविण्याची पद्धत येथे रूढ झाली होती. तशाच प्रकारे अन्नाची रूची वाढविण्यासाठी मसल्याच्या वनस्पतींचा शोध घेऊन त्यांची लागवड करण्यात, भारतीय लोक जगातील त्या वेळच्या इतर समाजाच्या तुलनेत फारच पुढारलेले होते असे म्हणता येईल. तशाच प्रकारे कापसाची लागवड करून त्यापासून कापड तयार करण्यास फार पुरातन काळापासून सुरुवात झालेली पहावयास मिळते. कापसापासून केवळ वस्त्रे तयार करण्याने भारतीयांचे समाधान झाले नाही, तर विविध रंगाच्या फळाफुलांचा वापर करून रंगीबेरंगी वस्त्रे तयार करण्यात भारतीयांनी आघाडी घेतल्याचे दिसून येते. यामुळेच मध्ययुगातच नव्हे, तर युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीला सुरुवात होईपर्यंत भारतात उत्पादन केलेल्या रंगीत वस्त्रांना युरोप खंडामध्ये भरपूर मागणी होती, ही गोष्ट खास नमूद करायला हवी. भारतात इंग्लंडची ईस्ट इंडिया कंपनी आली ती भारतातून तयार होणारे कापड युरोपमध्ये विकण्यासाठी खरेदीदार म्हणून! पण इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीची मुहूर्तमेढ लावली गेल्यानंतर 'कंपनी'ची भूमिका बदलली. मग भारतामधून तयार कापडाऐवजी कापसाची निर्यात सुरू झाली.

दुसऱ्या पद्धतीने विचार करायचा तर, पश्चिम युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीची लाट फुटण्यापूर्वी तेथील शेतीक्षेत्राच्या उत्पादकतेपेक्षा, भारतामधील शेतीक्षेत्राची उत्पादकता अधिक होती. कारण युरोपमधील सरंजामशाही पद्धतीच्या समाजरचनेमुळे तेथे प्रत्यक्ष शेती करणाऱ्या भूदासाला शेती करण्यामध्ये सुधारणा करून आपले जीवन आर्थिकदृष्ट्या संपन्न करण्याचा पर्याय उपलब्ध नव्हता. याच्या उलट भारतामध्ये पूर्वापार स्वतंत्र शेतकऱ्यांचा वर्ग अस्तित्वात होता. अशा स्वतंत्र शेतकऱ्यांनी अधिक नेटकेपणाने शेती केल्यास त्यांना विकासाची मधुर फळे चाखण्याची संधी उपलब्ध होती. यामुळेच इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीला सुरुवात होऊन तेथील सरंजामी व्यवस्थेचा अंत होईपर्यंत, भारतामधील कृषी क्षेत्रामधील उत्पादन संबंध कृषी विकासाला चालना देणारे होते. याचा परिणाम म्हणून भारतात अधिक आणि शाश्वत उत्पादनासाठी पिकामध्ये फेरपालट करण्याची पद्धत मोठ्या प्रमाणावर रूढ होती. तसेच शेतामध्ये एका कृषी हंगामात एकाच तृणधान्याचा पेरा न करता, तृणधान्याबरोबर शेतामध्ये तृणधान्याच्या काही ओळीनंतर द्विदल धान्याच्या एक-दोन ओळी लावण्याची पद्धत मोठ्या प्रमाणावर रूढ होती. तसेच खरिपामध्ये भाताचे पीक घेतल्यावर त्या शेतामध्ये रब्बी हंगामात कडधान्याचे पीक घेतले जात असे. यामुळे भाताच्या पिकावर वाढणाऱ्या रोगांचा नायनाट तर होईच, पण त्याचबरोबर कडधान्याच्या लागवडीमुळे त्या पिकाच्या मुळांकडे आकर्षिल्या जाणाऱ्या सूक्ष्म जिवाणूंमुळे, हवेतील नत्र जमिनीमध्ये स्थिर होण्यास हातभार लागत असे. पण पश्चिम युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीची लाट फुटली आणि तेथे सरंजामशाहीचा अंत होऊन स्वतंत्र शेतकऱ्यांचा वर्ग अस्तित्वात आला. त्यानंतर तेथे शेती विकासाला जोरदार चालना मिळाली. या कालखंडामध्ये युरोपमधील लोकसंख्याही वेगाने वाढत होती. या वाढणाऱ्या लोकसंख्येची भूक भागविण्यासाठी तेथे शेती उत्पादनात वाढ करण्याची गरज निर्माण झाली. अशी वाट साध्य करण्यासाठी आवश्यक ठरणाऱ्या आधुनिक विज्ञानाचा पाया तेथे घातला गेला होता. या आधुनिक विज्ञानाचा वापर करून तेथे शेतीउत्पादन वाढविण्यास सुरुवात झाली आणि एकदा ही सुरुवात झाल्यावर तेथे शेतीक्षेत्राच्या प्रगतीची जी घोडदौड सुरू झाली, ती आजतागायत अविरतपणे सुरू आहे.

युरोपमध्ये आधुनिक विज्ञानाचे युग सुरू झाल्यानंतर तेथे जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये या आधुनिक विज्ञानाने मुसंडी मारण्यास सुरुवात केली. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर जर्मन शास्त्रज्ञ जस्टुस हॉन लेयबिग आणि फ्रेंच शास्त्रज्ञ जीन बाप्टिस्ट बोसिंगॉल्ट यांनी मृद-रसायन शास्त्राचा पाया घातला. याच सुमारास १८४२ साली सर बेनेट लावेस याने सुपर फॉस्फेट या रासायनिक खताचे औद्योगिक उत्पादन करण्याचा शोध लावला. तसेच या कालखंडात दक्षिण अमेरिकेतील चिली या देशातून नैसर्गिक अमोनियम नायट्रेट

या खताची आयात, उत्तर अमेरिकेतील व पश्चिम युरोमधील बंदरामध्ये सुरू झाली. परंतु तरीही २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात शेतीसाठी प्रामुख्याने सेंद्रीय खतांचा वापरच सुरू होता. याच कालखंडात हेबर बोश या जर्मन रसायन शास्त्रज्ञाने हवेतील नत्र अमोनियम नायट्रेट या संयुगामध्ये स्थिर करण्याचा शोध लावला. या शोधाचा वापर करून औद्योगिकरित्या अमोनियम नायट्रेट तयार करण्याची प्रक्रिया विकसित करण्याचे काम कार्ल बोश या शास्त्रज्ञाने केले. यामुळे जर्मनीमध्ये अमोनियम नायट्रेट तयार करण्यास सुरुवातही झाली. पण याच काळात पहिल्या महायुद्धाला तोंड फुटल्यामुळे या अमोनियम नायट्रेटचा वापर पिकासाठी रासायनिक खत म्हणून होण्याऐवजी युद्धासाठी स्फोटके बनविण्यासाठी होऊ लागला. पहिले जागतिक महायुद्ध १९१९ मध्ये समाप्त झाले. त्यानंतर झालेल्या उलथापालथीतून जग बाहेर पडेपर्यंत, संपूर्ण जगाला १९३० च्या आर्थिक महामंदीने ग्रासले. या अरिष्टाचा परिणाम म्हणून बाजारपेठेतील शेतमालाची मागणी घटत गेली. यामुळे कृषिमालाचे उत्पादन वाढविण्यासाठी सुरू असणाऱ्या प्रयासांना खीळ बसली. ही अवस्था दुसऱ्या जागतिक महायुद्धाला तोंड फुटेपर्यंत कायम राहिली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात नवनवीन शस्त्रास्त्रांची निर्मिती व वापर करण्याला स्वाभाविकपणेच प्राधान्य मिळाले. पण दुसरे महायुद्ध समाप्त झाल्यावर जगातील राजकीय धुरीण आणि शास्त्रज्ञ यांचे लक्ष जगातील वाढती उपासमार आणि वाढते कुपोषण या समस्यांकडे जाऊ लागले. परिणामी कृषीविषयक संशोधनाला चालना मिळाली आणि या संशोधनाचे पर्यवसान मेक्सिको या देशामध्ये हरित क्रांतीची सुरुवात होण्यात झाले. हा आधुनिक कृषिविज्ञानाचा इतिहास खूपच रंजक आहे.

दुसऱ्या महायुद्धाचा अंत दृष्टिपथात आला, तेव्हा १९४३ साली मेक्सिको हा देश लोकांच्या उपजीविकेसाठी धान्याच्या आयातीवर विसंबून होता. तेव्हा या देशामध्ये त्यांच्या एकूण गरजेच्या सुमारे ५० टक्के उत्पादन देशांतर्गत होत असे व बाकी राहिलेली ५० टक्के गरज आयातीमार्फत भागविली जात असे. अशा परिस्थितीत मेक्सिकोमधील धान्याचे उत्पादन वाढावे या उद्देशाने मेक्सिकन सरकार, अमेरिकेतील रॉकफेलर आणि फोर्ड फाऊंडेशन यांच्या सहकार्याने गहू आणि मका या तृणधान्यांची अधिक उत्पादक बियाणी निर्माण करण्याचे काम १९४४ साली सुरू करण्यात आले. या कामासाठी अमेरिकेतील कृषिवैज्ञानिक डॉ.नॉरमन बोरलॉग यांना पाचारण करण्यात आले. त्यांनी अल्पावधीत उंचीला कमी पण धान्याचे भरपूर उत्पादन देणारे गव्हाचे संकलित वाण निर्माण करण्यात यश मिळविले. या संकरित वाणाचे खास गुणविशेष म्हणजे, हे वाण पिकासाठी दिलेल्या रासायनिक खताला उत्तम प्रकारे प्रतिसाद देऊन गव्हाचे अमाप पीक देणारे होते. तसेच सर्वसाधारणपणे गहू या पिकावर पडणाऱ्या रोगांना दाद न देणारे होते. या वाणाची मेक्सिकोमध्ये लागवड सुरू झाल्यावर अल्पावधीत मेक्सिकोने गव्हाच्या उत्पादनात आपल्या लोकसंख्येला पुरून उरेल एवढे गव्हाचे उत्पादन साध्य करून, गव्हाची निर्यात करण्यास सुरुवात केली. एकदा असे यश प्राप्त होताच कृषी-वैज्ञानिकांनी मागे वळून पाहिले नाही. त्यानंतर पुढील वीस वर्षांच्या कालखंडात जगभरातील अनेक देशांमध्ये, त्यांच्या हवामानाला सुयोग्य ठरणाऱ्या अधिक उत्पादक गव्हाच्या वाणांची निर्मिती करण्याच्या कामाने वेग घेतला. तसेच अशा प्रकारे विकसित केलेली अधिक उत्पादक वाणे आणि रासायनिक खते व किटाणूनाशके शेतकऱ्यांच्या शिवारापर्यंत पोहोचवून या आधुनिक शेतीचे तंत्र त्यांना शिकविण्याचे काम हा कृषिवैज्ञानिक आणि कृषिविस्तारक यांच्या दैनंदिन कामाचा भाग झाला. यामुळे भारत, पाकिस्तान, आफ्रिका खंडातील काही देश अशा अविकसित देशांमध्येही या आधुनिक कृषितंत्राचा झपाट्याने प्रसार झाला. जगामध्ये हे आधुनिक कृषीतंत्रज्ञान झपाट्याने पसरत गेल्यामुळे वाढत्या लोकसंख्येची धान्याची वाढती गरज पूर्ण करणे शेतकऱ्यांना शक्य झाले.

आंतरराष्ट्रीय पातळीवर गहू आणि मका या पिकांवर संशोधन करणारी संस्था मेक्सिको या देशात उभी करण्यामध्ये अमेरिकेच्या रॉकफेलर आणि फोर्ड फाऊंडेशन यांनी पुढाकार घेतला. तशाच प्रकारे एशियामधील महत्त्वाचे तृणधान्य, तांदूळ या पिकावर संशोधन करण्यासाठी इंटरनॅशनल राइस रिसर्च इन्स्टिट्यूट, फिलिपाईन्स या देशामध्ये स्थापन करण्यात आली. या संस्थेच्या माध्यमातून तांदुळाची अधिक उत्पादक वाणे विकसित करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. अशी संकरित वाणे कशी विकसित करायची याचा वस्तुपाठ, गव्हाची संकरित वाणे विकसित करण्याच्या कार्यक्रमाने घालून दिला होता. त्यामुळे त्याच तंत्राचा वापर करून अल्पावधीत आयआर ८ हे तांदुळाचे अधिक उत्पादक वाण विकसित करण्यास कृषी वैज्ञानिकांना वेळ लागला नाही. गव्हाच्या अधिक उत्पादक वाणाप्रमाणेच तांदुळाचे हे नवीन वाण बुटके, अधिक उत्पादक आणि रासायनिक खताला चांगला प्रतिसाद देणारे होते. अल्पावधीत तांदुळाचे हे संकरित वाण एशिया खंडामध्ये लोकप्रिय झाले. उत्तरेला साम्यवादी राष्ट्र चीनपासून दक्षिणेला इंडोनेशिया, फिलिपाईन्सपर्यंत सर्व एशियामधील देशांत या वाणाचे चांगले स्वागत झाले. यामुळे एशिया खंडातील तांदुळाचा दुष्काळ आटोक्यात येऊ लागला. तेथील भुकेच्या समस्येची तीव्रता लक्षणीय प्रमाणात घसरणीला लागली.

मेक्सिकोमध्ये संशोधन करून विकसित केलेले गव्हाचे अधिक उत्पादक संकरित वाण किंवा फिलिपाइन्समध्ये विकसित केलेले तांदळाचे अधिक उत्पादक संकरित वाण, ही २० व्या शतकातील हरितक्रांतीच्या मार्गातील महत्त्वाची भर होती. यामुळे जगभरच्या कृषी वैज्ञानिकांना संशोधन करण्यासाठी एक नवा मार्ग सापडला. देशोदेशींच्या कृषी वैज्ञानिकांनी या नव्या वाटेने संशोधन सुरू ठेवून मिळालेल्या संधीचे अक्षरशः सोने केले. यामुळे जागतिक पातळीवर अन्नधान्याचे उत्पादन सुमारे तीस वर्षांच्या काळात जवळपास साडेतीन पट झाले. आता जगात अन्नधान्याचे पुरेसे उत्पादन होत नसल्यामुळे कोणाची उपासमार सुरू राहिल्याचे दृश्य सहजपणे नजरेला पडत नाही. हेच या हरितक्रांतीचे फलित आहे. भारतापुरता विचार करायचा तर, येथील कृषी वैज्ञानिकांनी भारताचे कृषी हवामान आणि येथील

जनतेच्या चवीढवी लक्षात घेऊन, गहू आणि तांदूळ या तृणधान्याची अधिक उत्पादक नवीन वाणे विकसित करण्याचे काम धडाकेबंद पद्धतीने केले. पण हे सर्व काम शाश्वत सिंचनाची सोय असणाऱ्या क्षेत्राला लाभदायक ठरू शकेल, अशाच स्वरूपाचे आहे. भारतातील लागवडीखालील ६५ टक्के क्षेत्र हे लहरी पावसावर निर्भर असणारे आहे. एवढेच नव्हे, तर यामधील ५० टक्क्यांपेक्षा जास्त क्षेत्रावर पडणाऱ्या पावसाचे प्रमाण, अत्यंत अपुरे, या सदरात मोडणारे आहे. एकदा ही गोष्ट विचारात घेतली तर पाण्याचा ताण सहन करू शकणारी धान्याची अधिक उत्पादक संकरित बियाणी निर्माण करण्याच्या कामाने वेग घेणे गरजेचे होते, पण प्रत्यक्षात तसे झाले नाही.

दुसऱ्या बाजूने पाहिले तर भारतात तांदूळ आणि गहू या तृणधान्यांचे उत्पादन, येथील लोकसंख्येची आजची गरज भागण्याएवढे होत असले तरी, आजपर्यंत विकसित करण्यात आलेले तंत्रज्ञान विचारात घेता, भविष्यात वाढणारी लोकसंख्या आणि सधनवर्गाची बदलत जाणारी जीवनशैली या बाबी विचारात घेता नजिकच्या काळात अन्नधान्याच्या संदर्भात प्राप्त केलेली स्वयंपूर्णता संपुष्टात येण्याची चिन्हे आता स्पष्ट झाली आहेत. यामुळेच गेल्या पाच वर्षांच्या काळात पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी दुसऱ्या हरितक्रांतीची गरज सार्वजनिक व्यासपीठावरून वारंवार व्यक्त केली आहे. पण या दुसऱ्या हरितक्रांतीचा आशय काय असावा, हे स्पष्ट करण्याचे काम त्यांनी आजतागायत केलेले नाही. भारतातील पहिल्या हरितक्रांतीच्या तंत्रविज्ञानाला आता थकवा जाणवू लागला आहे, असे विधानही त्यांनी अधूनमधून केल्याचे वाचनात आले आहे. पण हा थकवा दूर करण्यासाठी गेल्या पाच वर्षांच्या काळात सरकारने काही ठोस कार्यक्रम हाती घेतलेला दिसत नाही. हरितक्रांतीच्या तंत्रविज्ञानाच्या थकव्याचा विचार करायचा तर असा थकवा जगाच्या पाठीवर सर्व ठिकाणी जाणवू लागलेला नाही. उदाहरणार्थ, चीनमध्ये भारताबरोबरच हरितक्रांतीचे रोपटे लावण्यात आले. पण तेथील कृषी वैज्ञानिकांनी तांदूळ आणि मका या पिकांच्या संदर्भात मूलभूत संशोधन करून या धान्यांची जगामधील सर्वांत अधिक उत्पादक वाणे विकसित केली आहेत. डॉ. नॉरमन बोरलॉग या कृषी वैज्ञानिकाने उघड केल्याप्रमाणे, चीनने तांदळाचे अधिक उत्पादक संकरित वाण विकसित करण्यासाठी अवलंबिलेली पद्धत पूर्णपणे वेगळी आहे. यामुळे भविष्यात गव्हाची नवीन संकरित वाणे विकसित करताना चीनच्या या पथदर्शी पद्धतीचा वापर करणे लाभदायक ठरणार आहे. चीनमधील कृषी वैज्ञानिक युआन लाँगपिंग यांनी विकसित केलेले तांदळाचे वाण शेतकऱ्याला हेक्टरी दहा टन उत्पादन देणारे आहे. भारतामध्ये तांदळाची नवीन बियाणी वापरून, हेक्टरी सुमारे अडीच टन उत्पादन घेतले जाते, हे वास्तव लक्षात घेतले तर तांदुळाच्या संकरित वाणाच्या संदर्भात चीनने कशी हनुमान उडी मारली आहे ही बाब स्पष्ट होते. तशाच प्रकारे हुआ लाँग एक हे चीनने प्रसारित केलेले मक्याचे संकरित वाण हेक्टरी २५ टन उत्पादन देणारे आहे. तसेच या वाणाचे ताट तीन मीटर उंचीचे असल्यामुळे, या वाणापासून हेक्टरी ७५ टन पशुखाद्य मिळते. अशा प्रकारचे नेत्रदीपक शोध भारतातील कृषी वैज्ञानिकांना लावता आलेले नाहीत.

एवढेच नव्हे, तर भारतीयांच्या आहाराचा प्रमुख घटक असणारी कडधान्ये आणि तेलबिया यांची अधिक उत्पादक संकरित वाणे विकसित करण्याचे काम, भारतीय कृषी वैज्ञानिक यशस्वीपणे करू शकलेले नाहीत. यामुळे भारतात हरितक्रांतीचा जसा विस्तार होत गेला, तसा कडधान्ये आणि तेलबिया या पिकांच्या खालील चांगल्या प्रतीच्या जमिनीचा वापर संकुचित होत गेला. यामुळे कडधान्ये आणि खाद्यतेल यांची मोठ्या प्रमाणावर आयात करण्यावाचून आपल्याला दुसरा पर्याय उरलेला नाही. आज भारतात खाद्यतेलाचे जेवढे उत्पादन होते, तेवढेच खाद्यतेल आपण आयात करतो. कडधान्यांच्या संदर्भातील स्थिती फारशी वेगळी नाही. आपले कडधान्यांचे उत्पादन आपली ७० टक्के गरज पूर्ण करते, तर राहिलेली ३० टक्के गरज आयातीमार्फत भागविली जाते. या संदर्भात विचारात घेण्यासारखा आणखी एक मुद्दा म्हणजे, गेल्या २०/२५ वर्षांमध्ये देशातील दरडोई प्रती दिवसाचा कडधान्याचा खप ७० ग्रॅमवरून ५० ग्रॅमपर्यंत घसरत गेला आहे. याचा अर्थ भारतीयांच्या आहारामधील प्रथिनांचे प्रमाण घसरणीला लागले आहे. यामधून देशातील कुपोषितांचे प्रमाण वाढीला लागल्याचे सूचित होते.

अशा सर्वांगाने विचार केला तर कृषी उत्पादनाच्या संदर्भात जागतिक पातळीवर एके काळी आघाडीवर असणारा देश, आधुनिक काळात आपले ते स्थान प्राप्त करण्यात यशस्वी झालेला नाही, हे सत्य कोणालाच नाकारता येणार नाही. पण अशी निराशाजनक स्थिती आज असली, तरी काही आशेचे किरण आज दिसू लागले आहेत. उदाहरणार्थ, 'इंटरनॅशनल क्रॉप रिसर्च इन्स्टिट्यूट फॉर सेमी-एरिड ट्रॉपिक्स' या हैद्राबादमधील संशोधन संस्थेने काही महिन्यांपूर्वी ज्वारी या वनस्पतीचा डी.एन.ए. कोड पूर्णार्थाने उलगडण्यात यश मिळविले आहे. यामुळे भविष्यात अत्यंत कमी पाण्यावर भरघोस उत्पादन देणारे ज्वारीचे बियाणे विकसित करण्यात आमच्या शास्त्रज्ञांना यश मिळू शकेल. हैद्राबादच्या याच संशोधन करणाऱ्या संस्थेने सहा महिन्यांपूर्वी तुरीचे अधिक उत्पादक संकरित वाण बाजारात आणले आहे. ते कसाला उतरले तर देशातील कडधान्यांची टंचाई कमी होण्यास हातभार लागणार आहे. तशाच प्रकारे जेनेटिक मॉडिफिकेशन तंत्रज्ञानाचा अवलंब करून कोण्या एका भारतीय वैज्ञानिकाने राईचे संकरित वाण निर्माण केले आहे. हे सर्व प्रयोग यशस्वी ठरले तर कमी पर्जन्यमान असणाऱ्या प्रदेशात हरितक्रांती साकार होऊ शकेल. याला जर आपण 'येऊ घातलेली दुसरी हरितक्रांती' हे नाव दिले तर ते सार्थ म्हणावे लागेल. ही दुसरी हरितक्रांती साकार व्हावी यासाठी सरकार कशी पावले उचलते, त्याकडे डोळे लावून प्रतिक्षा करणे एवढेच आपल्या हातांत आहे.

**रमेश पाध्ये**
rameshpadhye@hotmail.com
६, पद्मरेखा, ५९ जयप्रकाश नगर, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०००६३.
Phone : 022-26861814

नरेंद्र चपळगावकर

विशेष लेख

# न्यायाचे शास्त्र आणि न्यायाचा व्यवहार

उत्तरार्ध

कोसळू पाहणारी न्यायव्यवस्था आणि निष्प्रभ ठरणारे कायदे यामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. नवे कायदे तर लागतीलच; विधिशास्त्रातील मूलभूत तत्त्वांचा फेरविचारही करावा लागेल.

**न्यायपालिकेचे स्वातंत्र्य आणि विश्वासार्हता**

कार्यपालिकेहून न्यायपालिका वेगळी हवी, स्वतंत्र हवी; कार्यपालिकेने दिलेल्या चुकीच्या आदेशांचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार न्यायपालिकेला हवा, हे आज सर्वमान्य झालेले आहे. न्यायपालिका वेगळी, स्वतंत्र हवी; कारण तिला कार्यपालिकेच्या कामाचे तटस्थपणे पुनर्विलोकन करता यावे म्हणून. दुसरे म्हणजे कार्यपालिकेचा कोणताही दबाव न्यायपालिकेवर येऊ नये यासाठीही ती स्वतंत्र असणे आवश्यक आहे. भारतीय राज्यघटनेने न्यायपालिकेचे हे स्वातंत्र्य मान्य केले आहे व कार्यपालिकेने त्याचा आदर करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. आपल्या सुमारे साठ वर्षांच्या घटनात्मक अस्तित्वात असे अनेक प्रसंग आले, की ज्यावेळी न्यायपालिकेला कार्यपालिकेतील सत्ताधाऱ्यांनी अंकित करण्याचे प्रयत्न केले. आपल्याला सोयीचे निर्णय न देणाऱ्या न्यायाधीशांची सेवा ज्येष्ठता डावलण्याचे किंवा त्यांच्या बदल्या करण्याचे प्रकार झाले. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या नियुक्तीबाबत मुख्य न्यायाधीशाकडून शिफारशी आल्या आणि त्यात आपल्याला हवी ती माणसे नसतील, तर त्या फाईली दडपून ठेवून नियुक्त्या लांबवण्याचेही प्रकार झाले. न्यायाधीश नियुक्तीबाबत अंतिम शब्द कोणाचा या प्रश्नाची चर्चा सर्वोच्च न्यायालयात दोन-तीन प्रकरणांत होऊन शेवटी न्यायपालिकेचे मतच याबाबत अंतिम मानले पाहिजे असे नि:संदिग्धरीत्या ठरवण्यात आले. न्यायपालिकेचे स्वातंत्र्य अबाधित राहावे, यासाठी जवळपास पुरेशा तरतुदी आज अस्तित्वात आहेत; परंतु केवळ कायद्यातील तरतुदींनीच स्वातंत्र्य टिकत नसते. स्वातंत्र्य टिकवायला अशा तरतुदी फक्त मदत करतात. आवश्यक असतो, तो आपले स्वातंत्र्य टिकवण्याचा न्यायाधीशांचा निर्धार आणि त्यासाठी किंमत देण्याची तयारी. निवृत्तीनंतर आपल्याला काही मिळावे म्हणून जर कोणी स्वत:च आपले स्वातंत्र्य सोडून द्यायला निघाले तर त्याचे स्वातंत्र्य कोण आणि कसे जपणार?

सरंजामदारी व्यवस्थेत राजाला त्याच्या दोन सामान्य प्रजाजनांच्या भांडणात काहीच स्वार्थ नसल्यामुळे तो नि:पक्षपातीपणे वागणे साहजिक व सोपे होते. भारतात इंग्रजांची राजवट आल्यानंतर न्यायाधीश इंग्रज आणि पक्षकार भारतीय. या दृश्यामुळे न्यायाधीश स्वतंत्रपणे व नि:पक्षपातीपणे न्याय देतील, असा एक समज आपोआपच निर्माण झाला. अपवाद तेव्हाही घडत होते, नव्हते असे नाही. 'दि रेकॉर्ड ऑफ क्रिमिनल केसेस अॅज बिटवीन यूरोपियन्स अँड नेटिव्हज् फॉर द लास्ट हण्ड्रेड इयर्स' हे रामगोपाल संन्याल यांचे पुस्तक १८९६ साली कलकत्त्याहून प्रसिद्ध झाले आहे. त्यात एतद्देशीय आणि युरोपीय पक्षकार यांच्यात न्याय देताना इंग्रज न्यायाधीशांनी केलेल्या भेदभावाची अनेक उदाहरणे दिली आहेत. महाराष्ट्रात एका ब्रिटिश अंमलदाराने सहज उडवलेल्या बंदुकीच्या गोळीने प्राण गेलेल्या एका भारतीय खेडुताच्या प्रकरणाबद्दल 'केसरी'ने न्यायालयीन निर्णयाबद्दल केलेल्या टीकेसाठी 'केसरी'वर झालेला खटला प्रसिद्ध आहे.

“

**दारू पिऊन वाहन चालवून जर अपघात केला, तर किमान दहा वर्षांची शिक्षा हवी. त्यात कोणाचा मृत्यू झाला, तर जन्मठेप देता यावी. दारू पिऊन वाहन चालवणाऱ्याचा परवाना निदान दहा वर्षांसाठी रद्द करावा. जे पालक आपल्या अज्ञान पाल्यांना मोटारसायकली घेऊन देतील, त्यांना किमान मोटारसायकलीच्या किंमतीइतका दंड हवा. रस्त्यावर कचरा आणून टाकणाऱ्यांना जरब बसेल असा दंड हवा. भेसळ करणाऱ्यांना, गायी-म्हशींना हार्मोन्सची इंजेक्शने देऊन दुपारी ग्राहक आले, की दूध काढणाऱ्यांना, पिण्याच्या पाण्याच्या साठ्यात सांडपाणी सोडणाऱ्याना जबरदस्त शिक्षा हवी. उत्सवाच्या नावाखाली वृद्ध आणि आजारी लोकांना आणि लहान मुलांना जगणे अशक्य होईल असे प्रचंड आवाजाचे ध्वनिक्षेपक लावणाऱ्या कार्यकर्त्यांना चाप न लावणाऱ्या पोलिसांना ताबडतोब निलंबित करण्याची कायद्यातच तरतूद हवी.**

”

न्यायालयाचा नि:पक्षपातीपणा गृहीत धरला जाण्याची काही कारणे आहेत. एक तर न्यायाधीशाचा पक्षकारांशी संबंध नसतो, तो त्यांना ओळखतही नाही. दुसरे म्हणजे एखाद्या विशिष्ट बाजूकडून निर्णय देण्यात त्याचा काही स्वार्थ नसतो आणि तिसरे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे आपण न्यायाधीश आहोत; तेव्हा नि:पक्षपातीपणे व विवेकबुद्धीने न्याय देणे हे आपले कर्तव्य आहे याची जाणीव न्यायाधीशाला आहे, असे गृहीत धरले जाते. यांतली एखादीही गोष्ट जर प्रत्यक्षात अस्तित्वात नसेल तर न्याय नि:पक्षपाती राहू शकणार नाही. न्यायाधीश म्हणून आपण नि:स्पृह राहावे ही नैतिक मानसिकता टिकणे फार महत्त्वाचे आहे. न्यायव्यवस्थेत अपवाद पूर्वीही होते व आताही आहेत. एखाददुसऱ्या न्यायाधीशाच्या व्यक्तिगत स्वार्थाने त्याच्या कर्तव्यावर मात केली, असे प्रकार पूर्वीही पण क्वचित घडत होते. आज एक तर अशा प्रकारांचे प्रमाण वाढले आणि त्यांची चर्चा उघडपणे होऊ लागली. 'आता कोर्टात गेल्याशिवाय मला न्याय मिळणार नाही', हे वाक्य वैतागलेल्या सामान्य माणसाच्या तोंडी पूर्वी नेहमी येई. या त्याच्या उद्‌गारात न्यायसंस्थेसंबंधी त्याला वाटणारा विश्वास प्रगट होत असे. आज न्यायालयीन प्रक्रियेत होणारा अक्षम्य विलंब, एकूणच समाजात वाढत चाललेला भ्रष्टाचार व त्याची न्यायक्षेत्रालाही लागण होऊ घातल्याचा सामान्य माणसाच्या मनातील संशय, गेल्या काही दिवसांत काही उच्चपदस्थांच्या वर्तनाविषयी होत असलेली जाहीर चर्चा, या सर्वांमुळे आज न्यायसंस्थेची विश्वासार्हता आणि उपयुक्तता यांना धक्का पोहोचण्याचा संभव निर्माण झाला आहे.

**कोसळू पाहणारी फौजदारी न्यायव्यवस्था**

न्यायसंस्थेच्या विश्वासार्हतेला अस्थिर करणारी आणि उपयुक्ततेला शंकास्पद ठरवणारी एक गंभीर बाब म्हणजे आमची फौजदारी न्यायव्यवस्था. आपल्या एखाद्या कुटुंबियाला कोण्या गुंडाने ठार मारलेले असते; किंवा आपल्यालाच मारहाण झालेली असते; अगर आपली प्रतिष्ठा कुस्करून टाकलेली असते, अशा खटल्यात आरोपीला शिक्षा झालीच पाहिजे, अशी फिर्यादी आणि त्यांचे कुटुंबीय यांची मनोमन अपेक्षा असते. ज्याने धडधडीत गुन्हा केला तो निर्दोष ठरवला जाऊन उजळ माथ्याने आपल्याला खिजवण्यासाठी बाहेर येतो हे दृश्य त्यांना किती व्यथित करीत असेल याची आपण कल्पना करू शकतो. दिवाणी दाव्यात ज्या संपत्तीच्या मालकीचा निकाल होणार असतो, तिच्याबद्दलची अभिलाषा दोनही पक्षकारांना असतेच; परंतु फौजदारी खटल्यात गुन्ह्याला बळी पडलेल्यांचे नातेवाईक आरोपी भावनात्मकदृष्ट्या फारच अधिक गुंतलेले असतात. फौजदारी व्यवस्थेशी परिचित असलेल्या आपल्या सर्वांची अशी अपेक्षा असते, की बहुसंख्य खटल्यात आरोपींना शिक्षा व्हावी; थोड्या आरोपींविरुद्ध बिनतोड पुरावा नसल्यामुळे त्यांना न्यायालयाने संशयाचा फायदा देऊन मुक्त करावे आणि अगदीच अपवादात्मक खटल्यात निर्दोष लोकांवर खोटा खटला दाखल केल्याचे आढळून आल्याने त्यांची मुक्तता व्हावी. आज असे चित्र आपल्याला दिसत नाही. भारतात घडणाऱ्या फौजदारी गुन्ह्यांची आणि त्याबद्दल उभ्या केलेल्या खटल्यांची नोंद ठेवणारे एक राष्ट्रीय अभिलेखागार आहे. या अभिलेखागाराने प्रसिद्ध केलेल्या २००७ च्या आकडेवारीनुसार, न्यायालयात दाखल होणाऱ्या शंभर प्रकरणांपैकी फक्त सहा खटल्यांत आरोपींना शिक्षा होते आणि उरलेले ९४ खटल्यांतील आरोपी निर्दोष मुक्त होतात. अगदी अलीकडील आकडेवारी परिस्थितीत सुधारणा झाल्याचे सांगते. आता १६ ते १७ टक्के खटल्यात शिक्षा होतात. या वस्तुस्थितीतून काय निष्कर्ष काढता येतील? काही अनुमाने मनात येतात. आमची पोलिस यंत्रणा बहुतेक निर्दोष लोकांवर खटले भरते काय? मुद्दाम सदोष तपास करून पोलिसच आरोपींची सुटका होण्याचा मार्ग तयार करतात काय? पोलिसांसमोर खोटी जबानी देणाऱ्या साक्षीदारांचे मतपरिवर्तन न्यायालयात होऊन ते खरे सांगण्याला प्रवृत्त होतात काय? न्यायाधीशांमध्ये जरा जादाच क्षमाबुद्धी आली आहे काय? की समाजात निर्माण झालेल्या भयानक रोगांपैकी काहींनी न्यायसंस्थेतही शिरकाव केलेला आहे? यांतले कोणतेही अनुमान खरे असेल, तर ती अतिशय गंभीर गोष्ट आहे. न्यायसंस्थेचे आणि कायद्याचे अस्तित्व समाजात शांतता आणि सुव्यवस्था राखणे आणि नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेचे रक्षण करणे यांसाठीच आहे. तोच उद्देश आज असफल होत आहे, असे चित्र दिसते आहे. दुसरीकडे गुन्ह्यांचे प्रमाण मात्र वाढते आहे. २००७ साली पंचाहत्तर लाखांहून अधिक तक्रारी पोलिसांकडे नोंदवण्यात आल्या. त्यांत सत्तावन्न लक्षांहून अधिक दखलपात्र म्हणजे गंभीर गुन्ह्याच्या होत्या, म्हणजे दर हजार लोकसंख्येच्या मागे पाच गंभीर गुन्हे घडले आहेत. कोणतेही परिणामकारक व कार्यक्षम शासनच अस्तित्वात नाही, असे वाटावयास लावणारी ही परिस्थिती आहे.

फौजदारी गुन्ह्यातून बहुसंख्य आरोपी का सुटतात, याची अनेक कारणे आहेत. अर्ल स्टॅन्ले गार्डनर यांच्या कादंबऱ्यात मंगळवारी गुन्हा घडतो, शुक्रवारी तपास पूर्ण होऊन आरोपीला न्यायालयात हजर करण्यात येते आणि सोमवारी खटला सुरू होतो. अशी अवस्था आपल्याकडे शक्यतेच्या कोटीत तरी कधी येईल काय? कोर्टात प्रकरण दाखल झाल्यानंतर दोन-अडीच वर्षांनी ते सुनावणीस येणार असेल आणि तोपर्यंत गुन्हेगार दादाच्या छायेतच आरोपी त्याच वस्तीत अगर झोपडपट्टीत राहणारा असेल, तर तो दादाच्याविरुद्ध जबानी कशी देणार? फिर्यादीची म्हणजे गुन्ह्याला बळी पडलेल्या व्यक्तीची बाजू मांडण्यासाठी उत्तम जाणकार वकील नेमण्याऐवजी मर्जीतील मंडळी सरकारी वकील म्हणून जर नेमली गेली, तर न्यायालयासमोर गुन्ह्याला बळी पडलेल्यांची बाजू चांगली कशी मांडली जाईल?

सर्वच दोष पोलिसांचा नसतो. त्यांनाही काही अडचणी असतात. पोलिसांची अपुरी संख्या, त्यांना पुरवण्यात आलेली कालबाह्य सामुग्री, त्यांच्यावर सोपवण्यात आलेली चळवळींच्या नियंत्रणापासून बड्यांच्या सुरक्षितेपर्यंतची वेगवेगळ्या प्रकारची कामे आणि त्यामुळे मागे पडणारा गुन्ह्यांचा तपास, होणारे राजकीय हस्तक्षेप या सर्व गोष्टींचा परिणाम होतच असतो. गुन्हा घडल्याबरोबर कोणाचीही गय करणार नाही असे जाहीर आश्वासन

आणि नंतर तपास थांबवणे किंवा खटलाच मागे घेणे असे होणारे प्रकार आपल्या परिचयाचे आहेत. काही वेळा नागरिक आणि त्यांचे प्रतिनिधी किंवा पत्रकारही या अवघड परिस्थितीत भर घालतात. ज्या गोष्टीची चौकशी एखादा मॅजिस्ट्रेट आठ दिवसांत करू शकतो, त्या चौकशीला उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींला नेमा, अशी मागणी होते आणि वेळही जातो आणि खर्चही वाढतो. मात्र अशी मागणी काही वेळा प्रतिपक्षाच्याही (सरकारच्या) पथ्यावर पडते; कारण त्यामुळे कालहरण होते, लोकभावना शांत होतात. प्रकरणच विस्मरणात जाते.

**केवळ पुस्तकातच राहणारे कायदे**

कायद्याची व्यवस्था एका स्थूल तत्त्वज्ञानाच्या पायावर उभी असते. समाजाला मान्य असलेली किंवा समाजाला आदर्श वाटणारी मूल्ये कायदा स्वीकारतो आणि त्याआधारे नियम तयार होतात. कालांतराने कायदा तसाच राहतो आणि समाजाची मूल्ये बदलतात, अशावेळी कायदा निष्प्रभ ठरतो. तो कित्येकवेळा पुस्तकात शिल्लक राहतो, तांत्रिकदृष्ट्या अमलातही असतो; पण त्यावर अंमलबजावणी होतच नाही. अल्पवयीन मुलामुलींच्या लग्नाला प्रतिबंध करणारा कायदा १९२९ साली अंमलात आला. भारताच्या अनेक प्रांतांत आजही त्याची अंमलबजावणी होत नाही. अगदीच लहान वयाच्या मुलामुलींची लग्ने अगदी सर्रास होतात. अल्पवयीन मुलीचे लग्न तिच्या प्रकृतीला धोकादायक आहे, हे वैद्यकशास्त्राने सांगितले आहे आणि आधुनिक समाज विचारांतही मान्य झाले आहे; परंतु लोकशिक्षण अजिबात नसल्यामुळे आणि लोकशिक्षणाची जबाबदारी असलेल्या राजकीय नेतृत्वाला यात लक्ष घालण्याचा धोका नको असल्यामुळे लोकांना त्यात काहीच गैर वाटत नाही. हुंडा घेणे अगर देणे हा गुन्हा आहे; पण अगदी प्रतिष्ठित कुटुंबांतसुद्धा या ना त्या स्वरूपात हुंडा घेतला जाण्याचे प्रकार होतात; कारण आपण काही पाप करतो असे कोणालाच वाटत नाही.

**नवे कायदेच हवेत असे नाही; विधिशास्त्राच्या काही पायाभूत तत्त्वांचाही फेरविचार करावा लागेल. पाणी ही आपण संपत्ती मानतो. पाण्यावर व्यक्तिगत मालकी असू शकते. पुढील काळात कदाचित विधिशास्त्र पाण्यावरील खासगी मालकी मान्य करणार नाही. हवा जशी सर्वांच्या मालकीची तसेच कदाचित पाण्याबद्दल ठरवावे लागेल. संपत्तीच्या अधिकारापेक्षा जीवनाच्या अधिकाराला प्राधान्य द्यावे लागेल. विधिशास्त्राचे पुनर्लेखन करण्याचा काळसुद्धा फार लांब नाही.**

काही कायदे मूल्यदृष्ट्या योग्य असतात, परंतु त्यांच्या अमलबजावणीत एक तर अडचणी असतात; किंवा ते अंमलात आले तर ज्यांच्या रक्षणासाठी ते केले; त्यांनाच त्रास होण्याचा संभव असतो. बालकांना मजुरी करावयास भाग पाडणे आपल्या राज्यघटनेला मान्य नाही. त्याविरोधात कायदेसुद्धा आहेत; परंतु तरीही फटाक्याच्या कारखान्यापासून गालीचे विणण्याच्या कामापर्यंत शेकडो बालके कामगार म्हणून काम करीत आहेत. कमी पैशात काम होते, म्हणून लहान मुलांना कामावर घेणारांना कडक शिक्षा झाल्या पाहिजेत; परंतु काही वेळा परिस्थिती अशी असते, की मुलाने थोडेफार काम केले, तरच त्याला आणि त्याच्या कुटुंबीयांना जगणे शक्य होते. बाप हयात नसतो अगर पूर्णपणे व्यसनाधीन झालेला असतो. घरी आई आजारी असते. अशावेळी १३-१४ वर्षांचा मुलगा एखाद्या उपहारगृहात किंवा कुठे तरी काम करतो. आपल्याकडे सामाजिक सुरक्षेची फारशी व्यवस्थाच नाही. ज्या बालकांना श्रम केल्याशिवाय जगणेच अशक्य आहे त्यांना निर्वाहभत्ता देण्याची आपल्याकडे व्यवस्था नाही.

काही वेळा कायदे करताना प्रत्यक्ष वास्तवाकडे लक्षच दिलेले नसते. अगर बदललेल्या वास्तवाची दखल घेतलेली नसते. खासदार-आमदारांच्या निवडणुकीसाठी खर्चाची मर्यादा कायद्यात सांगितलेली आहे. ती मर्यादा खरोखरच पाळून निवडून आलेले खासदार फारच थोडे असतील. हल्ली पक्ष म्हणजे तिकीट मागणारांचा मेळा, अशी व्याख्याच मुळी एकाने केली आहे. बिनपैशाचे कोणी प्रचाराला येत नाही. छपाईचे दर वाढलेले, सभा घेण्याला माणसे ट्रकमध्ये आणावी लागतात, स्टेज उभारण्याला हजारो रुपयांचा खर्च होतो. हा उघड दिसणारा खर्च कायद्यातील मर्यादेच्या किती तरी पट होतो. मतांचे भाव दर निवडणुकीत निघतात आणि उमेदवार कोटींनी खर्च करतात. निवडणूक खटल्यातच फक्त त्याची चर्चा होते. पुरावा फारसा मिळत नाही आणि कायदा पुन्हा पुस्तकातच राहतो.

आपल्याकडे भ्रष्टाचारप्रतिबंधक कायदे आहेत. त्यांची अमलबजावणी काय होते? कोणत्यावेळी भ्रष्टाचाराबद्दल तक्रार केली जाते? एखाद्याकडून खंडणी वसूल करण्यासाठी भ्रष्टाचारविरोधाचे सोंग घेणारेही निर्माण होतात. प्रत्यक्षात आपण सर्वत्र तडजोडी करतो. डी.एड.ला प्रवेश मिळवण्यापासून प्राध्यापकाची नोकरी मिळवण्यापर्यंत लाखालाखांचे भाव असतात. देणारा गरजू असतो आणि घेणारा सामर्थ्यवान असतो. कायदा सुखाने पुस्तकात नांदत असतो. रेल्वेत जागा मिळवण्यापासून नगरपालिकेची बांधकाम परवानगी मिळवणे; अगर बेकायदेशीर बांधकामाकडे डोळेझाक करणे, यासाठी थोडे पैसे दिले की चालते. दिलेल्या पैशाच्या तुलनेत आपला फायदा किती, याचा व्यावहारिक हिशेब आपण करायला शिकलो आहोत.

बऱ्याच कायद्यात आकस्मिक परिस्थितीत उपाययोजना करता यावी, म्हणून राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला काही अधिकार दिलेले असतात. या इच्छाधिकारांचा काय वापर होतो? नगररचना व विकास यांच्यासाठीच्या कायद्यात असे अधिकार आहेत. मान्य झालेल्या आराखड्यात मोकळ्या सोडलेल्या जागा अगर आराखड्यात दाखवलेले आरक्षण नंतर कसे बदलले जाते? सरकारला दिलेला इच्छाधिकार हा भ्रष्टाचाराचे साधन होऊ लागला, तर असे अधिकार कायद्यात देणे कितपत योग्य ठरेल, याचा विधिशास्त्राने विचार करण्याची आवश्यकता आहे.

**नव्या कायद्यांची गरज**

परिस्थिती जशी बदलते तसतसे कायदे बदलावे लागतात. आज ही प्रक्रिया थांबलेली आहे; किंवा निदान अतिशय संथपणे चालू आहे. त्यावेळी वाहने कमी होती, अपघात कमी होत होते तेव्हा निष्काळजीपणे वाहन चालवण्यासाठी दोन वर्षांची कमाल शिक्षा पुरेशी होती. तीही कोणी देत नसे. साधारण सहा महिन्यांपेक्षा जास्त शिक्षा होतच नसत. आज दारू पिऊन, वेगाची झिंग येऊन, मोबाईलवर बोलत बोलत गाड्या चालवल्या जातात, त्यात माणसे मरतात. सर्वसाधारणत: अशा खटल्यात पोलिस फक्त निष्काळजीपणाने गाडी चालवण्याचा आरोप ठेवतात व चार-दोन महिन्यांची शिक्षा किंवा दंड होऊन आरोपी मोकळा होतो. एखादा आरोपी कोणी चित्रपट कलावंत असेल, किंवा एखाद्या खटल्यात फारच आरडाओरडा झाला तर पोलिस मग सदोष मनुष्यवधाचाही आरोप ठेवतात. आज अशा गुन्ह्यांचे प्रमाण खूपच वाढले आहे. दारू पिऊन वाहन चालवून जर अपघात केला, तर किमान दहा वर्षांची शिक्षा हवी. त्यात कोणाचा मृत्यू झाला, तर जन्मठेप देता यावी. दारू पिऊन वाहन चालवणाऱ्याचा परवाना निदान दहा वर्षांसाठी रद्द करावा. जे पालक आपल्या अज्ञान पाल्यांना मोटारसायकली घेऊन देतील, त्यांना किमान मोटारसायकलीच्या किंमतीइतका दंड हवा. रस्त्यावर कचरा आणून टाकणाऱ्यांना जरब बसेल असा दंड हवा. भेसळ करणाऱ्यांना, गायी-म्हशींना हार्मोन्सची इंजेक्शने देऊन दुपारी ग्राहक आले, की दूध काढणाऱ्यांना, पिण्याच्या पाण्याच्या साठ्यात सांडपाणी सोडणाऱ्याना जबरदस्त शिक्षा हवी. उत्सवाच्या नावाखाली वृद्ध आणि आजारी लोकांना आणि लहान मुलांना जगणे अशक्य होईल असे प्रचंड आवाजाचे ध्वनिक्षेपक लावणाऱ्या कार्यकर्त्यांना चाप न लावणाऱ्या पोलिसांना ताबडतोब निलंबित करण्याची कायद्यातच तरतूद हवी.

कायदे पुष्कळ बदलावे लागतील, पण त्यासाठी आमच्या विधिमंडळाला वेळ हवा. आज विधिमंडळात जे चालते ते फार चिंताजनक आहे. किती वेळ फुकट जातो? गांभीर्यपूर्वक किती कामकाज होते? दुसरी अडचण अशी, की आमदार-खासदारांसारख्या लोकप्रतिनिधींना विधिमंडळाच्या कामकाजात रस घेण्याऐवजी, लोकांची कामे मंत्रालयात आणि अधिकाऱ्यांकडून करून घेण्यासाठी संपर्काधिकारी म्हणूनच जास्त वेळ काम करावे लागते. लोकही त्यासाठीच त्यांना मते देतात. कायदे करण्यासाठी वेगळा प्रतिनिधी आणि कामे करून घेण्यासाठी वेगळा प्रतिनिधी अशी दोन वेगवेगळी पदे निर्माण करता येणार नाहीत. मग यात काही संतुलन राखावे लागेल. राजकीय पक्षांना तर वेळच नाही. आपल्या प्रतिनिधींचे शिक्षण करावे; त्यांना प्रचलित प्रश्नांची माहिती द्यावी; सभागृहात कसे वागावे ते सांगावे, हे काम खरे तर राजकीय पक्षांचे आहे; पण आता इतका वेळ कोणालाच नाही. नवीन कायदा होताना त्याचा मसुदा विचारार्थ प्रसृत करण्याची प्रथा आहे. काही वेळा त्याच्या प्रती वकील संघाकडेही पाठवण्यात येतात. वकील संघांच्या सभासदांनी त्यावर चर्चा करावी व आपले मत कळवावे, अशी अपेक्षा असते. या तज्ज्ञांची मदत विधिमंडळांना अपवादानेच मिळते.

नवे कायदेच हवेत असे नाही; विधिशास्त्राच्या काही पायाभूत तत्त्वांचाही फेरविचार करावा लागेल. पाणी ही आपण संपत्ती मानतो. पाण्यावर व्यक्तिगत मालकी असू शकते. पुढील काळात कदाचित विधिशास्त्र पाण्यावरील खासगी मालकी मान्य करणार नाही. हवा जशी सर्वांच्या मालकीची तसेच कदाचित पाण्याबद्दल ठरवावे लागेल. संपत्तीच्या अधिकारापेक्षा जीवनाच्या अधिकाराला प्राधान्य द्यावे लागेल. विधिशास्त्राचे पुनर्लेखन करण्याचा काळसुद्धा फार लांब नाही.

**स्वतंत्र न्यायव्यवस्थेला पर्याय नाही**

न्यायव्यवस्थेत कितीही दोष निर्माण झाले असले तरी त्याला दुसरा पर्याय मात्र उपलब्ध नाही. स्वतंत्र न्यायव्यवस्था हीच घटनात्मक लोकशाही समाजाचा आधार असणार आहे. आज निर्माण झालेले दोष कसे दूर करता येतील, याचा विचार गांभीर्याने करावा लागेल. न्यायाधीश, वकील आणि पोलिस यंत्रणा या सर्वांची विश्वासार्हता पुन्हा एकदा बलवान करावी लागेल. न्यायव्यवस्थेला जे पर्याय नागरिक शोधतात ते सध्याच्या व्यवस्थेपेक्षाही अधिक भयानक आहेत. भाडेनियंत्रण कायद्याखाली घर रिकामे करून घेण्यासाठी न्यायालयात पाच-सात वर्षे लागणार असली, तर एखाद्या गुंडाला सुपारी देता येते. कर्ज वसूल करण्यासाठी काही बँकांनी तर आपल्या पदरी गुंडच बाळगले होते. हे प्रकार चांगले तर नाहीतच; पण क्षम्यही नाहीत. कायदा हातात घ्यायचे ठरले आणि कायद्याला बगल देउन पर्याय निर्माण करायचे ठरले तर त्यातून सज्जनांचा काहीच फायदा होणार नाही. अंतिमत: गुंडांचेच फावेल. गुन्हेगारांना शासन करणारे झुंजार किंवा काळापहाडासारखे पर्याय अर्नाळकरांच्या कादंबरीत असतात. प्रत्यक्षात दुष्टांचे निर्दालन करता करता आजच्या काळातले झुंजार सज्जनांचे गळे धरत असतात.

न्यायाधीशांना काम करताना आणखी एका अडचणीला तोंड द्यावे लागते. बरेचसे कायदे ज्या परिस्थितीत झाले, ती परिस्थिती आता अस्तित्वात नसते. बदललेल्या परिस्थितीत लगेच कायदा बदलावा किंवा नव्या गरजांसाठी नवे कायदे करावेत, एवढी सवड विधिमंडळांना नसते. मग शक्य तेथे जुन्या शब्दांचा नवा अर्थ न्यायालयांना लावावा लागतो. भारतीय घटनेने कलम २१ मध्ये जीविताचा अधिकार दिला आहे. हा जीविताचा अधिकार म्हणजे केवळ पशुवत् शारीरिक अस्तित्व नव्हे; मानवी सन्मानाला सुसंगत असे जीवन जगण्याचा हा अधिकार आहे असे सांगत आम्ही शिक्षणापासून पर्यावरणापर्यंत अनेक प्रकारचे अधिकार जीविताच्या अधिकारात समाविष्ट केले. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. पण न्यायालयांनी केलेल्या या अधिकारविस्ताराला मर्यादा असतात. विधिमंडळांनी आपला अधिक वेळ आपल्या मुख्य कामासाठी म्हणजे नव्या समाजाची नवी गरज लक्षात घेऊन कायदे करण्यासाठी दिला पाहिजे आणि ते होईपर्यंत न्यायालयांनी आपल्या मर्यादा लक्षात घेऊन का

होईना पण कायद्यातील शब्दांना सजीव मानत त्यांना नवा अर्थ दिला पाहिजे.

**जुन्या शब्दांना नवे अर्थ**

एखाद्या तरतुदीचा अर्थ पूर्वी लावला असेल, तर तो तसाच लावण्याकडे न्यायालयांचा कल असतो. पूर्वीचे निवाडे अगर 'प्रिसिडेंटस्' महत्त्वाचे असतात, त्यामुळे न्यायालयीन दृष्टिकोनाचे सातत्य दिसते आणि न्यायालयाच्या विश्वासार्हतेलाही ते उपयुक्त असते; परंतु जेथे संदर्भच पूर्ण बदलून गेले तेथे 'प्रिसिडेंट' थोडा बाजूला सारता येतो का, याचा विचार केला पाहिजे. वकील आणि न्यायाधीशांच्या मनावर या 'प्रिसिडेंट'चा जो पगडा आहे, त्याचे जोनाथन स्वीफ्टने 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स' या आपल्या जगप्रसिद्ध पुस्तकात फार चांगले वर्णन केले आहे.

'इट इज ए मॅक्झिम अमंग लॉयर्स, दॅट व्हाटएव्हर हॅथ बीन डन बिफोर मे लीगली बी डन अगेन; ॲण्ड देअरफर दे टेक स्पेशल केअर टू रेकॉर्ड ऑल द डिसिजन्स फॉर्मर्ली मेड अगेंस्ट कॉमन जस्टिस ॲण्ड द जनरल रीझन ऑफ मॅनकाईंड. दीज अण्डर द नेम ऑफ प्रिसिडंटस्, दे प्रोड्यूस ऑथॉरिटीज टू जस्टिफाय द मोस्ट इनिक्टिस ओपीनिअन्स, ॲण्ड द जजेस नेव्हर फेल ऑफ डायरेक्टिंग ॲकॉर्डिंगली.' (वकील मंडळींमध्ये असे म्हटले जाते की जे काही पूर्वी कायद्याने घडले ते पुन्हा कायदेशीर म्हणून करता येईल. त्यासाठीच ते न्याय्य आणि सर्वसामान्य माणसांच्या कल्याणाच्या विरोधात आलेल्या निकालांची काळजीपूर्वक नोंद ठेवतात. 'प्रिसिडंटस्' किंवा परंपरा या नावाखाली अन्याय्य मते आणि कृती यांच्या समर्थनार्थ ते अधिकारपदे निर्माण करतात आणि त्या पदांवरून न्यायमूर्तीही तशाच प्रकारचे निर्णय किंवा आदेश देतात.)

शब्दांचा किंवा तरतुदींचा नवा अर्थ का लावता येतो? कायद्यामध्ये अवतरणारे शब्द हे सजीव आणि प्रवाही आहेत असे मानण्याचा प्रघात आहे. त्यांचा अर्थ अपरिवर्तनीय नसतो.

'वर्ड इज नॉट अ क्रिस्टल होल्डिंग इट्स् फॉर्म ॲण्ड इट्स सबस्टन्स थ्रू द एजेस; इट इज द स्किन ऑफ ए लिव्हिंग थॉट' असे न्यायमूर्ती होम्स म्हणाले होते. हा जो 'लिव्हिंग थॉट' आहे, जिवंत विचार आहे तो न्यायाधीशांनी द्यावयाचा आहे आणि वकिलांनी त्याला मदत करावयाची आहे. हे काम जितक्या क्षमतेने होईल, तेवढी न्यायप्रक्रियेला मदत होईल. मात्र हे सोपे नाही. न्यायसंस्था हीसुद्धा एक लोकसेवेची संस्था आहे. तिचे पावित्र्य जपणे हे आपले कर्तव्य आहे, या जाणीवेबरोबरच समाजाच्या खऱ्या स्थितीबद्दलची आणि त्याच्या गरजांबद्दलची परिपक्व जाणीव आपल्या निरीक्षण आणि अध्ययनाने आपल्यात निर्माण करणे आवश्यक आहे. न्यायाधीशाला जसे मोहापासून दूर राहावे लागते, तसेच वकिलालासुद्धा राहावे लागते. त्यासाठी लागणारा संयम न्यायसंस्थेची मूल्यव्यवस्थाच आपल्याला देते.

आपल्या विधिशास्त्रासमोर, कायद्याच्या व्यवस्थेसमोर सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे तो मूल्यदृष्टीचा. १९४८ साली मानवीहक्काची सनद संयुक्त राष्ट्रसंघाने मान्य केली आणि आपण असे गृहीत धरले, की सर्व मानव जातीने समान मूल्ये स्वीकारलेली आहेत आणि त्यामुळे मानवाचे समान अधिकार त्यांनी मान्य केले आहेत. प्रत्यक्षात असे झालेले नाही. सर्व माणसांची समानता आणि सर्वांना समान अधिकार हे आपल्या सर्वांच्या मनानेही अजून स्वीकारले नाही. अनेक देशांत स्त्रियांना अधिकारच नाहीत. अनेक देशांत धार्मिक विश्वासाचे स्वातंत्र्यही नाही. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आपल्या घटनेला मान्य आहे; पण प्रत्यक्षात आपण न पटणारे विचार सांगणारांना कसे वागवतो? शेकडो वर्षांपूर्वी न पटणारे सत्य सांगणारांना समाजाने विष प्यायला भाग पाडले. हल्ली दहशतीचा मार्ग स्वीकारला जातो. आपल्या घटनेने बंधुत्वाचे आश्वासन दिले आहे! आपण त्याची काय वाट लावली आहे? समाजातले बंधुत्व कमी कमी होऊन तेढ कशी वाढेल, द्वेष कसा वाढेल, याकडेच आपले अधिक लक्ष हल्ली आहे. सर्व मानवजात समान मूल्ये कशी स्वीकारील हा खरा प्रश्न आहे. ज्यांना नोबेल पारितोषकाने गौरवले त्या सोल्झेनित्सिन यांनी हाच प्रश्न उपस्थित केला होता -

**आपल्या विधिशास्त्रासमोर, कायद्याच्या व्यवस्थेसमोर सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे तो मूल्यदृष्टीचा. १९४८ साली मानवीहक्काची सनद संयुक्त राष्ट्रसंघाने मान्य केली आणि आपण असे गृहीत धरले, की सर्व मानव जातीने समान मूल्ये स्वीकारलेली आहेत आणि त्यामुळे मानवाचे समान अधिकार त्यांनी मान्य केले आहेत. प्रत्यक्षात असे झालेले नाही. सर्व माणसांची समानता आणि सर्वांना समान अधिकार हे आपल्या सर्वांच्या मनानेही अजून स्वीकारले नाही.**

'बट हू इज गोईंग टू कोऑर्डिनेट दीज स्केल्स् ऑफ व्हॅल्यू ॲण्ड हाऊ इज इट टुबी डन? हू इज गोईंग टू क्रिएट फॉर ऑल मॅनकाईंड वन सिंगल सिस्टिम ऑफ व्हॅल्यूज फॉर ईव्हिल डीडस् ॲण्ड गुड डीडस्? (शतकानुशतके आपला आकार आणि गाभा कायम राखणाऱ्या स्फटिकासारखे जग नाही. जिवंत विचारावरचे ते एक आवरण आहे. मानवी मूल्यांची योग्य सांगड कोण व कशी घालणार आहे? सर्व मानवी समाजासाठी चांगली आणि वाईट कृत्ये यांची दखल घेणारी एकच मूल्यव्यवस्था कोण उभी करू शकेल?)

विधिशास्त्राला आणि आपल्या सर्वांना याच प्रश्नाचे उत्तर शोधायचे आहे.

**न्या. नरेन्द्र चपळगावकर**
१३ जयनगर, दशमेशनगरजवळ, औरंगाबाद - ४३१००५.
Tel. : 0240-2331166. Mob. : 9422712121.

■

स्मरण

नरहर कुरुंदकर

# प्रभावती कुरुंदकर

**ज्यांच्यासाठी 'विचारवंत' हे संबोधन पुरेशा गांभीर्याने वापरता येईल, त्या नरहर कुरुंदकर यांचे निधन वयाच्या ५० व्या वर्षी (१९८२ मध्ये) झाले. त्याआधी पाच वर्षे, त्यांनी त्यांच्या पत्नीवर 'ललित' मासिकात लेख लिहिला होता, तो लेख नंतर त्यांच्या 'वाटचाल' या पुस्तकात समाविष्ट केला आहे. गेल्या आठवड्यात प्रभावतीबाईंचे वयाच्या ७३ व्या वर्षी निधन झाले, म्हणून 'अप्रतिम व्यक्तीचित्रणाचा नमुना म्हणावा असा' नरहर कुरुंदकरांचा तो लेख पुनर्मुद्रित करणे औचित्यपूर्ण वाटते.**

**– संपादक**

स्वत:च्या पत्नीवर ती हयात असताना लिहिणे अतिशय कठीण आहे. 'हे लिखाण ती वाचणारच' हे माहीत असताना लिहिणे तर अधिकच कठीण आहे. जॉर्ज बर्नाड शॉ ने एके ठिकाणी असे मत दिले आहे की, 'पत्नी हयात असताना खरे बोलणे शक्य नाही आणि खोटे बोलण्याची इच्छा नाही, म्हणून मी पत्नीवर लिहीत नाही.' सत्याचा एक अंश हा आहे. 'पुरुषजातीची ही शुद्ध लबाडी आहे. कारण बायकोमाघारी काहीही लिहिले तर खोटे काय, हे सांगण्यास ती बिचारी नसते. वाटेल ते लिहिण्यास पुरुष मोकळा,' असे सौ.प्रभावतीबाई कुरुंदकर यांचे मत आहे. सत्याचा अजून एक अंश हा आहे. 'ललित'च्या संपादकांचे पत्र जेव्हा मी बाईसाहेबांना दाखवले, तेव्हा त्यांची आद्य प्रतिक्रिया अशी, ''नाही म्हणून सांगा. आता पोरे मोठे झाली. जावई आहे. आपलेच प्रेम चघळीत जगासमोर ठेवण्याची वेळ आहे का ही? संपादकाला पोच नसतो. तुम्ही थोडे शुद्धीवर रहा.'' सत्याचा एक अंश हाही आहे. तरीही मी तिला चोरून, महाविद्यालयात बसून हे लिहीत आहे. तेव्हा 'सांगेन ते खरे सांगेन, खोटे सांगणार नाही, पण सगळेच सांगणार नाही,' हे सूत्र समोर ठेवतो.

सौ.प्रभावतीबाई कुरुंदकर यांना आमच्याकडे मी सोडून सर्वजण प्रभा म्हणतात. मी फक्त 'अगं' म्हणतो. या पोरीची माझी पहिली भेट तिच्या राहत्या घरी खिडकीत उभी असताना झाली. माझे शिक्षण मामांकडे हैद्राबाद येथे झाले. डॉ.नारायणराव नांदापूरकर हे मराठवाड्यातील विद्वान प्रस्थ होते. ते माझे मामा. त्यांचे जिवलग मित्र रामचंद्रराव दुसंगे हे मॅट्रिक ट्रेंड शिक्षक. त्यामुळे दोन्ही घरची सर्व मंडळी सतत एकमेकांकडे जात-येत असत. प्रभा ही दुसंगे यांची क्रमांक दोनची मुलगी. माझ्या आईच्या आठवणीप्रमाणे मी पाच-सहा वर्षांचा असताना आई भावाकडे माहेरवासासाठी आली होती. त्यावेळी प्रभाला तिने कडेवर घेऊन खेळवले होते. त्यावेळी ती दीड-दोन वर्षांची होती. सासू-सुनेची भेट अशी जुनी आहे. मी वयाच्या नवव्या वर्षापासून मामांकडे होतो. दुसंगे यांच्या घरी अनेकदा जात-येत असे. पण मला या खिडकीतील भेटीपूर्वी तिला कधी पाहिल्याचे आठवत नाही. पहिली ठळक आणि पुसली न जाणारी भेट जांबाच्या वाड्यातील खिडकीमधली. आश्चर्य हे की तिलाही यापूर्वी कधी मला पाहिल्याचे आठवत नाही. या पहिल्या भेटीच्या वेळी मी अठरा वर्षांचा होतो. प्रभा चौदा वर्षांची होती. दोघांचेही वाढदिवस एकाच दिवशी येतात.

लहानपणापासून मी मित्रमैत्रिणींच्या मेळाव्यात वावरणारा माणूस. आजही हा घोळका भोवती आहेच. प्रभा माझी विवाहापूर्वीची मैत्रीण नव्हे, पण जिच्याशी लग्न करण्याची उत्कट इच्छा निर्माण झाली ती ही पहिली मुलगी. या इच्छेनुसार लग्न झाले. या घटनेला पंचवीसहून अधिक वर्षे उलटून गेली, पण या मुलीशी आपण लग्न केले, याचा अजून पश्चात्ताप झालेला नाही. उद्याची हमी कोण देणार? ('अहो, त्यांना कशाला पश्चात्ताप होईल? भोगावे लागते मला. मला विचारा!' ही सौ.ची प्रतिक्रिया असते.)

या प्रथम भेटीच्या वेळी मी कसा होतो? इंटर नापास. नुकताच कम्युनिस्ट असल्याच्या संशयावरून चौदा दिवस कच्ची कैद भोगून आलेला. हैद्राबाद मुक्ती-आंदोलनातील विद्यार्थीनेता. नवोदित राजकीय कार्यकर्ता म्हणून व वक्ता म्हणून मी ओळखला जाई. प्रियकराचे चित्र फारसे चांगले नव्हते. पायांत वहाण नसे, म्हणून धूळ भरलेले पाय. डोके तुळतुळीत. केस नसत. लांब नाकाच्या शेंड्यापर्यंत येणारी प्रिय शेंडी, हाफ पँट आणि एक

शर्ट. या जगात माझ्या आईखेरीज मला कुणी गोरा म्हटलेले नाही. स्वभाव रागीट, उग्र, वावदूक. प्रियकराचे हे चित्र आकर्षक नाही हे मला कळते, पण सत्य हेच आहे. प्रभावती सातव्या वर्गात होती. शाळेला जाताना परकर असे. घरी भावांचे शर्ट व हाफ पँट असे. प्रथम भेटीच्या वेळी ती हाफ पँटमध्येच होती. 'प्रभा गोरी व नाजूक आहे' असे आमच्याकडील सर्वांचे मत आहे. मात्र हे गोरेपण देशस्थांचे, कोकणस्थांचे नव्हे. पहिल्या भेटीतच ती मला आवडली. मीही तिला आवडलो. ह्याला प्रथमदर्शनी प्रेम म्हणायचे असेल तर माझी हरकत नाही. आम्ही एकमेकांना आवडलो याचा पुरावा काय? मी हसलो, ती हसली. ती एक कच्चा पेरू खात होती. मी खुणेने तो मागितला. तिने खिडकीतून पेरू फेकला. मी गच्चीत उभा होतो. मी तो पेरू झेलला. प्रथम भेट ही अशी. (दाता मी होते. याचक तू होतास. जन्मभर हेच, चालणार, हे मला तरी कुठे कळले? वय लहान होते ना? इति. सौ.)

हे आवडणे पुढे सतत चार वर्षे चालू होते. ती मला पाहून हसे. मी तिला पाहून हसे. भेटीचे ठिकाण : वाहता रस्ता. वेळ : ती शाळेला जाताना, शाळेतून परतताना. रस्त्याच्या एका कडेने ती मैत्रिणींसह जाई. दुसऱ्या कडेला मी. याहून वेगळ्या भेटीगाठी नव्हत्या. पत्र अगर चिठ्ठी नव्हती. बोलणे नव्हते. आणि तरी एक दिवस धाडस करून मी विचारले आणि लग्न ठरले. पहिली भेट होताच आकर्षण पक्के. पहिले बोलणेच हे की, 'तू माझ्याशी लग्न करशील का?' आणि मग ठाशीव होकार. यामुळे गप्पा, भेटी, परस्परांना समजून घेणे इत्यादी बाबींना आरंभ लग्न ठरल्यावर झाला. (ह्या घटनेवर सौ.प्रभावतीबाई तीन प्रतिक्रिया देत आल्या. त्यांना सोय असेल ती त्या वेळची ठाम मते. 'काय मेली जीवघेणी प्रतीक्षा. साधा मुद्दा कळायला चार वर्षे लागली आणि हा म्हणे शहाणा.', 'तुम्हीच हात जोडून आला होता. मी काय मागणी घातली नव्हती.' 'वाट पाहता येत नाही त्याने या वाटेने जाऊ नये.')

सर्व आयुष्यात जाणीवपूर्वक आणि निर्धाराने ती माझ्या इच्छेविरुद्ध एकदाच वागली. त्या निर्णायक महत्त्वाच्या जागी तिने माझा पूर्ण पराभव केला. पंचवीस वर्षे तो पराभव मला डाचतो आहे. मधूनमधून क्रोध-संतापातून तो व्यक्त होतो. पण प्रभावतीवर त्याचा काहीही परिणाम होत नाही. होण्याचा संभव दिसत नाही. पत्नी आपल्याला मुळीच भीत नाही, तीवर आपला दाब नाही, उलट आपण तिला भितो हे कबूल करणे माझ्या पुरुषी अहंकाराला आवडत नाही. पण सत्य नोंदविणे भाग आहे.

माझी इच्छा ही की, तिने मॅट्रिक व्हावे. नोकरीला लागावे. स्वतंत्र स्वावलंबी असावे. संसाराची जबाबदारी घ्यावी. म्हणजे समाजसेवेला मी मोकळा राहीन. विवाह ठरला त्या वेळी ती मॅट्रिकला बसत होती. मीही मॅट्रिकच होतो. कुणालाच नोकरी नव्हती. आम्ही स्त्रीस्वातंत्र्यवादी सेवादलवाले. आम्ही सर्व नेते व अनुयायी मंडळीत नोकरी, कमाई व संसार यांची जबाबदारी गळ्यात घेऊन पत्नीने स्वतंत्र व्हावे व फक्त खर्च, व्याख्याने, गप्पा अशी समाजाची बांधिलकी आपण घ्यावी अशी रूढीपरंपरा मान्य आहे. जे सर्वमान्य आहे तेच मी तिला सांगत होतो. प्रभा बोलली काहीच नाही, पण ती मॅट्रिक नापास झाली. आजवर ती कधी नापास झाली नव्हती. बुद्धी अतिशय चांगली, पण या वेळी ती नापास झाली. मला आश्चर्य वाटले. पण प्रकाश पडला नाही. स्त्रीच्या मनातले आपल्याला लवकर कळत नाही असा माझा नित्याचा अनुभव आहे.

मी पत्नीला पुरवणी परीक्षेला बसविण्याच्या तयारीस लागलो. एक दिवस प्रभा व तिची मैत्रीण बोलत होत्या. मी शेजारच्या खोलीत आहे याची तिला कल्पना नव्हती. मैत्रिणीने विचारले, ''काय ग प्रभा, कधी नापास न होणारी तू. यावेळी नापास कशी झालीस?'' शत्रूपक्ष वयाने फार लहान आणि चतुरपणात फार ज्येष्ठ होता. बाईसाहेबांनी उत्तर दिले, ''अग, तीच तर गंमत आहे. तो मला नोकरीत अडकवून स्वत: मोकळा राहू इच्छितो. माझा संसार धड व्हायचा तर त्याला बांधणे आवश्यक आहे. मी यापुढे कधीही मॅट्रिक पास होणार नाही. पेपर लिहिणे तर माझ्या हाती आहे.'' ताबडतोब माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. त्यानंतर समजावणी, दरडावणी, विनवणी, भांडण, वैताग असे सर्व प्रकार झाले. 'तुला नोकरी करण्यास कधीही सांगणार नाही' अशी प्रतिज्ञा झाली. पण कशाचाही उपयोग झाला नाही. ती मॅट्रिक नापासच आहे. माझ्याकडे येणारी अतिशहाणी मंडळी अनेकदा इंग्रजीतून बोलतात. त्यांची समजूत अशी की, तिला इंग्रजी येत नाही. प्रभा मॅट्रिक नाही, पण तिचे इंग्रजी जवळजवळ माझ्याबरोबरचे आहे. मुद्दा बुद्धी असण्या-नसण्याचा नव्हता. मुद्दा मला नोकरीत पूर्ण गुंतविण्याचा होता. ती पूर्ण यशस्वी झाली. माझा पूर्ण पराभव झाला.

मला मुली तीन, मुलगा एक, चौघेही जण तिच्या बाजूचे. त्यामुळे सर्व भांडणांत, मतभेदांत आई व मुले मिळून शत्रूपक्षाची मते पाच होतात. आणि मी एकटा. 'तुम्ही लोकशाहीवादी ना, मग आपण प्रश्न मतदानाने सोडवू' असे आव्हान ती मला नेहमी देते. यामुळे मी नित्य पराभूतच असतो. अल्पमतातील विरोधी पक्षनेत्याकडे खेळ म्हणून ज्याप्रमाणे प्रधानमंत्री पाहतो, ती तिच्या वागण्याची पद्धत आहे. इंदिरा गांधी पंतप्रधानपदावरून खाली उतरल्या त्या आठवड्यात जेवताना मी गप्पांच्या ओघात म्हटले, ''चला, इंदिरा गांधी खाली उतरल्या, मलाही आता मुक्ततेची आशा निर्माण झाली आहे.'' मुलांना अशा वेळी हसू येते. 'अजून याला मुक्ततेची आशा आहे' हा त्यांना विनोद वाटतो. प्रभा म्हणाली, ''हे पहा, मी सत्तेतून खाली उतरेन तेव्हा तुम्हाला आग्रहाने कुणी जेऊ घालणार नाही.''

मी प्रथम नोकरीला लागलो तेव्हा माझा पगार दरमहा छप्पन्न रुपये सात आणे होता. आजच्या मानाने त्या वेळी स्वस्ताई होती. आम्ही राहतही गरिबीनेच होतो. तरीही घरखर्चाला दरमहा ७५ रुपये लागत. दीड खोलीचे घर. त्यात मी, माझा एक ब्रह्मचारी मित्र व पत्नी असे तिघेजण राहत होतो. पती-पत्नींना खाजगी बोलण्याची सोयही नव्हती. आणि हळू आवाजात खाजगी बोलण्याची सवयही नव्हती. तिलाही अशा खाजगी प्रेमकूजितांची गरज वाटली नाही.

**तिचे एक ठाम मत असे की, 'ती भाग्यवान आहे. दगड्या, धोंड्या, कचऱ्याशी जरी तिचे लग्न झाले असते तरी तो वक्ता, प्राध्यापक, लेखक झाला असता, त्याला पैसा व मान मिळाला असता.' मी विवाहाच्या वेळी बेकार होतो. इंटर, बी.ए., एम.ए. नंतर झालो. नोकरी नंतर लागली. प्राध्यापक, प्राचार्य नंतर झालो. माझा पहिला लेखसुद्धा विवाह ठरल्यावर प्रकाशित झाला. हा तिचा पुरावा आहे. या सर्व घडामोडींचा माझ्या लायकीशी अल्पही संबंध नाही. हे सारे फळ ती भाग्यवान असल्याचे आहे. कुणालाही जर तिने नवरा म्हणून निवडले असते तर हेच झाले असते, असे तिचे ठाम मत आहे. हे मत खोडून काढण्याचा मी प्रयत्न करून पाहिला, पण त्यात थोडेही यश आलेले नाही. ''जे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे, त्यावर चर्चा काय करणार?'' असे तिचे म्हणणे. हे तिचे मत मला उत्साहदायी नाही. आनंददायक तर मुळीच नाही. अधिक दु:खाची गोष्ट ही आहे की, हे आमच्या मायधार्जिण्या मुलांचेच मत नसून, प्रभाच्या सासू-सासऱ्यांचेही मत (ती भाग्यवान आहे) असेच आहे.**

---

'प्रायव्हसी' नाही अशी तक्रार तिने कधी केली नाही. ''लग्न जाहीर, बाळंतपण जाहीर, आता गुप्त काय राहिले?'' असा तिचा ठाशीव मुद्दा असे. वृथा खर्च नको म्हणून या काळात मी दीड महिन्याला न्हाव्याकडे जाई. त्यामुळे दाढी दीड महिन्याला होई, यावर तिची तक्रार नव्हती. फाटकी धोतरे मी घरी नेसे त्यावरही तक्रार नव्हती. विवाहानंतर तिने क्रमाने काही बदल केले. प्रथम म्हणजे माझी हाफ पँट गेली आणि धोतर आले. दुसरे म्हणजे शेंडी गेली डोक्यावर केस आले. शर्टखाली बनियान प्राध्यापक झाल्यानंतर आले. तिला केस ठेवणे आवडते. मी ठेवतो. मात्र मी याला पराभव समजत नाही. हा भाग तडजोडीचा.

समोर बसलेल्या विद्यार्थ्याला आकंठ तृप्त होईतो शिकवायचे, हा माझा जन्मभराचा आनंद आहे. समोरच्या विद्यार्थ्याने घेताना थकावे इतके मी ओतणार. नोकरीच्या आरंभकाळी संसार चालण्यास पैसे कमी पडत म्हणून मला नाइलाजाने शिकवण्या कराव्या लागत. शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला 'दर' सांगावा, ही गोष्ट मला अतीव यातनेची होती. पण माझा नाइलाज होता. मला शिकवणीचे पैसे बरे मिळत. नोकरीचा पगार ५६ रुपये ७ आणे, पण शिकवणीवर दरमहा शंभर रुपये मिळत. मुले पैसे आणून देत तो माझा शोकदिन असे. मध्येच एखादा विद्यार्थी म्हणे, ''गुरुजी, या महिन्यात माझा हात तंग आहे. पैसे पुढच्या महिन्यात देतो.'' मग तर मला जेवण सुचायचे नाही. झोप यायची नाही. प्रभावती हे सारे गप्प बसून पाहत होती. तिने कधी या विषयावर चर्चा करून माझी समजूत घातली नाही. नोकरीचे नवे वर्ष उजाडले आणि माझा पगार ७८ रुपये १४ आणे झाला. बाईसाहेब म्हणाल्या, ''हे पहा, आजपासून शिकवणीचे पैसे घेणे बंद. पैसे नको, तुमचे तडफडणे नको. ७५ रुपये संसाराला पुरेत. दरमहा ३ रुपये १४ आणे तुम्ही मोकळेपणाने चैनीसाठी खर्च करा.'' त्या दिवसापासून हे घर विद्यार्थ्यांना मोकळे आहे. 'या, पोटभर शिकून जा. आणि मोफत शिका.' मीही यातनामुक्त आहे.

पैशाचा मोह मला कधीच नव्हता. खूप पैसा मिळवावा असे मला कधीही वाटले नाही. पैसा जतन करावा असेही मला वाटले नाही. बरे, माझा योग असा की, मला पैसा कधी कमीही पडला नाही. प्रभावतीलाही पैशाचा मोह नाही. दागिन्यांची आवड नाही, नटणे नाही. जाहीर तर सोडा, एकांतातही 'मला हे हवे, ते हवे' अशी भाषा नाही. त्यामुळे आम्हा दोघांत पैसा हा कधी भांडणाचा विषय नव्हता. दारिद्र्य हा कधी तिच्यासाठी खंतीचा विषय नव्हता. स्वेच्छेने दारिद्र्य स्वीकारणाऱ्यांच्या वागण्यात जशी दारिद्र्याची मस्ती आणि द्रव्य व द्रव्यवान यांच्याबाबत तुच्छता असते, तशी तिची वागणूक आहे. तिची काव्यशून्य सुभाषिते नोंदवितो. ''सीता राज्य सोडून रामासह गेली, यात कौतुक करण्याजोगे काय आहे? हजारो बाया नवऱ्यासाठी दरिद्री झाल्या, त्या हजारांत एक सीता.'' ''गरजेपुरता पैसा लागतोच. तो मिळवावा. त्यापेक्षा अधिक पैशाची इच्छा असेल तर लग्न करू नये. दुकान मांडावे.'' ''जपलेला पैसा शिळा होतो. शिळ्याचा मोह धरू नये.''

तिच्या मनाचा एक कोपराच बैरागी आणि फकिराचा आहे. जगात जणू कुणाशी तिचा संबंध नाही. माहेरीसुद्धा ती कधी फारशी जात नाही. माहेरी तिचे मन रमत नाही. या पंचविसाहून अधिक वर्षांत एक अपवाद सोडला तर ती कधी सलगपणे आठवडाभर माहेरी राहिलेली नाही. लोक म्हणतात, ''तिला नवरा सोडून करमत नाही.'' ती म्हणते, ''इथे तरी नवरा कुठे असतो? परगावी असला तर घराबाहेर. घरी असला तर घोळका भोवती. अन् गावी असला तर मग आनंदच सगळा.'' पण ती माहेरी रमत नाही. अपवाद फक्त एक. प्रसूतीसाठी एकदा माहेरी गेली होती, त्या वेळचा. त्याही वेळी तीन आठवड्यांत बाळंतपण आटोपून परतली. मग इथे येऊन दोन महिने विश्रांती. माहेर असो वा सासर, ती सर्वांशी गोड बोलते. कर्तव्याला चुकत नाही. मी सोडून कुणाशी भांडत नाही. पण लिप्तपणा कुठेच नाही. कदाचित थोडा लिप्तपणा माझ्यात असावा. गावातही कुणाशी फार मैत्री नाही, भांडण नाही, जवळचे मित्र नाहीत. मैत्रिणी नाहीत. आपण, मुले, घरकाम, सततचे कष्ट हा तिच्या सवयीचा भाग आहे. आणि चेहरा नेहमी थोडा गंभीर पण प्रसन्न असतो. तो चर्येचा भाग आहे.

आज मी प्राचार्य आहे. पण पत्नी घर झाडते, स्वयंपाक करते, पाणी भरते, धुणे धुते, बाजारहाट करते. सततचे न संपणारे काम चालू असते. या कामाविषयी कुरकूर नाही. पैसा आला याचा फार आनंद नाही. गेला याचे दु:ख नाही. कर्जाची खंत नाही. गरजेपुरते मिळाले यात ती तृप्त आहे. ती माझ्याशी फार कमी बोलते. याची दोन स्पष्टीकरणे तिनेच दिलेली आहेत. ''सारेच जण वेळ खातात. मीही तेच करू लागले तर वाचावे केव्हा?'' हा खुलासा मला आवडतो. ''अडाण्याशी काय बोलावे? त्याला

व्यवहारात कळतेच काय?'' हा मला आवडत नाही. पण इलाज नाही. ऐकून घेणे भाग आहे. तिला व्यसन एकच आहे. सिनेमा पाहण्याचे. दर आठवड्यास सिनेमा पाहते. पूर्वी आठ आण्यात बसे. आता वरिष्ठ तिकिटावर बसते.

'पतीवर अपार विश्वास आहे', असा तिचा दावा आहे. तो खरा असू शकतो. पण ते सोंगही असू शकते. मी सर्व महाराष्ट्रभर हिंडत असतो. ती माझ्यासह नसते. माझ्याभोवती मित्रमैत्रिणी, विद्यार्थी-विद्यार्थिनी व चाहते यांचा घोळका सदैव राहिला. पण स्त्रीवरून कधी आमचे भांडण झाले नाही. मुंबई मराठी साहित्य संघाच्या संमेलनाचा मी अध्यक्ष होतो. त्या वेळी मात्र ती आली होती. ज्या 'मुंबई साहित्य संघा'ने मला पदवी नसताना, वयही फार नसताना, नावावर पुस्तक नसताना, व्याख्यानासाठी आमंत्रित केले होते (इ.स.१९५७), त्यांच्या संमेलनात जाणे तिला कर्तव्य वाटले. त्या आरंभाच्या काळी मंगेश पाडगावकरांनी मला घरी जेवणास बोलावले होते. याही वेळी तिने सांगितले, पाडगावकरांकडे आपण जेवणास जाऊ. तिथे आम्ही मिळून गेलो. तिला हे कर्तव्य वाटले. व्यासपीठावरही ती बसली. पण त्यात माझ्या कौतुकाचा भाव फार अल्प. ती स्वत:चे कर्तृत्व-कौतुक पाहण्यात दंग होती. मुंबई शहर तिला आवडले नाही. 'वर्दळ फार आहे' असे तिचे मत आहे. आपल्याला न आवडणारी मुंबई महाराष्ट्राची आहे असे तिचे ठाम मत आहे. मी विचारले, ''पुरावा?'' ती म्हणाली, ''माझा विश्वास हाच सर्वांत मोठा पुरावा आहे.'' प्रभावतीबाईंशी चर्चा करणे कठीण का, याचा बोध यावरून व्हावा.

तिची काही ठाम मते आहेत. त्यांपैकी काही मते मला अतिशय अप्रिय आहेत. पण ती आहेत. तिचे एक ठाम मत असे की, 'ती भाग्यवान आहे. दगड्या, धोंड्या, कचऱ्याशी जरी तिचे लग्न झाले असते तरी तो वक्ता, प्राध्यापक, लेखक झाला असता, त्याला पैसा व मान मिळाला असता.' मी विवाहाच्या वेळी बेकार होतो. इंटर, बी.ए., एम.ए. नंतर झालो. नोकरी नंतर लागली. प्राध्यापक, प्राचार्य नंतर झालो. माझा पहिला लेखसुद्धा विवाह ठरल्यावर प्रकाशित झाला. हा तिचा पुरावा आहे. या सर्व घडामोडींचा माझ्या लायकीशी अल्पही संबंध नाही. हे सारे फळ ती भाग्यवान असल्याचे आहे. कुणालाही जर तिने नवरा म्हणून निवडले असते तर हेच झाले असते, असे तिचे ठाम मत आहे. हे मत खोडून काढण्याचा मी प्रयत्न करून पाहिला, पण त्यात थोडेही यश आलेले नाही. ''जे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे, त्यावर चर्चा काय करणार?'' असे तिचे म्हणणे. हे तिचे मत मला उत्साहदायी नाही. आनंददायक तर मुळीच नाही. अधिक दु:खाची गोष्ट ही आहे की, हे आमच्या मायधार्जिण्या मुलांचेच मत नसून, प्रभाच्या सासू-सासऱ्यांचेही मत (ती भाग्यवान आहे) असेच आहे.

तिच्या मनाचा एक कोपरा अतिशय जुनाट आहे. घरातील कोणतेही काम मी करायचे नाही. जेवणासाठी पाणी घेणे मान्य नाही, मग अंथरूण टाकणे, काढणे तर फारच दूर. सकाळचे उरलेले सायंकाळी मी खाणे तिला मान्य नाही. माझ्याआधी ती जेवत नाही. चारदोन महिन्यांत एखादा अपवादात्मक दिवस असा उजाडतो की, मी दिवसा जेवण करून झोपतो. तो तास अर्धा तास ती दारात उभी असते. इतरांना हाक मारू देत नाही. कावळे ओरडू नयेत म्हणून ती त्यांना खडे मारते. एकदा मी दिल्लीला गेलो. तिथे थैली विसरली. पुढील प्रवासात मजजवळ पांघरूण नव्हते. माझी गैरसोय काहीच झाली नाही. दरगावी मला उत्तम पांघरुण मिळे. माझी चूक एकच झाली. हे मी तिला पत्राने लिहून कळविले. त्यानंतर मी घरी परतेपर्यंत ती राहत्या घरी थंडीत पांघरूणाविणा झोपली. ''पत्रात काय लिहावे हे, बाबा, तुम्हाला कळत नाही,'' असा दोष मुलीने मला दिला. ''जाऊ दे ग, त्यांना कधीच काही कळले नाही,'' असा समारोप पत्नीने केला. अशी ती ठार वेडी आणि कर्मठ आहे.

तिच्या मनाचा एक कोपरा चैनी आणि विलासीसुद्धा आहे. दर एक-दोन वर्षाला एकदा आम्ही एकत्र सिनेमाला जातो. त्या दिवशी तिची सर्व उधळपट्टी चालते. मग खर्चाचा धरबंध नाही. रिक्षाने जाणार. फुलांची वेणी घेणार, सर्वोच्च तिकिटावर बसणार, पान खाणार, असा सगळा थाट. त्या दिवशी तिला अत्तरही चालते. पण हा योग फार दुर्मीळ.

अजून एक मुद्दा सांगणे आवश्यक आहे. तो म्हणजे आम्ही खूप भांडतो. सामान्यपणे सकाळी व संध्याकाळी अशी दररोज दोन भांडणे होतात. तास दीड तास असे दीर्घ अबोलेही असतात. भांडणात प्राय: बोलण्याचे काम मी करतो. प्रभावतीबाईंवर कशाचाही परिणाम होत नाही. भांडणाचे कारण पैसा नाही. अन्य स्त्री नाही. मग भांडणे का होतात? हा संशोधनाचा विषय आहे. प्रभावती मुद्देसूद व निर्णायक असे बोलते. ती माझे ऐकतही नाही. तिला रागही येत नाही. तिचे चुकले असे तर तिला वाटतच नाही. सगळा आविर्भाव, 'चूक तुमची, पण आम्ही क्षमा करू', असा असतो. भांडणाचा अतिशय उद्धट समारोप ती करते. उदा. ''पुरे, आता जेवा.'', ''आता उठा, हात धुवा.'', ''आता झोपा,'' ''उरलेले भांडण उद्या.'' इत्यादी...

अशा स्त्रीच्या सहवासात गेली सत्तावीस वर्षे मी आहे. आता तिचेही केस पांढरे होऊ लागले आहेत. पण पूर्वी माझे व तिचे केस काळेच होते. दोघेही संसारी होतो, त्या काळातली एक गोष्ट सांगून मी थांबणार आहे. माझे मित्र (कै.) हमीद दलवाई एकदा नांदेडला माझ्या घरी आले. वेळ रात्रीची होती. गप्पा रंगल्या. रात्रीचे बारा वाजले. तेव्हा पत्नीने दोघांच्या समोर चहा ठेवला. दलवाई म्हणाले, ''वहिनी, आता उशीर झाला. आता मी निघतोच.'' चहा पिऊन पुन्हा आम्ही गप्पा मारू लागलो. रात्र संपत आली. पहाटे चारला पत्नीने पुन्हा चहा आणून समोर ठेवला. दलवाई म्हणाले, ''वहिनी, काय हा त्रास तुम्हाला! मी म्हणजे काय शुद्धीवर नसतोच मुळी!'' प्रभावतीबाई म्हणाल्या, ''शुद्धीवर नसणाऱ्यांचेच हे घर आहे. शुद्धीवर असणाऱ्यांना इथे वाव नाही!''

दलवाई नंतर मला म्हणाले, ''गड्या, धार फार तिखट आहे!''



# ‘प्रभात’चे गीतकार शांताराम आठवले

मंगला काकनूरकर

**१९७० पूर्वीचे अनेक गाजलेले मराठी चित्रपट ‘प्रभात’ या चित्रसंस्थेने तयार केले होते. शांताराम आठवले हे प्रभातचे गीतकार होते, त्यांची गीते तत्कालीन लहान-मोठ्यांच्या ओठावर रूळलेली होती. आजही त्यातील अनेक गाणी ‘रेडिओ-टीव्ही’वरून ऐकवली, दाखवली जातात तेव्हा आपले कान, दृष्टी खिळवून ठेवतात; फरक एवढाच आहे की ती गीते शांताराम आठवलेंची आहेत हे बहुतेकांना माहीत नसते. त्या शांताराम आठवले यांचे जन्मशताब्दी वर्ष २१ जानेवारी २०१० पासून सुरू झाले आहे, त्या निमित्ताने त्यांच्या कन्येने लिहिलेला हा लेख.**

मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासात ‘प्रभात’चे स्थान असामान्य असेच आहे. या नावाभोवती एक तेजोमय वलय आहे. प्रभातची तुतारी अनेक वर्षे निनादत राहिली - तिचे स्वर अजूनही मनात रुंजी घालतात. या तुतारीबरोबरच केशवराव भोळे, मास्टर कृष्णराव यांनी संगीतबद्ध केलेली शांताराम आठवले यांची गीतेही अत्यंत प्रभावी अशीच आहेत. या तिघांनी मिळून हातांत हात घालून चित्रपटांचा साराच प्रवास नादमय, अमृतमय केला. या तिन्ही कलाकारांच्या कलागुणांचा असा काही समन्वय या चित्रपटांतून दिसतो की, चालीमुळे शब्दांची ओढाताण नाही. गीतातील आशयास पोषक अशाच, रंग वाढवणाऱ्या सुरेल चाली आहेत. गीताची चाल प्रथम केली जाई. ते गीत आशयपूर्ण सौंदर्याने नटलेले असणे आवश्यक असे. तरच ते रसिकांच्या पसंतीस उतरे. या दृष्टीने आठवले यांची गीते नक्कीच सरस होती. त्यामुळेच ती प्रेक्षकांच्या जिभेवर घोटाळली आणि नंतर हृदयाच्या कोपऱ्यात जाऊन बसली. विपुल शब्द संपत्ती, कवीची प्रतिभा, अभ्यासू वृत्ती, हातात घेतलेले काम जीव ओतून निष्ठापूर्वक करण्याची वृत्ती; त्याबरोबर विषयाची जाण, आकलन व एकरूपता, प्रसंगाचे भान या आठवले यांच्या गुणांनीच त्यांच्या हातून ही काव्यनिर्मिती झाली. सोन्याच्या बेढब लगडीचे रूपांतर सुवर्णकाराच्या हातांतील सुंदर चंद्रहारात होते, त्याप्रमाणे तर्कसिद्ध तत्त्वाचे रूपांतर कवीच्या अंत:करणातून बाहेर पडले म्हणजे हृदयंगम काव्य होते. दिव्याने दिवा लागतो. सहजसुंदर, साधी व वास्तववादी कविता चटकन भावते. जीवनातील शाश्वत सत्याचा व सात्त्विक सौंदर्याचा आविष्कार वैश्विक सत्याचा होतो. त्यांची गीते जीवनाचा अर्थ व तत्त्वज्ञान अगदी सहजपणे सांगतात. चित्रपटातील प्रसंग विसरले गेले तरी त्या संदर्भाशिवाय त्या गीतांना अर्थ प्राप्त होतो.

‘प्रभात’चा ‘शेजारी’ हा चित्रपट हिंदू-मुस्लिम ऐक्यावरचा. हिंदू व मुस्लिम या दोन कुटुंबांची मैत्री व स्नेहभाव, गैरसमजाच्या वादळामुळे परस्परांना दुरावतात, संकटाचा सामना करताना पुन्हा

एकत्र येतात. 'सारे प्रवासी घडीचे, नांदू सुखे संगती' या गीतात कवी शांताराम आठवले यांनी सामाजिक सलोख्याचे व सहजीवनाचे महत्त्व सांगितले आहे. कवी म्हणतो, 'पाहु संगे सुख सोहळे, साहू संगे विजा वादळे, जीव संगे भाव संगे, प्राण देऊ संगती, प्रीती मैत्रीच्या पावन तीर्थी, न्हाऊ देऊ जिवा सुख शांती ।।' 'रामशास्त्री' या चित्रपटातील 'दोन घडीचा डाव' या गीतात व्यक्तिगत जीवनात पराजयाचे घावही हसत झेलण्याचा संदेश मिळतो.

प्रभातचे सामाजिक चित्रपट फार महत्त्वाचे होते. जीवन जगण्यासाठी प्रेमापेक्षा कर्तव्य श्रेष्ठ हे तरुण पिढीला दाखवून त्यांच्या डोळ्यांत अंजन घालण्याचे काम ज्या चित्रपटांनी केले त्यात, 'कुंकू', 'माझा मुलगा', 'शेजारी', 'माणूस' हे चित्रपट येतात. या चित्रपटातील गाणीही तशीच तोलामोलाची आहेत. 'मन सुद्ध तुझं', 'मुकी बिचारी कुणी हाका' या कुंकूमधील गीतांद्वारे झुंझार वृत्तीने जगण्याचा संदेश आठवले यांनी दिला आहे. प्रभातनंतर जे चित्रपट त्यांनी दिग्दर्शित केले, त्या चित्रपटांमधूनही अशाच प्रकारचे गीतलेखन आठवले यांनी केले. 'वहिनीच्या बांगड्या'मधील 'तू नसती तर' या गीताने 'जीवन म्हणजे अथांग प्रीती' हे उमगते. 'भाग्यरेखा'मधील देवाला केलेल्या प्रार्थनेत 'देव खरा आधार' असल्याचा निर्वाळा ते देतात. 'शेवग्याच्या शेंगा'मधील देवाच्या प्रार्थनेत 'देव मागेपुढे चोहीकडे' आहे हे सांगतात. 'देव प्रेमळ प्रेमळ, देव आरसा निर्मळ आहे' हे समजावतात. 'वहिनीच्या बांगड्या' चित्रपटातील 'रडू नको रे चिमण्या बाळा' हे गीत (अंगाईगीत) मोठ्यांनाही 'जो हसला तो अमृत प्याला' ही जीवनदृष्टी देते. 'संत तुकाराम'मधील 'आधी बीज एकले' हा अभंग तुकारामांचाच असे सगळ्यांना वाटले होते. अभ्यासकांनी तुकारामाच्या अभंग गाथेत तो शोधला, पण तो तेथे सापडला नाही; कारण त्याचे गीतकार होते आठवले! 'कुंकू'मधील 'भारतीसृष्टीचे सौंदर्य खेळे' या गीतांद्वारे ते सर्व ऋतूंचे दर्शन घडवतात. 'अहा भारत विराजे' यामध्ये महाराष्ट्राच्या सणांचे वर्णन आहे. 'सुभद्राहरण'मधील 'वसंत ऋतू आला' या गीतात वसंत ऋतूमधील बहारदार दृश्याचे मनोरम दर्शन घडवतात. 'बेल भंडार' या चित्रपटातील 'नका बोलू असे दूर दूर बसून', 'वय माझं सोळा', 'भाग्यरेखा'मधील 'अरे पाटलाच्या पोरा, जरा जपून जपून' या गीतांवरून या कवीच्या लेखणीला लावणीचे वावडे नव्हते, हेही लक्षात येते. प्रभातच्या 'माझा मुलगा' या चित्रपटातील गीते जणू भावगीतेच आहेत. उदा. 'पाहू रे किती वाट', 'उसळत तेज भरे गगनात'. 'गोपाळकृष्ण' हा चित्रपट 'हासच नाचत जाऊ', 'भाग्यवती ही कपिला' इत्यादी गाण्यांमुळेच लोकप्रिय झाला होता. 'लखलख चंदेरी' या 'शेजारी'मधील गाण्याला तोडच नाही. 'संत ज्ञानेश्वर' या चित्रपटातील 'आम्ही दैवाचे दैवाचे शेतकरी' हे गाणे शेतकऱ्यांच्या जीवनाशी पुरेपूर संबंधित आहे. अजूनही शेतकऱ्यांच्या तोंडून हे गाणे ऐकायला मिळते. 'आई मला क्षमा कर', 'पडदा', 'संसार करायचाय मला' हे चित्रपट प्रेक्षकांच्या समोर आले नाहीत. परंतु त्यातील अनेक गीते-अंगाई गीते-ओव्या-प्रार्थनागीते-भावगीते ही प्रभातच्या कवीच्या मुशीतीलच आहेत. तीही जीवनासाठी सहज संदेश देतात. 'स्वार्थ जेथे संपतो अन् अर्थ जेथे आटतो, अमृताला जिंकणारा भाव तेथे भेटतो.' शिखरावरती गेल्यावाचून कुठला साक्षात्कार? याचीही जाणीव कवीला आहे. एका भावगीतात ते सांगतात, 'खरे प्रेम - हृदय यामध्ये स्वार्थाचा काटेरी पडदा आहे. जीवन आणि मुक्ती यामध्ये अज्ञानाचा काळा पडदा आहे.'

**काव्यरूपी भेट**

नवीन कविता करून आठवले आपल्या स्नेह्यांच्या भेटीला दिवाळीत जात असत. ती स्नेह्यांसाठी सुवर्ण दीपावली भेट असे. अनेकांनी त्या कविता अजूनही जपून ठेवल्या आहेत.

*'दिक्कालाची चौकट घालुनी अनंत अवकाशाला,*
*रम्य चित्रपट त्यांत देखिला सृष्टी म्हणती त्याला,*
*त्या चित्रपटाचे चर्मचक्षुंना रंग दिसावे म्हणुनी*
*तेज फाकले त्यास दिवाळी म्हणती जन अज्ञानी'*

दिवाळीतील मातीची पणती पाहून कवीला भासते -
'बाळरूप घेऊनी हासते विश्वात्म्याची अनंत प्रीती'
दीपावली म्हणजे, 'अंधाराच्या भूमीवर होते तेजाचे शिंपण,
प्रकाशाची पिके शेती-ज्योती येती मोहरून
ज्योतीतून उमलती आनंदाचे हिरे मोती

तेजाच्या या 'सुगी'लाच दीपावली म्हणतात. दीपावलीच्या समयी मिळणाऱ्या या सुश्वर भावनांमुळे अनेक मित्रांच्या मनातील ज्योती पाजळत असत. त्यांनी लहान मुलांसाठी लिहिलेली बालगीतेही पुष्कळ आहेत. स्वत: रचलेली गीते म्हणत लहान मुलांना खेळवण्याचा शांताराम आठवले यांचा आवडता छंदच होता. 'माणिकबाई माणिक पायलीची कणिक, कणकेच्या केल्या पुऱ्या, माणिकबाई आमच्या गोऱ्या गोऱ्या' अशा प्रकारच्या गाण्यांनी त्या छोट्यांना ते रिझवत असत. पावसाची बरसात होते आणि आपले मन ताजेतवाने होते, मनाला हुरूप येतो, त्याप्रमाणे या प्रभात कवीच्या 'लेखणीतून बरसलेल्या शब्दांनी मनाला ताजेपणा येतो, हुरूप येतो. ते शब्द मनाचा ठाव घेतात, मनावर बिंबतात. सहजसोप्या अर्थवाही शब्दांत खूप काही सांगून जातात.

प्रभातच्या मुशीत तयार झालेले बावनकशी सोने म्हणजे शांताराम आठवले. त्यांनी चरितार्थाचे साधन म्हणून चित्रपट व्यवसाय स्वीकारला नव्हता. मनोरंजनामधून प्रेक्षकांच्या मनाला, हृदयाला स्पर्श करायचा आणि त्यांना आनंद द्यायचा, हेच ध्येय त्यांच्या समोर होते. प्रत्येक कलाकृतीला विशिष्ट दर्जा असलाच पाहिजे हा त्यांचा कटाक्ष असे. वेळप्रसंगी तडजोड करणे त्यांना मान्य नसे - पैसा, मानमरातब याचा त्यांनी कधीच विचार केला नाही. प्रसिद्धीसाठी काहीही करणे त्यांना मान्यच नव्हते. ते प्रसिद्ध पराङ्मुखही होते. साधी रहाणी, सकारात्मक दृष्टिकोन, कष्टाळू स्वभाव व चिकाटी या गुणांमुळे ते खंबीरपणे उभे राहू शकले.

दर्जेदार कलाकृती देऊ शकले. आठवले यांच्या पत्नी सुमती - त्यांचे प्रेरणास्थान होत्या. त्यांनी त्यांच्या जीवनात योग्य साथ केली. चित्रपट व्यवसायातील चढउतारामुळे संसारात अनेक ताण-तणाव निर्माण होत असत. त्यावेळी त्यांच्या पत्नीने - आमच्या आईने - तात्यांना (आठवले यांना सर्वच जण 'तात्या' म्हणत.) धीर देऊन साथ केली. कवीमनाला फुंकर घातली, आधार दिला. त्यांचा उत्साह कधीच मावळू दिला नाही. आमचे आई-तात्या कधीही निराश झालेले, खचून गेलेले आम्ही भावंडांनी कधीच पाहिले नाही. जीवनातील झंझावाताची झळ तात्यांच्या काव्याला पोचू नये याची सतत काळजी घेतली. कवी मनाला आकाशात उडायला आईच्या प्रेरणेने बळ मिळत असे. तात्यांच्या कीर्तीचा डोलारा आईच्या व्यवहारी, करारी, प्रेमळ, घट्ट पायावरच उभा राहू शकला. आकाशात भरारी मारायची पण पुन्हा पाय जमिनीवर आणायचे, यशाने हुरळून जायचे नाही आणि अपयशाने खचूनही जायचे नाही. कामानिमित्ताने तात्या अनेक महिने पुण्याबाहेर असत. त्यावेळी संसाराचा गाडा आईने विलक्षण धैर्याने पुढे नेला. नेहमीच हसतमुखाने, चहुबाजूने चालून आलेल्या दु:खावर, संकटावर मात करून धीरोदात्तपणाने तिने आमचे संगोपन केले. आमच्या घरातील वातावरण खेळीमेळीचे, हसरे, मनमोकळे होते. प्रेम, जिव्हाळा, आपुलकी यांमुळे आई-तात्यांनी अनेक स्नेहीसोबत्यांना आपलेसे केले होते. घरातील पुस्तके आणि ही 'आपली' माणसे हेच दागदागिने होते. आई-तात्या सर्वांचेच दीपस्तंभ, आधार, मार्गदर्शक. 'सुखदु:खे समेकृत्वा' हा मंत्र उराशी बाळगला तोच वसा आम्ही भावंडांनी आमच्या जीवनात आनंदाने घेतला.

**ग्रंथसंपदा**

पुढे काही वर्षांनी चित्रपट क्षेत्रातील या बदलत्या परिस्थितीत तरल मनाच्या या मनस्वी गीतकाराची घुसमट होऊ लागली. गीतलेखनासह अनेक चित्रपटांचे दिग्दर्शन पटकथालेखनही त्यांनी केले. तरी या माध्यमाचा हवा तसा उपयोग आता आपण करू शकणार नाही, या प्रखर जाणिवेतूनच चित्रपटसृष्टीत दीर्घकाळ वावरलेल्या या माणसाने निवृत्ती पत्करून अध्यात्म, गूढविद्या इत्यादी विषयांचे आपले आवडते अध्ययन, चिंतन, मनन, संशोधन सुरू केले. व्याख्याने, प्रवचनांचे आणि संशोधनात्मक लेखनाचे नवे क्षेत्र बुद्धिपुरस्सर आवडीने निवडले. 'नाडी ग्रंथ - एक अभ्यास', 'कुंडलिनी जगदंबा', 'ज्ञानदेवीची आराधना', 'बकुळ-फुले', 'साधा विषय मोठा आशय' यासारख्या पुस्तकांचे लेखन केले. विषय थोडे गूढ, अनाकलनीय, कठीण वाटले तरी पुस्तक वाचताना फार चाचपडावे लागत नाही. 'हाडाचा कवी' असलेला हा लेखक आपली कलाकृती सहज सोप्या भाषेत मांडतो. ही पुस्तके कंटाळवाणी होत नाहीत. अशा प्रकारचे लेखन करताना कोठेही मोठेपणाचा आविर्भाव मुळीच नाही. उलट आपली पुस्तके वाचकांना मार्गदर्शक ठरतील असाच प्रयत्न आहे, हे लेखन संशोधक, पंडितांच्या भूमिकेतून नसून जिज्ञासू विद्यार्थ्याच्या भूमिकेतून आहे. सर्वसामान्य वाचकांना समजेल अशा पद्धतीने सारे विवेचन करण्याचा त्यांचा कटाक्ष होता.

आजच्या वेग आणि भोगमय अणुयुगात, साऱ्या विश्वात जीवनमूल्यांचा प्रचंड संघर्ष चालू आहे. भारतीय संस्कृतीची मूळ बैठक आणि तिच्यातील चिरंतन मूल्ये संभाव्य विनाशातून विश्वाला वाचवू शकतील, यावर आठवले यांचा विश्वास होता. भारतीय संस्कृती ही 'सुखाची लिपी' आहे असे त्यांना वाटे. 'सुखाची लिपी' हा ग्रंथ त्यांनी लिहिला. भारतीय संस्कृतीमधील प्रत्येक आचारविचारामागे जीवनकल्याणाची, समृद्धीची बैठक आहेच, पण त्या प्रत्येक आचाराविचारामागे विज्ञानाची निश्चित बैठक आहे अशी आठवले यांची खात्री होती. ॐ काराचे महत्त्व, ज्ञानेश्वरीचे महत्त्व, भारतीय संस्कृतीचे महत्त्व त्यांनी आपल्या लेखनातून, व्याख्यानांतून, प्रवचनांमधून सतत व्यक्त केले. सहज, सोप्या पण रसपूर्ण वाणीने लोकांना पटवले. त्यांच्या व्याख्यान-प्रवचनांची संख्या पाचशे-सहाशेच्या वर गेली होती. सध्याचा काळ विपरीत आहे असे म्हटले जाते, तरीही आठवले यांना प्रवचने-व्याख्याने देण्यासाठी भ्रमण करावे लागले. त्यावेळी मानवतेच्या स्नेहमयतेचे, सौजन्यपूर्णतेचे व मांगल्याचे दर्शन घडले असे ते नेहमीच सांगत.

आठवले यांची आणखी एक आगळीवेगळी कलाकृती आहे - 'प्रभातकाल' हे पुस्तक. हा प्रभातचा इतिहासच आहे. प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेला, अनुभवलेला. स्पष्टपणे-प्रांजळपणे, सत्य न लपवता केलेले लिखाण आहे. रसिकांनी प्रत्यक्ष वाचूनच त्याचा अनुभव निश्चितच घ्यावा.

अशी व्याख्याने-प्रवचने करण्यात मग्न असतानाच अचानक आठवले यांना कर्करोगाने गाठले. त्यांच्या जीवनाचे बकुळपुष्प कोमेजले. तो दिवस होता २ मे १९७५. या बकुळफुलाचा सुगंध मात्र अजूनही दरवळतो आहे.

या असामान्य थोर व्यक्तीचे २०१० ते २०११ हे जन्मशताब्दी वर्ष आहे. हे बकुळपुष्प उमलले होते २१ जानेवारी १९१० रोजी. जन्मशताब्दी निमित्ताने त्यांनी केलेल्या कामाला उजाळा देण्याचा हा प्रयत्न आहे. पुढच्या पिढीलाही त्यांचे मोठेपण लक्षात यावे आणि त्यांच्या पिढीतील वाचकांना पुन:प्रत्ययाचा आनंद मिळावा हीच इच्छा आहे. आठवले कुटुंबीयांनी 'याला जीवन ऐसे नाव' या नावाचा एक कार्यक्रम नुकताच सादर केला. या कार्यक्रमातून मिळणारा पुन:प्रत्ययाचा आनंद रसिकांना सतत मिळत राहावा, नवीन पिढीलाही संचिताचा लाभ होत राहावा यासाठी या कार्यक्रमाची व्ही.सी.डी. तयार केली आहे.

या प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्त्वाने मराठी चित्रपटसृष्टी व मराठी माणसांना खूप अलौकिक असेच भरभरून दिले. त्यांच्या सहवासात समईसारखा शांत प्रकाश, चंदनासारखा मंद मोहक सुगंध व आनंद मिळत असे!

**सौ. मंगला काकनूरकर (आठवले)**
३३ जीवनछाया सोसायटी, बेडेकर गणपतीजवळ,
पौड रोड, पुणे ४११०३८.
दूरध्वनी : ०२०-२५४४६७६६.

लक्ष्मण उवाच



लक्ष्मण लोंढे

# झूठाही सही...

काही काही गोष्टींची काही माणसांना खूप ओढ असते, आवड असते. उदाहरणार्थ, बऱ्याच स्त्रियांना दागिन्यांची आवड असते आणि अशा स्त्रिया समाजाच्या सर्व आर्थिक स्तरांतल्या असतात. पिढीजात श्रीमंत घराण्यांमधल्या स्त्रियांकडे असे दागिने वारसाहक्काने आपोआप येतात. नवश्रीमंतांमधले हौशी नवरे आजच्या भावानीही सोनं खरेदी करून आपल्या बायकांसाठी अगदी गळा, हात भरून दागिने करू शकतात. पण निम्न आर्थिक स्तरातल्या स्त्रियांना आपली सोन्या-मोत्यांच्या दागिन्यांची आवड भागवता येणं शक्य नसतं. असं असलं तरी आपलंही चांगलं दोन तोळ्यांचं मंगळसूत्र, चार तोळ्यांचा ज्योती हार, बांगड्या, पाटल्या असा सारा साज आपल्या अंगावर असावा, असं गरीब स्त्रियांनाही वाटतं. अशा स्त्रियांसाठी एका सोनाराच्या पेढीनं सोन्याचा गिलावा दिलेले दागिने काढलेले आहेत. आठ-दहा ग्रॅम सोन्याच्या किमतीत त्यांना अंगभर दागिने घातल्याचं सौख्य मिळतं. अर्थात, ते दागिने सर्व मिळून आठ-दहा ग्रॅमचेच आहेत, वरून सोन्याचा गिलावा असला तरी आत कोणता तरी हिणकस धातू आहे, हे दुसऱ्या चलाख स्त्रियांना आणि चोरांना बरोबर समजतं. श्रीमंत स्त्रिया अशा दागिन्यांना बघून नाकं मुरडतात आणि चोर तर त्यांच्याकडे पाहतही नाहीत.

मानसशास्त्र असं सांगतं की आपणा सर्वांमध्येच सद्‌गुणाइतकेच क्रौर्य, नीचपणा असे दुर्गुणही जन्मजात असतात. समाजाचं नीट आणि शांततामय पद्धतीनं नियमन व्हायला हवं असलं तर या दुर्गुणांनाही कुठे तरी वाव देणं आवश्यक असतं, त्यांचा निचरा करणं आवश्यक असतं. नाटकात अशा क्रौर्याचा आविष्कार पाहताना प्रत्यक्षात आपण मनाच्या रंगमंचावर आपल्याच भावनांचं विरेचन करीत असतो. आपण असं नाटक पाहून थिएटरबाहेर पडतो तेव्हा आपलं मन त्या समाजघातक दुर्गुणांपासून शुद्ध झालेलं असतं, शुचिर्भूत झालेलं असतं.

जे सोन्याच्या बाबतीत घडतं तेच मोत्यांच्याही बाबतीत घडतं. सागराच्या तळाशी नैसर्गिक पद्धतीनं शिंपल्यात बनणारे मोती अतिशय दुर्मिळ असतात. ते सागरातून काढण्याची पद्धतही अतिशय जोखमीची, म्हणूनच खर्चिक असते. त्यामुळे खऱ्या मोत्यांचे दागिने घालणं श्रीमंतांनाच परवडतं. पण मग गरिबांनी काय मोत्यांचे दागिने घालू नयेत? पण त्यांची सोय सर्वप्रथम हिकमती जपानी उद्योजकांनी केली. त्यांनी प्रयोगशाळेत कल्चर करून 'कल्चर्ड' मोती बनविले. असे मोती आपल्याकडेही बनू लागल्यावर काही उत्पादकांनी त्यांची जाहिरात 'खरे' कल्चर्ड(!) मोती अशी करायला सुरुवात केली.

असं असलं तरी या एक ग्रॅमवाल्या किंवा कल्चर्ड मोत्यांच्या दागिन्यांनाही भरपूर मागणी का असते? माझ्यासारख्या काही भोट माणसांचा मात्र गैरसमज होऊ शकतो. त्यांना ते खरेच वाटतात. पण माझ्यासारख्या माणसांना फसविण्यासाठी असे दागिने या स्त्रिया घालतात, असं म्हणणं योग्य होणार नाही.

... अश्वत्थामा गरीब होता. त्याला दूध प्यायला हवं होतं आणि त्याच्या आईला तर त्याला दूध देणं परवडत नव्हतं. म्हणून त्याच्या आईनं तांदळाच्या पिठात पाणी कालवून ते दूध म्हणून त्याला पाजलं. द्रवाचा पांढरा रंग पाहून अश्वत्थामा फसला. त्याला बिचाऱ्याला खऱ्या दुधाची चवही माहीत नसल्यामुळे तो ते दूध म्हणून प्यायला, अशी महाभारतात कथा आहे. या कथेत कारुण्य आहे आणि बालपणाच्या अज्ञानाचा इथे दारिद्र्याचा चटका लपविण्यासाठी वापर केला गेलेला आहे. पण या दागिन्यांच्या बाबतीत तर तशीही गोष्ट नसते. खरं तर त्या कोणाचीच फसवणूक करीत नसतात. त्यांची स्वत:ची नाही आणि दुसऱ्यांचीही नाही.

मुंबईसारख्या महानगरात आजकाल आपण कोट्यवधींनी माणसं राहत असलो, तरी मुंबईतील बरीचशी माणसं 'उपरी'च असतात. या वाक्यातल्या 'उपरा' या शब्दाचा अर्थ शिवसेनेच्या डिक्शनरीत शोधायचा नाही. कारण त्या डिक्शनरीत 'उपरा' शब्दाचा अर्थ 'नॉन महाराष्ट्रीयन' असा असतो. मी मात्र 'उपरा' हा शब्द या ठिकाणी ज्याचा जन्म आणि बालपण मुंबईबाहेर एखाद्या खेड्यात गेलेलं आहे, जो केवळ पोटापाण्याच्या सोयीसाठी मुंबईत राहतो, ज्याला मुंबईत

राहणं भाग असते, पण जो त्यात असमाधानी असतो, ज्याला वारंवार आपल्या गावच्या शांत जीवनाच्या आठवणी येतात आणि जो त्या आठवणींनी व्याकूळ होतो, जो संधी मिळेल तेव्हा गावी पळायला बघतो, थोडक्यात काय जो शरीरानं मुंबई या विराट महानगरीत राहत असून मनानं आपल्या गावीच असतो, याअर्थी केलेला आहे. मग हे त्याचं गाव राजस्थानातलं असो की महाराष्ट्राच्या एखाद्या जिल्ह्यातलं असो.

या माणसाचं मन गावच्या कोणत्या आठवणींनी झुरत असतं? अशी व्यक्ती मध्यमवयीन असते आणि त्याच्या बालपणी त्याच्या गावी वीज पोचलेली नसते. त्यामुळे त्याच्या बालपणच्या संध्याकाळी तो घरी असला तर मिणमिणत्या उजेडात गेलेल्या असतात आणि रस्ते तर त्यानं बहुश: काळोखातच तुडवलेले असतात. तो अगदी छोट्या गावातला असेल तर त्याच्या घराची जमीन सारवलेली असते आणि भिंतींनाही गेरूचा आणि चुन्याचा रंग लावलेला असतो. बालपण फारच गरिबीत गेलेलं असेल तर त्याच्या घराला शेणानं लिंपलेल्या कारवीच्या भिंतीही असण्याची शक्यता असते. अशा आठवणींनी झुरणाऱ्या मुंबईकर उपऱ्यासाठी मुंबईत काही ठिकाणी खेडेगावच्या अशा घरासारखी अंतर्गत सजावट केलेली हॉटेलं निघालेली आहते. तिथे छतावर कृत्रिमपणे मोकळ्या आकाशाचा आभास तयार केलेला असतो, जेवणाच्या हॉलमध्ये विजेचे दिवे नाही, तर रॉकेलचे दिवे असतात. काही ठिकाणी तर पार मेणबत्त्या असतात. अन्नपदार्थ ताटात वाढले जातात, पाण्यासाठी काचेच्या ग्लासऐवजी तांब्या-भांडं असतं. अन्नपदार्थही गावच्या जेवणातल्यासारखे भाकरी, तिच्याबरोबर मटणाचा रस्सा किंवा पिठलं, लसणाची चटणी किंवा मिरचीचा ठेचा आणि कांदा अशा प्रकारचे असतात. भाकऱ्या चुलीवर केलेल्या असतात. टेबलावर मध्यभागी लावलेल्या मेणबत्तीच्या प्रकाशात बाजूच्या भिंतीवर आपली काळी सावली पडलेली पाहत, पाहत एखाद्या मित्राबरोबर गावच्या गप्पा मारीत केलेल्या जेवणाची गोडी काही औरच लागते.

अशा हॉटेलांनाही मुंबईकर उदार आश्रय देतो आणि आपली दुधाची तहान ताकावर भागवतो. आता या प्रकारांतही कोठे फसवाफसवीचा कारभार नसतो. पण जाणूनबुजून गावी, घरी जेवल्याचा (खोटा) अनुभव घ्यायला माणसं लाईनी लावतात.

...आणि आपण शंभर दोनशे रुपयांचं तिकीट काढून नाटक-सिनेमाला जातो ते तरी काय असतं? नाटका-सिनेमातल्या नायक नायिकेच्या दु:खानं आपण हळहळतो, कधी आपल्या डोळ्यांच्या कडाही ओल्या होतात. खलनायकाचा हलकटपणा पाहून आपल्याला चीड येते. नुकतेच वारलेले गेल्या पिढीतले नट चित्तरंजन कोल्हटकर हे नाटकात नेहमी खलनायकाच्या भूमिका करीत. ते त्या इतक्या समरसून करीत की, एकदा त्यांचा एका नाटकातला अभिनय पाहता पाहता माझी बहीण माझ्या कानात म्हणाली होती... ''हा मेला आता थिएटरच्या बाहेर उभा असला ना, तर मी त्याला चपलेनं मारीन!'' आपल्यासमोर रंगमंचावर चाललंय ते नाटक आहे, खोटं आहे हे ती त्या क्षणी पूर्णपणे विसरली होती. किंबहुना कोल्हटकरांनी आपल्या समर्थ अभिनायानं ते तिला विसरायला लावलं होतं.

मी कधी कधी विचार करतो की समजून उमजून माणूस हा असत्याचा अनुभव सत्य मानून का घेतो? मानसशास्त्र असं सांगतं की आपणा सर्वांमध्येच सद्गुणाइतकेच क्रौर्य, नीचपणा असे दुर्गुणही जन्मजात असतात. समाजाचं नीट आणि शांततामय पद्धतीनं नियमन व्हायला हवं असलं तर या दुर्गुणांनाही कुठे तरी वाव देणं आवश्यक असतं, त्यांचा निचरा करणं आवश्यक असतं. नाटकात अशा क्रौर्याचा आविष्कार पाहताना प्रत्यक्षात आपण मनाच्या रंगमंचावर आपल्याच भावनांचं विरेचन करीत असतो. आपण असं नाटक पाहून थिएटरबाहेर पडतो तेव्हा आपलं मन त्या समाजघातक दुर्गुणांपासून शुद्ध झालेलं असतं, शुचिर्भूत झालेलं असतं.

अर्थात हे अशा वाईट भावनांच्या बाबतीत जितकं खरं असतं, तितकंच चांगल्या भावनांच्याही बाबतीत खरं असतं. गुरुदत्तच्या सिनेमातल्या एका गाण्यात 'हमने तो जब कलियाँ माँगी, काँटोका हार मिला।' अशी एक ओळ आहे. तारुण्याची पहाट फुटताना पुरुष किंवा स्त्रीच्या मनात प्रेमभावना जागृत होणं हे अगदी स्वाभाविक आहे. मी कधी तसं प्रेमच कोणावर केलं नाही, मला तसं कोणाहीबद्दल वाटलं नाही असं सांगणारी व्यक्ती खोटं बोलत असते असं खुशाल समजावं. पण सगळ्यांच्याच प्रेमाला प्रतिसाद मिळतो असं नाही. किंबहुना प्रेमाला प्रतिसाद मिळणारे भाग्यवंत थोडे. म्हणूनच या गाण्याच्या पुढल्या ओळीत दु:खद अंत:करणाने शायर म्हणतो, ''जाने वो कैसे, लोग थे जिनके, प्यार को प्यार मिला।' बऱ्याच जणांची अवस्था 'हमसे आया न गया, तुमसे बुलाया न गया। फासला प्यारमें दोनोंसे मिटाया न गया।'' अशी झालेली असते किंवा काहींना ब्लंट नकार मिळालेला असतो. इतकंच काय, आपलं प्रेम नाकारलं गेलं की यशस्वी झालं यापेक्षा, आपल्यावर कोणीतरी प्रेम केलं होतं. ही भावनाही खूप दिलासा देणारी असते. म्हणूनच प्रेमाला पारखा झालेला नायक विव्हळणं 'जॉनी मेरा नाम' या चित्रपटात किशोरकुमारनं गायलेल्या गाण्यात म्हणतो, 'पलभर के लिए कोई मुझे प्यार कर ले, झूठाही सही!'

दागिन्यांची बाब सोडा, पण प्रेमभावनेसारख्या मूलभूत भावनेच्या बाबतीतही आभासालासुद्धा इतकं महत्त्व असेल?... कोणी म्हणेल, हे मात्र जरा अतिच होतंय हं. प्रेमाचं नाटकसुद्धा इतकं परिणामकारक असतं, सुखावणारं असतं असं म्हणणं हे म्हणजे मृगजळाचं पाणी पिऊन एखादा माणूस तृप्त झाला असं म्हणण्यासारखं होईल. पण अलीकडेच डॉ.श्रीकांत चोरघडे यांनी लिहिलेला एक हृद्य प्रसंग वाचनात आला आणि किशोरकुमारनं गायलेल्या गीतातल्या भावना किती सच्च्या आहेत याची साक्ष पटली. डॉक्टरांनी या आठवणीत लिहिलं आहे की, मेंदूला होणाऱ्या इजेचा कधीकधी पक्षाघातासारखा भयानक परिणाम होतो. अशा विकारात विविध ज्ञानेंद्रियांच्या क्षमतेवर परिणाम होतो. कोणाची वाचा जाते, कोणाला आंधळेपण येतं. अशा व्यक्ती उपचारानंतरही बऱ्या होतीलच याची शाश्वती वैद्यकशास्त्र

*(पृष्ठ २५ वर*

आदरांजली

इंदुमती जोंधळे

# निर्मळ मनाचा माणूस...

**प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनामुळे मराठी साहित्यात आत्मकथा लेखनाचा एक वेगळा प्रवाह सुरू झाला. गेल्या आठवड्यात प्र. ई. सोनकांबळे यांचे निधन झाले. त्या निमित्ताने हा लेख...**

डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक समतेची लढाई सुरू केली होती. 'स्वातंत्र्य, समता, बंधुतेची मानवी मूल्ये जोवर रुजत नाहीत, तोपर्यंत आर्थिक किंवा राजकीय स्वातंत्र्याला काही अर्थ नाही,' ही भूमिका ते सातत्याने मांडत असत. दलित तरुणाईला उच्च शिक्षणाची द्वारे खुली झाली पाहिजेत; म्हणूनच त्यांनी शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मराठवाड्यातील औरंगाबाद शहरात १९५० मध्ये मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. त्यामुळे खेडोपाडीचे तरुण मिलिंदच्या परिसरात मुक्त श्वास घेऊ लागले. शिक्षणामुळे त्यांच्यात स्वाभिमान जागरूक झाला. 'माणूस' म्हणून जगण्याची प्रेरणा त्यांना मिळू लागली. शब्द पुस्तकात असतात, पण त्यांचा अर्थ आपण आपल्या जीवनात शोधायचा असतो हे त्या तरुणाईला गसवले. आपणही बोलू शकतो, लिहू शकतो याचे भान त्यांना तीव्रतेने झाले.

प्राचार्य म.भि.चिटणीस, म.ना.वानखेडे, रा.ग.जाधव, ल.बा.रायभाने यांच्यासारखे गुरु लाभल्याने असंख्य तरुण लिहिते झाले. त्या तरुणांमध्ये अग्रगण्य नाव होते प्र.ई.सोनकांबळे. 'वाटाड्या' नावाच्या भित्तीपत्रकातून त्यांनी स्वानुभव लिहिण्यास सुरुवात केली आणि तेच पुढे 'आठवणीचे पक्षी' म्हणून मराठी दलित साहित्यातील पहिले आत्मकथन ठरले. अतिशय संयत, प्रभावी, परिणामकारक व जे सांगायचे ते नेमक्या शब्दांत सांगणारे 'आठवणीचे पक्षी' सर्वार्थाने मैलाचे दगड ठरले. उदगीर-लातूरकडील मराठवाडी ग्रामीण भाषा, त्यावेळची आजूबाजूची परिस्थिती, दाहक-कटू अनुभव वाचताना क्लेश होतात, अंतरात्मा तडफडू लागतो; आपलाच आपल्याला राग येतो आणि वाटते, '....छीऽऽ काय हा समाज?... माणूसच माणसाला इतक्या खालच्या पातळीवर नेतो...? त्याचं अस्तित्वच नाकारतो...? कोणी दिला हा अधिकार...? का?' रागाने आपल्या मुठी आवळू लागतात आणि आतल्या आत तडफड सुरू होऊन नकळत अश्रू वाहू लागतात. आणि मग वाटते, 'अरे काय... काय... सोसलंय या माणसाने! किती अपमान... किती अवहेलना? जातिव्यवस्थेच्या उतरंडीतील सर्वांत शेवटची उतरंड. शूद्रातिशूद्र... किती सहनशीलता?

बुद्धाची करुणा आणि डॉ.बाबासाहेबांची प्रेरणाच प्र.ई.ना जगायला जीवनदायी ठरली. बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या मिलिंद परिसराशी ते एकनिष्ठ राहिले. एकरूप झाले. विद्यार्थी दशेपासून ते प्राचार्यपदापर्यंत पोहोचले. हा प्रवास अतिशय खडतर... क्लेशदायी होता तरीही कडवटपणा, उरबडवेपणा, आक्रस्ताळेपणा त्यांच्या लिखाणात कुठेही आढळत नाही.

बुद्धाची करुणाच त्यांच्या शब्दाशब्दांतून जाणवायची. ते कधीही, कोणाशी मोठ्याने बोललेत असे झाले नाही. तावातावाने कधी भाषण केलेले नाही. अतिशय मृदु स्वभावामुळे बोलणेही अगदी हळुवार. प्रेम, जिव्हाळा, आपलेपणाच क्षणोक्षणी जाणवायचा. अत्यंत साधी राहणी, थोडे झुकून पण हळूहळू चालणे, तितकेच हळुवार संभाषण. सभा-संमेलनाला आवर्जून हजेरी असायचीच. ज्यांच्याबद्दल आपलेपणा आहे त्यांना हातातल्या पिशवीतील सुगंधी फुले, फुलांच्या पाकळ्या आणि खिशातून खडीसाखरेचे खडे हातावर ठेवायचे. जणू आपल्या अंतरंगातील सुगंध, गोडवाच सर्वत्र वाटत रहायचे. अत्यंत मितभाषी असलेले प्र.ई.सर, हा गोडवा मात्र सदैव सर्वत्र पेरत

राहिले. त्यांच्या ‘पोत आणि पदर’, ‘असं हे सगळं’ या लेखसंग्रहांतून त्यांचे माणसाविषयी, समाजाविषयीचे चिंतनच वाचकाला भावून जाते. या थोड्याच पण मोजक्या लिखाणाचा केंद्रबिंदू स्वानुभवाच्या पलीकडे जाऊन समाजचिंतनाचा होता. ज्या समाजाने धुत्कारले त्यांच्याविषयी कुठेही अपशब्द नाहीत, वा हिणकसवृत्तीचे दर्शन नाही. हा समंजसपणा, सहनशीलवृत्ती, निर्मळता, सहजता त्यांच्या ठायी आली कुठून...? तर त्यांची मूळ वृत्ती ऋजुतेची. नम्रतेची, विनयशीलतेची. किती नम्रपणा...? समोरचा माणूस त्यांच्याही नकळत नम्र व्हावा एवढे सौजन्य त्यांच्या ठायी होते. ‘आठवणीचे पक्षी’ मध्ये ते लिहितात, ‘पूर्वीचे उच्चवर्णीय लोक दलितांना शिवू देत नसत, पण जगू देत असत. आता शिवू देतात, परंतु जगू मात्र देत नाहीत.’ केवढा हा समाजव्यवस्थेला मारलेला मार्मिक टोला...! माणसांच्या मनामनातल्या जातीयतेच्या भिंती मात्र नष्ट झाल्याच नाहीत, उलट आता तर अधिकाधिक मजबूत बनत चालल्या आहेत. हे पंचवीस-तीस वर्षांपूर्वी सांगितलेले सत्य आजही तितकेच वास्तव आहे. संवेदनशील माणूस ‘आठवणीचे पक्षी’ वाचल्यानंतर विद्ध झाल्याशिवाय राहत नाही. अंतर्मुख होतो... आजच्या जीवघेण्या स्पर्धेच्या युगात थोडासा विसावा घेऊन तरुणांनी एकदा तरी हे पुस्तक वाचावे म्हणजे कळेल, साहित्य म्हणजे काय असते...! जे हृदयाला भिडते, मनाला भावते आणि बुद्धीला अस्वस्थ करून सोडते- विचार करायला भाग पाडते, ते खरे अक्षर वाङ्मय! अक्षरवाङ्मयात सर्वांत वरचे एक बिनीचे अग्रगण्य आत्मकथन म्हणून ‘आठवणीचे पक्षी’ सदैव स्मरणात राहील. त्यांच्या या आत्मकथेचे अनेक भाषांमध्ये अनुवाद झाले. प्र.ई.ना अनेक पुरस्कार मिळाले, त्यांनी अनेक मानाची पदे भूषविली, पण अहंकाराचा वारा त्यांच्या बाजूलाही फिरकला नाही. अत्यंत प्रामाणिकपणे, कष्टाने जे मिळविले त्यात त्यांनी समाधान मानले, आपले घरदार उच्चशिक्षित केले. ते स्वत:च सुसंस्कारी असल्याने घरही संस्कारितच राहिले; आदरातिथ्य तर त्यांचा स्थायीभाव होता.

त्यांच्या घरी गेल्यानंतर आग्रहाने खाऊ-पिऊ घातल्याशिवाय पाठवत नसत. वेळ असेल, निवांतपणा असेल तर बाजूला घेऊन म्हणायचे, ‘बहिणाबाई, जरा या गरीब भावाकडे बी लक्ष असू द्या की...! आवो माझ्या पोरांच्या आत्याबाई तुम्ही. तुमच्या भाचीसाठी एखादं चांगलं स्थळ सुचवा; जरा ध्यानात येऊन कामाला लागा. तुमची भाची लई गुणाचीय. शिकली-सवरलेलीय-कमावतीय. योग्य ‘स्थळ’ शोधलं तर या भावाची चिंता मिटंल बघा. पोरांचं काय, होत राहील... पर पोरगी... काळजी वाटतीय... एवढं शिकून... तिला योग्य ‘वर’ शोधणं अवघड झालंय बघा...’ असं म्हणत असताना त्यांच्यातला ‘बाप’ मला हेलावून टाकायचा. त्यांचे डबडबलेले डोळे ते हळूच पुसायचे नि पुन्हा म्हणायचे, ‘महावीरभाऊंनाही सांगून ठेवा; तुमचा दोघांचा गोतावळा मोठाय... त्यांच्या पाहण्यात खूप मुलं असतात...’ मी मात्र मनातल्या मनात खजिल व्हायची... योग्य वर...? कधी, कुठे... कसा सापडावा? किती कठीण गोष्ट होती! त्याबाबत मी अपयशीच ठरले. पण आजही त्यांचा त्यांच्या लेकीसाठी तळमळणारा जीव, एक अगतिक बाप... डोळ्यांसमोरून जाता जात नाही. मला वाटतं प्रत्येक मुलीचा बाप (अपवाद सोडून) असाच अगतिक, असहाय होत असेल का? ‘योग्य’ वराच्या शोधासाठी! मग तो बाप सामान्य असो, असामान्य असो, साहित्यिक असो वा महान कलावंत असो, अखेर त्याच्या आतील बापाचं हृदय खरंच कोणी मोठ्या मनानं जाणून घेईल का...?

**इंदुमती जोंधळे**
३ सरस्वती कॉलनी, (पश्चिम), औरंगपुरा,
औरंगाबाद ४३१००१.
Mob. : 9689910949

---

*पृष्ठ २३ वरून)*
देऊ शकत नाही. उपचार चालू असतानाचा हा काळ रुग्णाच्या जवळच्या माणसांची कसोटी पाहणारा असतो. सकारात्मक दृष्टी ठेऊन आपली प्रिय व्यक्ती बरी होईल, अशी आशा ठेवून रुग्णाची सेवाशुश्रूषा करायची असते आणि हा शुश्रूषेचा काळ कधीकधी रुग्णाच्या मृत्यूपर्यंतही लांबतो. डॉक्टरांनी हाताळलेल्या एका खऱ्या केसमध्ये एका दांपत्यामधील स्त्रीला पक्षाघात झाला आणि विचित्र परिणाम झाला. ‘आपलं लग्न झालेलं आहे’ हे सत्यच ती स्त्री विसरून गेली. नवरा तिला हॉस्पिटलातून घरी घेऊन आल्यावरही ती स्त्री त्याच्याबरोबर एखाद्या अपरिचिताबरोबर राहावं तसं राहू लागली. आता नवऱ्याचा कसोटीचा काळ होता. त्यानं शेवटी एका मानसोपचार तज्ज्ञाचा सल्ला घेतला. मानसोपचार तज्ज्ञानं त्यांना सुचविलं, ‘‘तुम्हीही आपलं लग्न झालेलं आहे हे विसरा आणि लग्नाआधी पत्नीचं जसं प्रियाराधन केलं होतं तसं करा. तिला प्रथम प्रेमाचा साक्षात्कार पुन्हा एकदा घडवा. तिच्या आवडीनिवडी सांभाळा, तिच्यावर खोटं खोटं रागवा, रुसा. अबोलाही धरा आणि तिची कळी खुलली की लपवून आणलेला गजरा तिला भेट द्या.’’ कठीण होतं, कारण एवढं करूनही ती सुधारेलच अशी शाश्वती नव्हती. पण नवऱ्यानं सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपले प्रयत्न चालू ठेवले. आपल्याच पत्नीवर नव्यानं प्रेम केलं आणि हळूहळू परिणाम दिसू लागले. ती त्याच्यावर ‘भाळली’ आणि तिने एके दिवशी त्याला लाजत लाजत विचारलं, ‘आपण लग्न करू या?’ नवऱ्यानं नाटक शेवटापर्यंत नेलं. नव्या उत्साहानं पत्रिका छापून, आपल्या लग्नाचा दुसरा समारंभ घडवून आणला आणि नव्यानं संसार सुरू केला.

आता सांगा, झूठाही सही, हे सही आहे की नाही?

**लक्ष्मण लोंढे**
laxmanlondhe13@gmail.com
Phone : 022-24304007



कानगोष्टी

प्रा. साईनाथ पाचारणे

# मधू का हरला ?

विटी-दांडूचा खेळ!

किती क्षुल्लक...

आजच्या क्रिकेटवेड्या जगात आणि कॉम्प्युटर गेमच्या काळात तर या खेळाला काहीच किंमत राहिली नाही. आता हा खेळ फार तर रानावनात जनावरं घेऊन जाणारी गुराखी पोरं खेळत असतील, नवी पिढी तर हा खेळ कसा खेळतात हेच विसरून गेली असतील.

पण अजूनही हा खेळ म्हणजे आमच्या गावचं वैभव आहे, मीसुद्धा अनेक वर्षं हा खेळ खेळलो आहे. मीच कशाला- माझ्यासारख्या सगळ्याच मुलांनी या खेळावर अगदी जीव टाकला आहे. आमच्या गावातल्या नाही तर अख्ख्या पंचक्रोशीतली मुलं विटी-दांडू खेळायची, भरपूर सराव करायची.

त्याला कारण म्हणजे आमच्या गावात दरवर्षी होणारी विटी-दांडूची स्पर्धा. ही स्पर्धा नागपंचमीच्या दिवशी व्हायची. अगदी नेमाने पाऊस असला तरी भर पावसात ही स्पर्धा चालायची. ग्राऊंड ओलं होऊन एखाद्या वर्षी स्पर्धा रद्द करण्यात आली आहे अशी वेळ कधीच आली नाही.

कारण विटी-दांडूला ग्राऊंडची गरज नसायची, कुठंही मोकळ्या जागेत ही स्पर्धा घेतली जायची आणि ही स्पर्धा जिंकणाऱ्याला गावाकडून चांदीचं कडं आणि मानाचा फेटा दिला जायचा. अजूनही आमच्या गावात प्रत्येक नागपंचमीला ही स्पर्धा होते. अजूनही जिंकणाऱ्याला चांदीचं कडं आणि मानाचा फेटा दिला जातो. फरक एवढाच की आता बक्षीसासाठी रोख रक्कमसुद्धा दिली जाते.

खेळ- मग तो कोणताही असो, त्या प्रत्येक खेळात एक तरी खेळाडू वरचढ असतोच. आपल्या देशात नाही का हॉकीमध्ये ध्यानचंदचं नाव घेतलं जातं. क्रिकेटमध्ये डॉन ब्रॅडमन, सचिन तेंडुलकर ही नावं आदराने घेतली जातात. अगदी तसंच आमच्या गावात विटी-दांडूचा खेळ म्हटलं की सगळ्यांच्या डोळ्यांपुढे मधू उभा रहायचा.

विटी-दांडूच्या स्पर्धेत मधूचं वर्चस्व होतं. तो छानच विटी-दांडू खेळायचा, हातात दांडू घेऊन कोलवलेल्या विटीवर अशी झपक घ्यायचा की पाहणाराच्या डोळ्याचं पारणं फिटायचं. त्याने कोलवलेली विटी इतक्या लांब जाऊन पडायची की राज्य घेणारा रडकुंडीला यायचा.

अशा या मधूने एक नव्हे, दोन नव्हे तब्बल बावीस वर्षं ही स्पर्धा जिंकली आहे आणि आमच्या गावात होणाऱ्या विटी-दांडूच्या स्पर्धेवर वर्चस्व गाजवलं आहे. मीसुद्धा एक वर्षी मधूबरोबर स्पर्धा खेळलो आहे आणि मधूने इतरांसारखंच मलाही रडवलं आहे.

खेळताना मधू प्रतिस्पर्ध्याला रडवायचाच. त्याचा खेळच दांडगा होता. स्पर्धक जर आमच्या गावचा असेल तर त्यातल्या त्यात मधू सौम्य खेळायचा, पण बाहेरगावाचा स्पर्धक असेल तर मधू त्याचा पुरता घाम काढायचा. तो अधिक हिंस्र व्हायचा.

दर वर्षी मानाचा फेटा मधूलाच मिळायचा, आजपर्यंत मिळालेले बावीस फेटे आणि बावीस चांदीची कडी मधूने पत्र्याच्या पेटीत जपून ठेवली आहेत. एकदा मधूने मला ती पेटी उघडून दाखवली आहे.

आमच्या गावात होणाऱ्या विटी-दांडूच्या स्पर्धेतला मधूचा विक्रम कोणी मोडणार नाही आणि जोपर्यंत मधू या स्पर्धेत खेळतोय तोपर्यंत ही स्पर्धा तो कुणाला जिंकू देणार नाही असंच सगळ्यांना वाटायचं. आता मधू उतारवयाकडे झुकलाय, त्याने पन्नाशी गाठलीय, पण तरीही विटी-दांडूच्या खेळावरची त्याची पकड कणभरही कमी झाली नाही. विटी-दांडूच्या खेळावर वयाचा परिणाम होतच नाही, फक्त नजर तीक्ष्ण असावी लागते आणि मधूची नजर ही गरुडाची नजर आहे.

गेली कित्येक वर्षं मी या स्पर्धेला जाऊ शकलो नव्हतो, कितीतरी वर्षं झाली ही स्पर्धा मी डोळे भरून पाहू शकलो नाही. या वर्षीही स्पर्धेला जाण्याचा योग आलाच नाही, मात्र दरवर्षी स्पर्धा झाल्यावर मला तिची माहिती मिळायचीच... कधी मित्रांकडून, कधी आई-वडिलांकडून किंवा गावी गेल्यावर मी हमखास स्पर्धेची आठवण काढायचो. मला स्पर्धेची सगळी माहिती मिळायची आणि स्पर्धेत मधू जिंकल्याचं कळायचं, त्यात नवीन काहीच नव्हतं.

यावर्षी मात्र मला धक्का बसेल अशी बातमी मित्रांनी सांगितली, तीही स्पर्धेच्या दिवशीच... फोनवर.

'मधू हरला...'

पहिल्यांदा तर माझा विश्वासच बसला नाही. शक्यच नाही... मधूला हारवणारा माणूस अजून परमेश्वराने निर्माण केलाच नाही. पण ते खरं होतं. मधू हरला होता.

मित्राने सांगितलं, मधू अगदी महत्त्वाच्या क्षणी स्पर्धा हरला.

''महत्त्वाच्या म्हणजे?'' मी फोनवर मित्राला विचारलं, तर तो म्हणाला,

''अरे, या वर्षी स्पर्धेला खरोखर फार महत्त्व होतं, आपल्या गावच्या विटी-दांडूच्या स्पर्धेची परंपरा पाहून पुण्यातल्या एका कंपनीने तिचं प्रायोजकत्व स्वीकारलं होतं. बक्षीसाची मोठी रक्कम ठेवली होती. मंडप, स्पीकर प्रमुख पाहुणे सगळं सगळं त्या कंपनीने आयोजित केलं होतं आणि तुला सांगतो, आपल्या गावच्या विटी-

दांडूच्या स्पर्धेचं चित्रीकरण करून ते एका टीव्ही चॅनेलवरसुद्धा दाखवणार होते. एक प्रकारे आपल्या गावात चालणाऱ्या एका परंपरेला मोठीच प्रसिद्धी मिळणार होती आणि नेमक्या या महत्त्वाच्या क्षणी मधू हरला.''

मित्र फोनवरून भरभरून बोलत होता आणि धक्का बसल्यागत मी सगळं ऐकत होतो. तरीही ''मधू हरला'' या वाक्यावर मी विश्वास ठेवायला तयार नव्हतो. मधू हरणं शक्यच नव्हतं. पण दुसरीकडे मन म्हणत होतं, कदाचित वयोमानाचा परिणाम झाला असावा किंवा मधूची दृष्टी क्षीण झाली असावी. मित्रही सांगत होता की, या वर्षी मधूच्या खेळात कुणालाच जोश दिसला नाही. पहिले काही डाव तो नेहमीसारखा खेळला, पण त्याच्या फटक्यात जोश दिसला नाही. शिवाय कधीही फटके न हुकणारा मधू एकसारखा फटके हुकत होता. आम्हाला तर सगळ्यांना शंका येते की मधू मुद्दामहून ही स्पर्धा हरला की काय?

मित्र सांगत होता...

पण इतकी महत्त्वाची स्पर्धा मधू मुद्दामहून हरेलच कसा? या स्पर्धेतून त्याला मोठं बक्षीस मिळणार होतं. त्याचं नाव होणार होतं. वर्तमानपत्रातून त्याचं नाव चमकणार होतं. मधू टीव्हीवर झळकणार होता. त्याचे फोटो झळकणार होते. या स्पर्धेने मधूच्या कारकिर्दीवर सोन्याचा कळस चढणार होता. मग मधू मुद्दामहून ही स्पर्धा का हरेल? आणि मधूला हरवलं कुणी? तर सतरा वर्षांच्या एका मुलाने...

मित्र सांगत होता की, तो पोरगाही छान खेळत होता. तरी आम्हाला शंका आहे. मधू मुद्दामहूनच हरलाय...

स्पर्धा होऊन तीन-चार महिने झाले होते. आपण गावाकडं गेलो की मधूला स्पर्धेबाबत विचायचं असं मी मनाशी ठरवलं. तसं दसऱ्याला वडील आजारी होते म्हणून एकदा गावाला जाणं झालं, पण मधूशी गाठ मात्र पडली नाही.

दिवाळीत मात्र मधूची गाठ पडली. एका सायंकाळी आम्ही सारे मित्र मंदिराच्या ओट्यावर गप्पा मारत बसलो होतो. आमच्या गप्पांचे विषय गाव फिरून आल्यागत चालले होते. कधी आंतरराष्ट्रीय विषय तर कधी गावातल्या भांडकुदळ कलाबाजांचा विषय. मला मात्र मधूकडून त्याच्या हरण्याचं कारण जाणून घ्यायचं होतं. मी गप्पांच्या ओघात संधीची वाट पहात होतो. मग जसजसा क्रिकेटचा विषय निघाला तसा मी हळूच विटी-दांडूचा विषय काढला. विटी-दांडूच्या विषयावरून हळूच मी मधूकडे वळालो आणि त्याला विचारलं,

''कसं रे मधू? तू एवढा विटी-दांडूत चॅंपियन माणूस अन् नेमका महत्त्वाच्या वेळेला कसा काय हरला?''

''खरं सांगू का... मी मुद्दामच हरलो.''

''का? अरे या स्पर्धेने तुला प्रसिद्धी दिली असती, पैसा मिळाला असता, तू टीव्हीवर सुद्धा झळकला असता... मग का हरलास?''

तसा मधूने आम्हालाच प्रश्न केला.

''का? मला काय या स्पर्धेतून पैसा मिळाला नाही का? चांगले पंधरा हजार रुपये मिळालेत की.''

''अन् प्रसिद्धी?''

''ती पण मिळालीय... किशोर गाढवेने ही स्पर्धा जिंकलीय, कुणाला हरवून? तर त्यात माझं नाव आहेच की, ही काय प्रसिद्धी नाही?''

मधू आम्हालाच उलट प्रश्न विचारीत होता.

''अरे, पण तुझ्या बावीस वर्षांच्या विजयात खंड पडलाय ना?''

''पडू दे... त्याचं मला काही वाटत नाही...'' मधू संथपणे म्हणाला.

''पण तू मुद्दामहून का हरला? कारण काय?'' मी विचारलं.

तर मधूसारख्या अडाणी माणसाने दिलेलं उत्तर ऐकून मी थक्कच झालो. तो म्हणाला,

''हे बघा, आजपर्यंत ही स्पर्धा आपल्या काही गावांपुरती मर्यादित होती, पण या वर्षीची स्पर्धा अख्ख्या महाराष्ट्राला माहिती होणार होती, जिंकणाऱ्याला मोठा मान आणि प्रसिद्धी मिळणार होती. मला सांगा, हा मान आणि प्रसिद्धी मिळवण्याचं माझं वय राहिलंय का? सामना जिंकून त्याचं यश साजरं करायचं तरी वय राहिलंय का? समजा मी मनापासून खेळलो असतो आणि सामना जिंकला असता, तरी माझ्यात असा काय फरक पडला असता? माझ्यात नवी उमेद, नवा जोश आला असता? ही स्पर्धा जिंकून माझं असं काय भविष्य घडलं असतं.

''पण स्पर्धा जिंकलेला तो किशोर गाढवे लहान आहे, अन् ही स्पर्धा त्याला जिंकू दिल्याने त्याच्यात केवढा आत्मविश्वास आलाय. बावीस वर्षं विटी-दांडूची स्पर्धा जिंकणाऱ्या माणसाला आपण हरवलंय, या एकाच भावनेने त्याच्यात केवढी उमेद पैदा झालीय. आता तो कधीही, कोणत्याही स्पर्धेत म्हणा किंवा या क्षेत्रात सतत जिंकण्याच्या ईर्ष्येने खेळेल आणि माझा आजवरचा अनुभव आहे, जो जिंकण्यासाठीच खेळतो त्यात त्याला नक्की यश मिळतं. या स्पर्धेत त्याला जिंकू दिल्याने त्याला केवढी प्रसिद्धी मिळालीय आणि ही प्रसिद्धी, हे यशच त्याला उद्याच्या जगात भरारी घ्यायला कारणीभूत होईल. विटी-दांडूच्या खेळातलं यश हे एक निमित्त आहे, उद्या तो कोणत्याही क्षेत्रात नक्कीच मोठी झेप घेईल.

''समजा मी त्याला हरवलं असतं, खरं सांगतो, मी अजूनही त्याला हरवू शकतो आणि खरंच तसं झालं असतं तर तो किती नाउमेद झाला असता. त्याच्या मनात पराभूत मनोवृत्ती निर्माण झाली असती. त्याचं मन खच्ची झालं असतं आणि एकदा का त्याचं मन खच्ची झालं की त्याला आयुष्यात कधीच भरारी घेता आली नसती. इतक्या लहान वयात त्याच्या बाबतीत असं होऊ नये म्हणून मी त्याला जिंकू दिलं, आणि मी हरलो.''

मधूच्या उत्तराने आम्ही सगळे चकित होऊन गेलो. लक्षात घ्या हे एका अशिक्षित, गावंढळ माणसाचे विचार आहेत आणि खरोखर विचार करायला लावणारे आहेत.

**प्रा. साईनाथ पाचारणे**
प्राचार्य, डी.एड. कॉलेज भोर,
ता.भोर, जि. पुणे.
Mob. : 9623862646.

हुसेन जमादार

# महात्मा ते महात्मा...

महात्मा ते महात्मा समता 'पदयात्रा' महात्मा जोतिबा फुल्यांच्या वाड्यातून २ जानेवारी रोजी सुरू झाली. ही यात्रा वर्धा येथील महात्मा गांधींच्या सेवाग्राम आश्रमापर्यंत (२८ फेब्रुवारी रोजी) जाणार आहे.

सर्व क्षेत्रांतील समतेसाठी लढणारे डॉ.बाबा आढावा, भाई वैद्य, डॉ.सुगन बरंठ, एन.डी.पाटील यांनी यात्रेला शुभेच्छा दिल्या. डॉ.यशवंत सुमंत यांच्या वैचारिक नेतृत्वाने व चाळिसेक समतावादी संघटनांनी पुरस्कारलेली ही यात्रा, जवळजवळ एक हजार किलोमीटरचा प्रवास करून ११० गावांतून संवाद साधत ९०० किलोमीटर जाणारी ही समता यात्रा, महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचे उपाध्यक्ष आबा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली मार्गक्रमण करू लागली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथील चवदार तळ्याचे पाणी दलितांसाठी खुले केले, तेथील पाणी व महात्मा फुले यांनी अस्पृश्यांसाठी खुल्या केलेल्या विहिरीतील पाण्याची कावड समतेचे प्रतीक म्हणून पदयात्री वाहत आहेत.

या यात्रेचे नेतृत्व करणारे दुसरे व्यक्तिमत्त्व, विजय दिवाण यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते, कारण त्यांचा सतत आग्रह आहे की, सर्वोदयचं नेतृत्व दलितांकडे गेले पाहिजे. पदयात्रेचा पहिला पडाव पुणे येथे साने गुरुजी स्मारकावर झाला. संजीव साने व प्रा.सुभाष वारे यांच्या शुभेच्छा स्वीकारून यात्रा आगाखान पॅलेस येथील कस्तुरबा गांधी व महादेवभाईंच्या समाधीचे दर्शन घ्यायला गेली. आवाबेन नवरचना केंद्रात, सावित्रीबाई फुलेंच्या जयंतीनिमित्त महिलांशी संवाद करताना समोर आले की, महिलांसाठी काम उपलब्ध आहे, पण पुरेशा महिला उपलब्ध नाहीत.

४ जानेवारी रोजी, वाघोलीत दगडखाण कामगारांशी संवाद होता. ॲड.बी.एम.रेगे व त्यांच्या पंजाबी सहचारिणीने झिंदाबाद म्हणून स्वागत केले. त्यांनी दगडखाण कामगारांसाठी १९९७ साली 'संतुलन' ही संस्था स्थापन केली आहे. पाषाण शाळा व 'दगडफूल' नावाचे नियतकालिकही निघते. पुणे परिसरातील काँक्रीटचे जंगल उभे करण्यासाठी लागणारी खडी या वाघोली परिसरातून उपलब्ध होते. वाघोलीत दगडांच्या ३७५ खाणी असून, ४६६ दगडखाणी क्रेशर चालतात. जगण्याचे साधन म्हणून दुष्काळग्रस्त, भूमिहीन, दुर्बल, आदिवासी बेरोजगार कुटुंबे प्रचंड गतीने या व्यवसायाकडे वळतात. राज्यभरात सुमारे ५०-६० लाख कामगार या व्यवसायात आहेत. ते एका खाणीवरून दुसऱ्या खाणीवर स्थलांतर करतात, त्यांची आठ ते दहा लाख मुले शिक्षण व आरोग्यापासून वंचित आहेत.

'संतुलन' संस्थेचे काम पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व अहमदनगर या पाच जिल्ह्यांतून चालते. तेथे सुमारे पाच हजार मुले पाषाण शाळांतून शिक्षण घेत आहेत. 'बालमजुरमुक्त खदान, यह है हमारी पहचान' हे त्यांचे घोषवाक्य आहे. पुणे परिसरात २८५३० दगडखाण कामगार कुटुंबे आहेत. ३०७४ मुले ६० पाषाणशाळांतून शिकतात.

आम्ही दगडखाणीला भेट दिली. या खाणीतून काम करणारे मराठवाड्यातील, तसेच यु.पी., बिहार व कर्नाटकातील आहेत. खाणीतून काढलेले दगड फोडण्याचे व ट्रॅक्टरमध्ये भरण्याचे काम करावे लागते. एक ट्रॅक्टर भरेल इतके दगड फोडण्याची मजुरी ६० रुपये मिळते. व ट्रॅक्टरमध्ये भरण्यासाठी ३५ रुपये मिळतात. ट्रॅक्टर भरण्याचे काम एकेका जोडीला करावे लागते. दिवसाकाठी ३ ते ४ ट्रॅक्टर भरून होतात. दगड वाहतूक करणाऱ्या ट्रक ड्रायव्हरला आठवड्याला ९०० रुपये पगार मिळतो.

हे लोक खाणीच्या भोवतीच दगडावर दगड रचून, वर पत्रा टाकून घर बनवतात. घरांची उंची असते चार फूट. आमच्याबरोबर असलेल्या पदयात्री कुसुमताई ढगे वाकून घरात जाऊन आल्या. त्या म्हणाल्या, आत उभेच राहता येत नाही, तर ती स्त्री साडी कशी नेसत असेल?

दुपारी कामगार महिलांशी संवाद झाला. नवरा दारू पितो, सरकार दारू बंद करत नाही तर सत्तेवर का आहे? असा प्रश्न एका महिलेने विचारला. दगडखाणीत काम करणाऱ्याचा/आमचा पगार का वाढत नाही? असा प्रश्न एका भगिनीने विचारला. कामाला गेले नाही तर चूल पेटत नाही. बारा महिने काम मिळाले पाहिजे. नवरा वारला. या महागाईत तीन मुले कशी सांभाळू? पिवळे रेशनकार्ड हवे. मुलांना शिक्षण मोफत मिळावे, पाणी लांबून आणावे लागते, त्यात वेळ जातो. मग मजुरी कमी मिळते. आजारी असले तरी कामावर जावे लागते, नाहीतर खोली सोडा म्हणतात. आता इथल्या खाणीतले दगड संपले, मग इथली झोपडपट्टी उठवली तर काय करावे? असे प्रश्न आणि प्रश्नच....

० ०

४ जानेवारीला फुलगावला धोत्रे विद्यालयाच्या प्राचार्या मुल्ला मॅडमनी स्वागत केले. शाळेभोवती शेती, डोंगर, भरपूर मोकळी जागा, मुले पांढरा शर्ट व डोक्यावर गांधी टोपी अशा गणवेशात. बसलेल्या मुलीही सलवार कमीजमध्ये दिसत होत्या. त्यांच्याशी संवाद साधताना सत्याग्रहावर बोलावे लागले. गांधींजीनी सर्व जनतेला स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेण्यासाठी इंग्रजांना

सत्य सांगू या, तुम्ही परके आहात, हा देश सोडून निघून जा. यातून सामान्य जनता आंदोलन करू शकली. आपलं महाराष्ट्र सरकार आता अन्नधान्यापासून दारू बनविण्याचे परवाने देत आहे. त्याला सत्याग्रहाने विरोध करता येईल. विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्र्यांच्या नावे पोस्टकार्ड पाठवावे, त्यात एकच वाक्य लिहिले तरी पुरे.... 'अन्नधान्यापासून दारू बनविण्याचा निर्णय रद्द करावा...' असा तुम्ही सत्याग्रह करू शकता. विद्यार्थ्यांशी बोलताना भरमसाठ फीचा प्रश्न येतोच. फुलगावला सैनिकीशाळा आहे. तिथे लाखात फी मोजावी लागते. डोनेशन द्यावे लागते. अशी काहींनी तक्रार केली.

'इनव्हेस्टमेंट इन मॅन ट्रस्ट' ही संस्था प्रशिक्षणाचे काम करते. अंगणवाडी शिक्षिकेचे प्रशिक्षण सुरू होते, त्यांच्याशी संवाद झाला.

बऱ्याच शिक्षिकांनी चर्चेत भाग घेतला. अंगणवाडी शिक्षिका समाजसेवा म्हणून करायची आहे, त्यामुळे त्यांना मानधन मिळते. लहान गटासाठी मिनी अंगणवाडी १५ ते २०. मानधन ७५० रुपये. वरील गटाला २० ते ४० मुले १८०० ते २३०० आता मानधन झाले आहे. तीनचार महिन्यांतून एकदा पगार मिळतो. मुलांना आहार देण्याची व्यवस्था करावी लागते. विधवा व गरीब वर्गातील स्त्रिया अधिक आहेत अशी त्यांनी माहिती दिली. झाडलोट, मीटिंग सर्व त्यांना करावे लागते. विद्यार्थ्यांच्या आहार वाटपाला पर्याय नाही. शिक्षिकेचे नातेवाईक मयत झाले असले, तरी आहार वाटप करूनच तिकडे जावे लागते. हक्काची रजा नाही. मे महिन्यात १५ दिवस मदतनीस मिळते, मिनी अंगणवाडीला तेही नाही. दिवाळीत पाच दिवस सुट्टी असते.

५ जानेवारी, सणसवाडी येथे पदयात्रेचे स्वागत झाले. चौकातच लोक गोळा झाले होते. पदयात्रेचा उद्देश आबा कांबळेंनी मांडला. महिला सरपंच स्वागताला हजर होत्या, इतर सदस्यही होते.

रामदास लोखंडे हा तरुण धावपळ करीत होता, त्याने बुद्धवाड्यात जाण्याचा आग्रह धरला. पदयात्रा घेऊन गेलो. मंदिरात गेलो. २००७ साली थायलंडमधून आणलेली मूर्ती तिथे बसविली आहे. मूर्तीचे वजन ३२० किलोचे आहे. मूर्ती अतिशय लोभस आहे. बुद्धिस्ट मूव्हमेंट सेंटर (ट्रस्ट)ला ही मूर्ती भेट देण्यात आली असल्याचे सांगितले. रामदास लोखंडे बी.ए. झाला आहे. पुढे शिकता येत नाही, शिक्षणाची फी कमी झाली पाहिजे, शिक्षणाचे खाजगीकरण बंद झाले पाहिजे असे विचार त्याने मांडले. आरक्षणामध्ये दलितांमधील ५२ जाती येतात, म्हणून नोकऱ्या मिळणे सोपे नाही असेही त्याने सांगितले. बुडगा जंगम, माला जंगम, लिंगडेर अशांनी नोकऱ्या पटकावल्या आहेत अशी तक्रार त्याने केली.

११ वाजता शिक्रापूरला जाहीर सभा होती. ग्रामपंचायतीच्या कार्यालयात श्री सोमनाथ भुजबळ अध्यक्ष समता परिषद वाट पहात होते. बापूसाहेब जकाते- सरपंचही होते. मराठा, माळी, हिंदु-मुस्लिम अठरा पगड जाती तिथे आहेत. रोजगार हमीची कामे बंद आहेत, कारण काम मागणीसाठी कोणी येत नाही असे कळले.

शिक्रापूरला एम.आय.डी.सी. झाली आहे. युपी, व बिहारी लोक कामगार आहेत. त्यांचा आरोग्य, शिक्षणाचा बोजा ग्रामपंचायतीवर पडतो. असे १५ ते २० हजार लोक बाहेरचे आहेत. स्थानिक ५ ते १० टक्के लोकच नोकरीत आहेत. बाहेरचे लोक अधिक वेळ काम करतात. स्थानिकांनी छोटे-मोठे व्यवसाय सुरू केले आहे.

शेतमजूर मिळत नाहीत, त्यामुळे ज्यांची शेती आहे ते लोक एकमेकांच्या मदतीने शेतीची कामे करतात, त्याला 'सावड' म्हणतात. शेतीमालाला आधारभूत भाव मिळाले पाहिजेत. शेतकऱ्यांना बियाणे व खते मोफत दिली पाहिजेत असे विचार व्यक्त करण्यात आले.

धान्य उत्पादन वाढवण्यासाठी संकरित बियाणे आणली. खत, बियाणे सुरुवातीला मोफत दिले, त्यातून उत्पादन वाढलं, पण भाव नाही. शेतकरी सुखी नाही असे विचार मांडले. गावातील लोकांना भेटण्यासाठी मी बाहेर पडलो. चौकात पोस्टासमोर काही मंडळी उभी होती. त्यांना पदयात्रेचा उद्देश सांगितला. गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आलो आहोत म्टल्यावर त्यांनी पोस्ट खात्यातील लोकांच्या व्यथा सांगितल्या.

ग्रामीण भागातील पोस्टाचे कामकाज करणारे हे खातेबाह्य नोकर मानले जातात, त्यामुळे २०-२५ वर्षे नोकरी करणारेही अद्यापि कायम झालेले नाहीत. त्यांना ४२०० ते ५८०० रुपये पगार मिळतो, तेच काम करणाऱ्या कायम नोकरास आता ३५ हजार पगार झाला. कायम पोस्टमनला १८ ते २० हजार पगार मिळतो, आम्हाला मात्र ६ हजारांतच रिटायर व्हावे लागणार आहेत. निदान १० हजार पगार मिळावा अशी त्यांनी मागणी केली. भारतीय डाक विभागाचे एक परिपत्रक पहायला मिळाले. ग्रामीण डाक जीवनविम्याचे प्रस्तावाबाबत ते होते. पुणे ग्रामीण विभागाला २००९-१० आर्थिक वर्षासाठी ५४३ कोटी रुपयांचे व ५३९७०० ग्रामीण डाक जीवनविम्याचे प्रस्ताव घेण्याचे उद्दिष्ट पूर्ण करणेबाबत होते. याबाबत कर्मचारी म्हणाले, हे उद्दिष्ट पूर्ण करण्याची आमच्यावर सक्ती होते, त्यामुळे आम्ही कर्मचारी मिळून वर्गणी काढतो व उद्दिष्ट पूर्ण करतो. नाहीतर नोकरी जायची भीती. त्या पत्रकात अंडरलाईन करून पुढील मजकूर छापला आहे...

**आपले काम वाढवून आपण स्वत:च स्वत:ला मदत करावयाची आहे. जेणेकरून आपले शाखा डाकघराची आस्थापना कायम राहील व आपल्या नोकरीवरती कोणतीही बाधा येणार नाही.**

**तसेच उपडाक घरातील सर्व कर्मचाऱ्यांनी मिळून प्रास्ताविक रकमेचे वार्षिक उद्दिष्ट पूर्ण करणे अतिशय महत्त्वाचे आहे. मला खात्री आहे, मागील वर्षाप्रमाणेच चालू वर्षात आपण सर्वजण प्रयत्न करून आपल्या विभागाचे नाव संपूर्ण देशामध्ये उज्ज्वल कराल.**

सही
**अधीक्षक डाकघर**
पुणे ग्रामीण विभाग

*('महात्मा ते महात्मा' पदयात्रेत सामील झालेल्या हुसेन जमादार यांनी पाठवलेला संक्षिप्त वृत्तात.)*

पृष्ठ २ वरून)

# आता कोणी कोणाची जय म्हणायाची, ते तुम्हीच सांगा राव...?

''आरे दादा, मला भेटतात पाचपन्नास रुपये. त्यात पेते साला दारू. मी भी घेतो घोट खांड. भीक मागू मागू थकवा येतो. शीणभाग घालवण्यासाठी पेतो दारू. लोक लई कलाकार हाईत राव. असंच गेलं भीक मागायला की पैसे देत नाही. म्हणून आंगावर भगवी कापडं घालतो. साधू महाराजासारखं दाढी केसं वाढवले, अंगावर भगवी कापड बघितली की लोक फुल ना फुलाची पाकळी भीक देतात.

''आता तुम्ही पोलीसावानीच वाटले म्हणून लपल्या होत्या तरण्याताट्या पोरी. पोलीस लयीच वंगळ राव. तरणीताटी पोरगी सोरगी दिसली की धरधुरच करतात बेट्टे, म्हणून ह्या लपल्या होत्या. बरंच झालं, तुम्ही आपले निघाले. आपली तर जिंदगी असीच गेली. पोराबाळांची तरी जिंदगी सुधरली पाहिजे. तसाही ह्यो भीक मागण्याचा धंदा खूपच बेकार हाय बबा. भीक मागायला गेल्यावर लोकं तर भीक देत नाही, उलट बोलू बोलू गाभडं पाडून टाकतात. हातपाय सुधं हाय, काम करायला काय रोग येते का, असं लोक म्हणत्यात. मी मह्या नातवाला मातर भीक मागू देणार न्हाय. त्याला साळा शिकवतू. त्याला पोलीसच बनवतू. असा तसा पोलीस न्हाय, इनामदार पोलीस बनवतू.

''आता आपले पारधी आदिवास्यात आले म्हणे. आपल्याला खूप सवलती मिळत्यात म्हणे. खूप लोकं सांगत्यात रे बाबा. पण आपल्या पालापसवर कोनत्याच सवलती येत न्हाय, कोठं गायब होतात कोनाला ठावं. म्हागं आमच्या जवळून काही लोकानं पैसे नेले. फोटो न्हेले. निराधाराचा पगार चालू करतो म्हणून. आज दोन-तीन वर्सं झाले, पण त्याचं काहीच झालं नाही. आमच्याकडून तितरं बाटरं भी लयी डाव खायला न्हेले. साला लोकं फसवत्यात. लालूच दाखवत्यात. आन आपल्यासारखे लोकं लालचीत मरतात. मी वर्सा सहा महिन्यात धोपटाळ्याला जातो. इचारपूस करतो, पण सरकारातून झालं नाही म्हणत्यात. चंद्रपूरच्या सरकारजवळ हाईत म्हणं आमची कागदपत्रं. तुम्ही चंद्रपुरातच राहता ना. तेवढं इचारून बघा. काय पाचपंचवीस घेयाचे ते घे म्हणावं. पण कागदं थोपटाळ्याला पाठव म्हणाव. एक डाव निराधाराचा पगार चालू झाला, की सोडून देतू भीक मागायाचा धंदा. धोपटाळ्याचं घर धरून राहतो. आता कटाळा आला रे असलं भीक मागत बोंबलत हिंडायाचा...''

तेवढ्यात पालात खड्ल खड्ल झालं. एक दोन जन धावले. डुकराची झुंड पालात घुसली होती. हाट् हाट् करीत हाकालले. या रानात साला पालाच्या घरात कुत्रे, मांजरे घुसतात. पालाला थोडंच घर असते. चवकडून भोंगळेच असतात पालं. आता आंधार पडत चाललेला.

आंधारात एकानं काडीकचरा चेतवून चुलीत जाळ घातला. तेवढ्यात पुन्हा बोलायला सुरुवात झाली. एका बाईनं सांगितलं, ''आता भीक मागायाची भी तऱ्हा बदलली भाऊ. आम्ही बायका दिवसभर भीक मागतो. हे बघा हे ताट.''

मी ताट बघितलं. त्या ताटात देवादिकाचे फोटो चिपकवलेले.

मी - ''या ताटात देवादिकाचे फोटो चिपकवल्यावर काय होते?''

ती - ''होते, भरपूर होते. ताटात देवादिकाचा फोटो असल्यावर लोकं नादर समजत्यात. न वाढणारे भी वाढत्यात. असं कोन्ही वाढणार नाही, पण देवाचे नावानं नक्कीच वाढतील. आन् टुकार लोक चावट बी बोलत नाही.''

मला भेऊन पळून गेलेले, एक एक तरुण माणूस येऊ येऊ मह्यापासी बसू लागला. कान देऊन माझे बोलणे ऐकू लागले. मी, ''आरे, आपन एक गाव धरलं पाहिजे. घर बांधलं पाहिजे. रोज मजुरी करून जगवलं पाहिजे. मुलाबाळांना शिकविलं पाहिजे.'' तेवढ्यात एक तरुण पुढे झाला आन बोलू लागला, ''आव सायब, मी नांदगावला राहतो. साधीसुधी गुरवाडीत झोपडी बांधली. गावात काम बघू लागलो, पण कामच कोणी देईना. अंगाचा वासच येतू म्हणतात. मग भीक मागून जगू लागलो. किती दिवस भीक मागणार. एका गावात किती दिवस लोकं भीक वाढतील. गमलंच नाही, सोडून दिलं गाव. खुशाल पालं घेऊन हिंडतो.

त्याच्या त्वांडाचा घमकन देशी दारूचा वास आला. मी थोडा मागे सरकलो. मग त्याईनं बोलायला सुरुवात केली. एकाच वेळी चार-चार जण बोलायले. एकाला चूप केलं तर दुसरा बोलायला. मधातच तिसरी बोलायला, काहीच समजंना.

तवा मी सांगितलं, पुन्हा येतो म्हणलं. निघता निघता त्याहीला म्हणलं, ''आरे, जवळपास येथे पाण्याचा पत्ता दिसत नाही. तुम्ही पाणी कोठुन आनता.'' तवा ते म्हणतात, ''आवं सायब, तसीही आपली जात हुशारच आहे. ती समुरची पाईप लाईन जाते ना.''

''हो.''

''मोठी पाईप लाईन आहे. शहराला पाणी पुरवते.''

''आम्ही ती फोडतो. पाण्याचा फवारा उडतो. आमची सोय होते.''

''दुरुस्त करीत नाही.''

''करतात दोन-तीन दिवसाला.''

''तुम्हाला काही म्हणत नाही?''

''दुरुस्त करणारे म्हणतात, आजून फोडत जा, दुरुस्त करायाचे आम्हाला पैसे मिळतात म्हणतात.''

मी निघालो. चालत चालत रोडवर आलो. उभा राहिलो. शहराकडे नजर टाकली. शहरात लखलखता प्रचंड उजेड. मग पालाकडे बघतो, तर काय, जीवघेणा अंधार. ह्या उजेड आन् अंधारातलं अंतर कवा कमी होईल.

मी निघालो. मनात विचाराचं चक्र सुरू होतं... आमचा भारत देश स्वतंत्र. ह्या स्वतंत्र भारतात हाडामासाचे माणसं, एक उजेडात आन् दुसरा अंधारात राहतो. ह्या एकाच देशात दोन देश कसे नांदतात. एक इंडिया आन दुसरा भारत... आता कोणी कोणाची जय म्हणायाची ते तुम्हीच सांगा राव...?

**अशोक पवार**
रामकृष्ण चौक, मातोश्री मागे, तुकुम, चंद्रपूर ४४२४००.
Mob. 9823563765

सर्जनशील लेखनप्रक्रिया चालते तरी कशी,
याची झलक दाखवणारे 'साधना प्रकाशना'चे मराठी साहित्यातील आगळेवेगळे पुस्तक...

# कथा आणि कथेमागची कथा

**लेखक : राजन खान**

भाग १ आणि भाग २ : प्रत्येकी ३२० पाने

दोन्ही भागांची एकूण किंमत : रु. ६००/-

**प्रकाशनपूर्व सवलतीत : रु. ३५०/-** (पोस्टाने घरपोच : रु. ४००/-)

पुस्तकाची नोंदणी डी.डी. / एम.ओ. अथवा चेकद्वारे रक्कम पाठवून करावी.

पुस्तकाची उपलब्धी : २० फेब्रुवारी २०१०

## कथा आणि कथेमागची कथा

| | |
|---|---|
| बांगी | नातीखेळ |
| चांडाळ | एका रात्रीची बाई |
| सवाल | काही कळत नाही |
| एकूट समूह | पुण्याचा पिरपिऱ्या पाऊस |
| पिवळट लुगडं मळकट पिशवी | काळी आई आणि नोटा |
| दगडओठ | एका अटीचा संसार |
| असूर | असणं नसणं तीव्र असह्य |

: संपर्क :

**साधना ग्रंथप्रदर्शन आणि मीडिया सेंटर**

४३१, शनिवार पेठ, पोलिसचौकीसमोर, पुणे ४११०३०. दूरध्वनी : ०२०-२४४५९६३५.

(सकाळी १० ते सायं. ८. बुधवार बंद)

साधना साप्ताहिक
२३ जानेवारी २०१०

एन.डी.नं. आर.एन.आय.१६०१/५७
रजि.क्र.एल-२/आर.एन.पी./पी.एन.सी.डब्ल्यू./डब्ल्यू-१७८/२००९-२०११
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना नं.७
पोस्टींग दर गुरुवारी मार्केट यार्ड पी.एस.ओ.सॉर्टिंग ऑफिसमधून

## पहिला नोबेल पुरस्कार मिळविणाऱ्या ब्रिटिश लेखकाची कादंबरी




द कंप्लीट वर्क्स, जंगलबुक वगैरे रचना लिहिणाऱ्या रुडयार्ड किप्लिंग या ब्रिटिश लेखकाची किम ही एक कादंबरी. ब्रिटिश जीवनशैली आणि विचारांचा पगडा नसलेली, भारतीय जीवनशैलीपासून किंचितही न ढळणारी अस्सल भारतीय कादंबरी.

किंमत १२०/- रुडयार्ड किप्लिंग ।अनु.। वसु भारद्वाज

## नोबेल पुरस्कारप्राप्त चिनी लेखकाचा कथासंग्रह




आशय-विषय, रुप-भावाशैलीच्या अंगाने भिन्न असलेल्या गाओ यांच्या कथात्मसाहित्याचा व्यापक विस्तार दाखविणाऱ्या श्रेष्ठ कथा.

किंमत १२०/- गाओ जिंगजियान ।अनु.। चित्रा माया

**साकेत प्रकाशन प्रा.लि.**
११५, म. गांधीनगर, फायरब्रिगेडमागे, स्टेशन रोड, औरंगाबाद.
दूरध्वनी : (०२४०) २३३२६९२/९५, ९८२२४७८८९५.
Email : info@saketpublication.com

**पुणे कार्यालय** (वेळ : स.९.३० ते ६.३०) (रविवार बंद)
ऑफिस नं. ०२ 'ए' विंग, पहिला मजला, धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, ३७३ शनिवार पेठ, ठाकरसी कन्या शाळेजवळ, पाटे हाईटस्‌समोर पुणे - ३० **मो.** ९४२२२२५४०७

**साकेत ग्रंथवार्ता**
(वार्षिक वर्गणी १००, त्रैवार्षिक २०० पंचवार्षिक ३०० रु.)
वर्गणीच्या किमतीचे पुस्तक मोफत मिळवा.
साकेतच्या पुस्तकांवर वर्षभर २५% सूटही मिळवा.
(ट. ख. वेगळा)*
१०० रु.चे पुस्तक मोफत मिळवा
टीप- योजना ३१मार्च.१०पर्यंत, साकेतच्या दालनात.
*अटी लागू
वर्गणी म.ऑ. / डीडीने साकेत प्रकाशन नावाने औरंगाबादच्या पत्त्यावर पाठवावी.

आपले नाव व पत्ता ९८८१७४५६०५ वर SMS करून नवीन पुस्तकांची माहिती मोफत घरपोच मिळवा.